
## वसंत शिरवाडकर

# आपले सखेसोबती



# आपले सखेसोबती

बा.वा
२७०३
प्रितेश सतीश शिंदे
3-12-84

वसंत शिरवाडकर

२७०६
बा.वा
BVBK-0402703

ज्ञानविज्ञान माला

पृथ्वी प्रकाशन

पृथ्वी प्रकाशन, सी-३५, तिसरा मजला,
श्रीराम इंडस्ट्रीयल इस्टेट, वडाळा, मुंबई-४०००३१.

प्रकाशक : विश्राम शिरवाडकर
पृथ्वी प्रकाशन
सी-३५, श्रीराम इंड. इस्टेट,
वडाळा, मुंबई ४०००३१

© प्रकाशक

सजावट : पद्मा सहस्रबुद्धे

मुद्रक : देवेंद्र शिरसेकर
रंगनाथ मुद्रण
सी-३५, श्रीराम इंड. इस्टेट,
वडाळा, मुंबई ४०००३१

पहिली आवृत्ती १९८५
मूल्य : रु. १२



म. सं. सं. ठाणे, वाचनालय ग्रंथा.
बाल वाङ्मय विभाग
क्र. क्र. २६०३ दिनांक ६।१०।८२
विषय बा. वा. क्र. ........

ज्ञानविज्ञानमालेचे संपूर्ण महाराष्ट्रात अतिशय उत्साहाने स्वागत झाले व त्यामुळे ही पुढची पुस्तके काढायला आम्हांला नवा हुरूप मिळाला.

या पुस्तकामध्ये आपल्या आजूबाजूला वावरणाऱ्या प्राण्यांचे स्वभावविशेष शब्दांकित केले आहेत. साध्या कावळ्याचंच उदाहरण घ्या. तो खिडकीवर बसला की आपल्या कपाळावर आठी पडते.एक तर आवाज कर्कश दुसरं म्हणजे कुठली गोष्ट कधी लांबवेल याची खात्री नाही.

पण अशा या कावळ्याच्या काळ्या जोडप्यातील नर आणि मादी एकमेकांशी अगदी माणसाइतकेच एकनिष्ठ असतात हे वाचून तुम्हांला आश्चर्य वाटेल. जोडप्यापैकी एकजण गेलं तर दुसरा उरलेलं आयुष्य एकटचाने काढतो. म्हणजे मानवी जीवनात अत्युच्च समजलेले गुण कावळ्याने मूकपणे आधीच आत्मसात केले आहेत.

पशुपक्ष्यांच्या स्वभावातील ही वैशिष्टचे खरोखर अभ्यास करण्यासारखी आहेत. ही वैशिष्टचे त्यांचे ठिकाणी स्वयंप्रेरणेने (Instinct) आलेली असतात. मुंगूसाला पाहून पळून जाण्याचे शिकण्याकरिता साप कुठल्या शाळेत जात नाही. तर ते ज्ञान त्याला उपजतच आलेले असते.

म्हणून 'आपले सखे सोबती' मधले प्राण्यांचे वर्णन वाचकांना वेधक वाटेल आणि त्यांत वर्णन केलेल्या प्रत्येक प्राण्याच्या वेगळ्या जगाची कल्पना येईल.

५ कुत्रा

१२ मांजर

२१ कावळा

२४ चिमणी

३० कोकिळा

३४ मुंगूस

४१ मुंगी

४४ हत्ती

५० उंट व जिराफ

५६ कासव

६१ घोडा

६८ गाढव




माणसाच्या प्राणिजातीतील सख्यासोयऱ्यांची गोष्ट सांगायची तर कुत्र्यापासून सुरुवात करायला हवी. माणूस आणि कुत्रा यांच्यामध्ये जे प्रेम व इमानदारीचे नाते आहे ते प्राणिजगतात अजोड आहे. प्राणी सृष्टीत सहकार आहे, भिन्न भिन्न जातीचे प्राणी समान शत्रूविरुद्ध एकमेकांना धोक्यांचे इशारे देतात, अशा शत्रूवर एकत्र येऊन तुटून पडतात. अन्नाची वाटणीही करतात. पण माणूस आणि कुत्रा यांच्यामध्ये जसे प्रेम व सख्य आहे तसे कुणाही दोन प्राण्यांमध्ये नाही.

माणूस व कुत्रा यांची दोस्ती दहा हजार वर्षांहून जुनी आहे. म्हणजे माणसाच्या संस्कृतीहूनही आधीची. कुत्रा हा कोल्हा, लांडगा, तरस या प्राण्यांच्या कुटुंबातला. 'इंग्रजी'मध्ये या कुटुंबास canine असे म्हणतात. श्वान-कुटुंब असे त्यास म्हणता येईल. कुत्रा हा कोल्हा व लांडगा यांच्याप्रमाणेच एकेकाळी रानटी अवस्थेत राहात होता. (अजूनही कुत्र्यांच्या काही रानटी जाती आहेत.) पण मग केव्हा तरी रानटी अवस्थेत राहणाऱ्या कुत्र्याने आपल्या जंगली जीवनाचा त्याग करून तो माणसाच्या सोबतीला येऊन राहिला. याला नक्की काय कारणे घडली असावीत हे आज जरी सांगता येणार नसले तरी तर्क करता येतो.

घडले असावे ते असे :

दहा हजार वर्षांपूर्वीचा हा काळ आहे. माणसे कंदमुळे आणि प्राण्यांची शिकार करून त्यावर गुजारा करीत असत. शिकार टोळ्याटोळ्यांनी करीत. अशीच एखाद्या टोळीने शिकार केली तेव्हा त्यातून आपल्याला काही मिळेल या आशेने काही रानटी कुत्री त्या शिकारीभोवती घुटमळत राहिली असतील. दुसऱ्याने केलेल्या शिकारीच्या अवतीभवती घुटमळत, मिळेल तो भाग पदरात पाडून घेण्याची ही सवय कुत्र्याचे भाईबंद असलेले कोल्हे, लांडगे आणि तरस या प्राण्यांमध्ये आजसुद्धा आहे. त्या माणसांनी आपले खाऊन झाल्यावर म्हणा किंवा सहज गमतीने म्हणा, आपल्या शिकारीतील मांसाचा एखादा तुकडा भोवती घुटमळणाऱ्या कुत्र्याला टाकला असेल. आयते मिळाल्यावर कोण सोडणार? त्या कुत्र्यांनी मग त्या शिकारी माणसांच्या आजूबाजूला राहण्याचा परिपाठच पाडला असेल. त्या माणसांच्या वस्तीच्या जवळही त्यांनी मुक्काम ठोकायला सुरुवात केली असेल. माणसे शिकारीला निघाली की ते कुत्रे त्यांच्याबरोबर जात असतील आणि शिकार पकडण्याच्या कामी त्या माणसांना मदतही करू लागली असतील. या सर्व उद्योगातून माणसे व कुत्र्यांमध्ये एक जवळीक निर्माण झाली आणि दोघांची

घनिष्ट मैत्री जमली. माणसाने कुत्री माणसाळविली आणि तो त्यांना पाळू लागला. हे याच मार्गाने घडले असावे यात काही शंका नाही.

वर वर्णन केलेली घटना अमूक एका ठिकाणी घडली असा पुरावा अर्थातच मिळण्यासारखा नाही. पण कुत्रा हा प्राणी शिकारीसाठी उपयोगी ठरतो असे ध्यानात आल्यावर, कुत्रे पाळण्याच्या प्रथेचा प्रसार सर्वत्र झाला आणि माणूस तेथे कुत्रा अशी स्थिती होण्यास वेळ लागला नाही. घरावर पहारा ठेवण्याचे काम, शेताची राखण, शेळयामेंढयांच्या कळपांचे कोल्हे, लांडगे यांसारख्या हिंस्र प्राण्यांपासून संरक्षण, अशी माणसाची अनेक उपयुक्त कामे कुत्रा करू लागला. अशा रीतीने कुत्रा हा माणसाच्या जीवनकलहात सहभागी झाल्याने तो त्याचा जीवनसाथी बनला.

आज पृथ्वीच्या पाठीवर जेथे मनुष्यवस्ती आहे तेथे कुत्रा आहेच. ध्रुवालगतच्या अतिथंड बर्फाळ प्रदेशात राहाणारे एस्किमो लोक कुत्रे पाळतात, तसेच सहारा व अरबी वाळवंटात भटके, प्रवासी बदाउनी लोकही कुत्रे पाळतात. जगात कुत्रे पाळण्याची सर्वात अधिक आवड दिसून येते ती इंग्लिश लोकांमध्ये. कुत्र्यांवर प्रेम करणे हा इंग्लिश लोकांचा जणू काय स्वभावधर्मच आहे. असे म्हणतात की, दहा इंग्लिश कुटुंबांपैकी पाच कुटुंबात कुत्रा पाळलेला असतो.

माणूस व कुत्रा यांचे एवढे सख्य जमण्याचे मुख्य कारण म्हणजे कुत्र्यामधील इमानदारीचा गुण. एक प्राणी दुसऱ्या प्राण्याशी इतका एकनिष्ठ असल्याचे सबंध प्राणिजगात दुसरे उदाहरण नाही. एकदा आपला मालक ठरला की कुत्रा जन्मभर त्याच्याशी इमान राखून असतो. आपला मालक गरीब आहे का श्रीमंत आहे, तो झोपडीत राहातो की प्रासादात राहातो, तो आपल्याला काय व किती चांगले खाऊ घालतो, असे मतलबी विचार कुत्र्याच्या मनात स्पर्श सुद्धा करीत नाहीत. तो आपल्या मालकावर व त्याच्या कुटुंबातील इतर सर्व माणसांवर निःस्वार्थपणे प्रेम करीत राहातो व त्यांची सेवा बजावतो. एखाद्या गरिबाघरचा कुत्रा कुणी राजाच्या राजवाडयात नेऊन सोडला तर पहिली संधी मिळता क्षणी तो आपल्या त्या गरीब मालकाच्या झोपडीकडे धाव घेईल. कुत्र्यांच्या अनेक जाती आहेत. त्यांचे आकार व रूपे यांत कितीतरी वेगळेपणा आहे हे आपण पाहिले. पण चमत्कार असा की इमानदारीचा गुण सर्व जातींमध्ये सारखाच आढळतो, त्यात कमीजास्त असे नसते. स्पॅनियल किंवा बुलडॉग जातीचा कुत्रा मालकाच्या जिवाला जीव देईल तसा अगदी गावठी जातीचा कुत्राही देईल.

माणसाने प्रेम करावे, जीव लावावा असे कुत्र्यामध्ये आणखी कितीतरी गुण आहेत. मालकाच्या भावनांना, मूड्सना प्रतिसाद देण्याचा कुत्र्याचा गुण तर केवळ अजोडच. मालक आनंदात असेल तर कुत्रा आनंदाने त्याच्याभोवती उडया मारील, उडेल, बागडेल, मालकाला काही दुःख झाले असेल तर कुत्रा मलूल व बेचैन होईल. मालक रागवला तर कुत्रा निमूटपणा धारण करील. मालक टेबलापाशी काम करीत असेल किंवा वाचनात मग्न असेल तर कुत्रा पायात मान घालून त्याच्याजवळ स्वस्थ पडून राहील. मालक दिवसभर काम करून घरी परतला की कुत्रा घरातून उडया मारीत येऊन फाटकापाशी शेपटी जोरजोरात



हलवून त्याचे आनंदाने स्वागत करील—आणि गंमत अशी की कुत्र्याचा आनंद त्याच्या डोळ्यात अगदी स्पष्टपणे उपटतो. मालकाबरोबर फिरायला जाण्यात तर कुत्र्याला भलतीच मजा वाटते. मालकाच्या पुढेमागे करीत, टणाटण उड्या मारीत, फिरण्यातला आपला आनंद तो व्यक्त करतो. कुत्र्याचा एक विशेष हा की तो स्वतःला घरातल्या माणसासारखाच एक जमजतो. म्हणजे आपण कुणी कमी आहोत अशी भावनाच त्याच्या ठिकाणी नसते. सगळ्या घरात तो मुक्तपणे संचार करील. म्हाताऱ्या आजोबांपासून तर दोन वर्षांच्या मुलांपर्यंत सर्वांशी खेळीमेळीने वागेल आणि सर्वांकडून लाड करून घेईल. घरातले कुणी माणूस गावाला गेले तर कुत्र्याला तो वियोग सहन होत नाही. ते माणूस गावाहून परतले की कुत्र्याच्या आनंदाला इतके भरते येईल की मागच्या दोन पायावर उभे राहून पुढचे पाय घरी परतलेल्या माणसाच्या छातीशी भिडवून तो आपला हर्ष व्यक्त करील. मिठी मारून आलिंगन देता येत नाही, नाहीतर तेही त्याने केले असते.

कुत्र्यासारखा खेळकर प्राणी मानवेतर प्राण्यांत दुसरा कुणी नसेल. मोकळ्या मैदानात दोन कुत्रे पळापळी, धराधरी, लपंडाव, लुटुपुटूची लढाई वगैरे खेळ



खेळताना तुम्ही पाहिले असेल. तुम्हा मुलांच्या खेळात जसे डावपेच व चुरस असते तशी कुत्र्यांच्या खेळात असते. कुत्र्यांच्या या खेळकरपणामुळेच मुलांची आणि कुत्र्यांची नेहमीच गट्टी जमते. पण कुत्रे जसे खेळकर तसे भांडखोरही हं! दुसऱ्या गल्लीतला कुत्रा आपल्या गल्लीत आलेला कोणत्याही कुत्र्याला सहन होणार नाही. त्या कुत्र्यावर तो घसा खरवडून भुंकेल, त्याच्यावर तुटून पडेल आणि चावे काढून त्याला जखमी सुद्धा करील. अनेक वन्य पशु-पक्ष्यांमध्ये ज्याला 'प्रादेशिकता' (territorialism) म्हणतात ती वृत्ती प्रखरपणे असते. ते आपआपले टापू ठरवून घेतात आणि दुसऱ्या टापूतला कोणी प्राणी आपल्या टापूत आला तर त्याच्यावर तुटून पडतील आणि लढाई करून त्याला आपल्या टापूतून हुसकावून लावतील. कुत्रे रानटी अवस्थेत होते तेव्हाची ही सवय त्यांनी आजही टिकवून ठेवली आहे. कुत्र्यांनी रानटी अवस्थेतील आणखी एक सवय अजून जपून ठेवली आहे. तुम्ही पाहिले असेल की एखादा कुत्रा कुठे निघाला की रस्त्यात मध्ये दिसेल त्या दगडावर मागचा एक पाय वर करून लघवी करतो आणि पुढे जातो आणि परतताना तो त्या दगडांचा वास घेत येतो. कुत्र्याची ही सवय चमत्कारिक वाटते. पण त्याचे असे आहे की रानटी अवस्थेत कुत्रे आपल्या वस्तीच्या ठिकाणापासून दूर दूर शिकार करायला जात. तेथून परत येण्यासाठी वाटेवरच्या दगडांवर लघवी करून ते वस्तीच्या ठिकाणाचा माग ठेवत. आणि ते दगड हुंगत परत येत. ही प्राचीन सवय कुत्र्यांनी माणसाळलेल्या अवस्थेतही तशीच ठेवावी, ही गंमत नाही का?

पृथ्वीवरचे सर्व कुत्रे माणसाळले आहेत असे मात्र नाही हं! आजही जंगाच्या अनेक भागांत रानटी कुत्रे आहेत. आपल्याकडे मध्य भारतातील जंगलांत असे

२६०३ ६।०।९२
बा.वा.



रानटी कुत्रे आढळतील. या कुत्र्यांचे कळप असतात आणि ते कळपानेच शिकार करतात. लांडगा हा प्राणी आपण सर्वात क्रूर समजतो आणि तसा तो असतोही. पण प्राणी निरीक्षकांच्या मते रानटी कुत्रे लांडग्यांपेक्षाही अधिक हिंस्र असतात. रानरेडे, नील गायी, सांबरे यांसारख्या आपल्यापेक्षाही आकाराने मोठ्या प्राण्यांना एकेकटे गाठतात आणि त्याच्यावर मागून पुढून हल्ला चढवून त्याचा हां हां म्हणता फडशा पाडतात.

माणूस अनेक जनावरे पाळतो आणि त्यांच्याकडून कामे करून घेतो. पण या सर्वांमध्ये कुत्रा हा त्याच्या अधिक जवळचा व जिवाभावाचा, कारण कुत्रा त्याच्या भावनांना खरीखुरी साथ देतो. म्हणूनच जागतिक वाङ्मयात कुत्रा अनेकदा आला आहे. कुत्रा 'हिरो' असलेल्या कथा-कादंबऱ्या पुष्कळ आहेत. कुत्र्यावर चित्रपट तर अनेक निघाले आहेत. महाभारतात, पांडवांच्या अखेरच्या महानिर्वाणाच्या प्रसंगाचे वर्णन आहे. पांडव आपल्या परिवारासह महानिर्वाणास हिमालय पर्वतात गेले, तेव्हा डोंगराची चढण चढताना परिवारातल्या एकेकजण मृत्युमुखी पडला. पाच पांडवांतल्या सहदेव, नकुल, अर्जुन आणि भीम यांचे या क्रमाने प्राणोत्क्रमण झाले. राहता राहिला धर्म. शेवटच्या क्षणी त्याच्याबरोबर होता तो फक्त त्याचा कुत्रा. दोघांनी मग बरोबरच देह ठेवले. मनुष्य आणि कुत्रा यांच्या स्नेहबंधनाचे हे केवढे भव्योदात्त चित्र आहे. शिवाजी महाराजांच्या निधनानंतर त्यांच्या चितेत त्यांच्या कुत्र्याने उडी घेऊन जीव दिला ही कथा तुम्हाला माहित असेलच. माणूस व कुत्रा यांच्यातील ही निःस्वार्थ मैत्री व प्रेमभाव दहा हजार वर्षांपासून चालत आला आहे, यापुढेही तो असाच चालू राहील.

कुत्र्यांच्या पन्नासाहून अधिक जाती असतील. यांतील काही त्या त्या भागातील भौगोलिक परिस्थितीनुसार निर्माण झाल्या आहेत. पण माणसाने भिन्न भिन्न जातींचा संयोग करून पैदा केलेल्या जातीही अनेक आहेत. काही जातींचे कुत्रे उंच, सडसडीत बांध्याचे व लांबसर तोंडाचे, तर काही बुटबैंगण थापटक्या तोंडाचे व बसकट नाकाचे. काहींच्या अंगावर अस्वलीसारखे भरपूर केस, तर काही बिनकेसाळ व तुकतुकीत अंगाचे. कातडीच्या रंगाच्या बाबतीतही खूप वैचित्र्य आढळून येते.

काहींचा रंग काळा कुळकुळीत, काहींचा पांढरा शुभ्र, तर काहींचा तपकिरी व चॉकलेटी. ठिपक्यांच्या बाबतीतही अशीच विविधता. एक गंमत. काही जातींच्या कुत्र्यांच्या शेपट्या पाठीवर वाकड्या उभ्या राहातात, तर काहींच्या कोल्हया-लांडग्यांसारख्या मागच्या पायांत लोंबत्या असतात. तेव्हा 'काहीही करा, कुत्र्याची शेपूट वाकडी ती वाकडी' ही म्हण मर्यादित प्रमाणावरच खरी आहे.

कुत्रे भुंकतात त्यामागे बचाव व आक्रमण असे दोन्ही हेतू असतात. प्रसंग असेल त्याप्रमाणे गुरगुरण्यापासून ते दात विचकून फुस्कारण्यापर्यंत कुत्र्याच्या भुंकण्याचे चढउतार असतात. कुत्रा भुंकण्यातून आपला निषेध, राग व द्वेष व्यक्त करीत असतो. पण कुत्र्याचे भुंकणे ही एकूण अजबच गोष्ट. घसा फोडून एवढ्या मोठ्याने एकसारखा आवाज करीत राहाणारा दुसरा कोणताही प्राणी नाही. तुम्ही ऐकले असेल, रात्रीच्या वेळी एखादा कुत्रा तासन्‌तास उसंत न घेता भुंकत राहातो. तो कुणावर व का भुंकत असतो ते त्याचे त्यालाच माहीत! कुत्रा तोंडातून जीभ लांब बाहेर काढून ल्हचा ल्हचा करीत असलेला तुम्ही पुष्कळ वेळा पाहिले असेल. तो असे करतो ते काही दमछाक झाल्यामुळे नव्हे, तर उष्णतेमुळे. वातावरणातील उष्णता सहन व्हावी म्हणून आपण आपल्या कातडीच्या छिद्रांमधून घाम बाहेर टाकतो आणि शरीर थंड करून घेतो. कुत्र्याच्या कातडीवर अशी छिद्रे नसतात. तो जीभ बाहेर काढून धापा टाकून तो बाहेरची हवा शरीरात घेतो आणि अशा रीतीने शरीराला थंडावा आणतो.



कुत्र्याचे घ्राणेंद्रिय हे प्राणिसृष्टीतील एक महान आश्चर्य आहे. खरे तर कुत्र्याला दोन घ्राणेंद्रिये असतात. एक बाहेरचे नाक आणि दुसरे त्याच्या तोंडात वरची टाळू व पुढच्या दातांच्या मागच्या बाजूस असते. कुत्र्याचे घ्राणेंदिय हे माणसांच्या घ्राणेंद्रियापेक्षा काही हजार पटींनी तीक्ष्ण असते असे प्राणिशास्त्रज्ञ सांगतात. अनेक वासांच्या मिश्रणामधून अमूक एक वास कुत्र्याचे नाक नेमका टिपू शकते. तसेच सूक्ष्मातील सूक्ष्म वास, त्याचप्रमाणे खूप दूरवरचा वास कुत्रा बरोबर पकडू शकतो. एवढेच नव्हे तर एखाद्या प्राण्याचे किंवा वासयुक्त वस्तूंचे मागे राहिलेले वास त्याला टिपता येतात. आहे की नाही आश्चर्य? अशा अती तिखट नाकामुळे कुत्रा हा मार्ग काढण्यात सर्व जनावरांमध्ये पटाईत समजला जातो. शिकारीसाठी म्हणून तर त्याची योजना करतात. याच कारणासाठी पोलीस अलीकडे चोर, दरोडेखोर, खुनी वगैरे गुन्हेगार पकडण्याकरिता कुत्र्यांचा मोठ्या प्रमाणावर उपयोग करून घेऊ लागले आहेत. गुन्हेगार गुन्हा करून ज्या वाटेने पळाला असेल ती वाट नुसती हुंगत जाऊन कुत्रा तो गुन्हेगार जेथे लपून बसला असेल तेथपर्यंत पोचू शकतो. कुत्र्यांनी आजवर या प्रकारे अनेक गुन्हेगार पकडून दिले आहेत.



# मांजर

मांजर हा खरोखरी एक अजब प्राणी आहे. कित्येक हजार वर्षे झाली. रानातले आपले वास्तव्य सोडून देऊन मांजर माणसाच्या आश्रयाला येऊन राहिले. पण माणसावर त्याचा पुरता विश्वास नाही आणि म्हणून माणसाचाही त्याच्यावर नाही. कुत्रा हा खऱ्या अर्थाने माणसाचा मित्र आहे, तसे मांजराच्या बाबतीत म्हणता येणार नाही. काही लोक मांजरे पाळतात आणि अशी पाळलेली मांजरे मालकाच्या प्रेमाला साथ देतात. पण हे काही हातचे राखूनच. याचे कारण, माणसाच्या वस्तीला राहूनही मांजर आपले स्वातंत्र्य गमवायला तयार नाही. कुत्रा जसा सर्वस्वी माणसावर अवलंबून राहतो तसे मांजर नाही. ते आपल्या पोटापाण्याची व्यवस्था स्वतःच करील, आपले भक्ष्य स्वतःच शोधून काढील, विश्रांतीसाठी आपल्या आवडीची जागा हेरून ठेवील आणि आपली अंगसफाई आपण स्वतःच करील. याचा अर्थ मांजर माणसाला धूप घालीत नाही असा नाही. मालक जर चांगले खाऊपिऊ घालत असेल तर मांजराला त्याच्याविषयी आपलेपणा निर्माण होतोही. मांजराला मालकाविषयी नव्हे तर त्या जागेविषयी प्रेम असते असा जो एक समज सर्वत्र आढळून येतो तो सर्वस्वी चुकीचा आहे. मालक जागा सोडून दूर निघून गेला तर पाळीव मांजर हजारो मैलांचा प्रवास करून त्याला त्याच्या नव्या ठिकाणी येऊन मिळते अशी अनेक उदाहरणे घडली आहेत. अशा दीर्घ प्रवासात मांजर आपल्या खाण्यापिण्याची व विश्रांतीची योग्य ती व्यवस्था करते हे त्याच्या बुद्धीचे उत्तम लक्षण आहे.

पण एक गोष्ट मात्र निश्चित की मांजर हा आपल्या कलाने वागणारा प्राणी आहे. एक मांजर दुसऱ्या मांजरासारखे वागेल याबद्दल काहीच खात्री देता येणार नाही. प्रत्येकाची पसंती-नापसंती वेगळी असते. म्हणून मांजरांबद्दल सर्वसाधारण विधान जरा जपूनच केले पाहिजे. पण मांजरांमध्ये आढळून येणारी एक समान प्रवृत्ती म्हणजे, मांजर नेहमी एकाकीपण पसंत करते. कुत्र्याला तुम्ही मोकळे सोडले तर तो दुसऱ्या कुत्र्यांची संगत शोधील, कुणी साथीदार मिळाला की त्याच्याबरोबर हिंडेल आणि जमले तर खेळही खेळेल. पण दोन मांजरे बरोबरीने हिंडताहेत असे दृश्य तुम्हाला कधीसुद्धा दिसायचे नाही.

मांजर निरनिराळ्या प्रकारचे आवाज काढून आणि हावभाव करून आपले मन व्यक्त करीत असते. हे आवाज आणि हावभाव व त्याची भाषा खरोखर शिकण्यासारखी असते. मालकापाशी आपले मनोगत व्यक्त करण्याच्या

मांजरांच्या काही विशिष्ट पद्धती असतात. मालकाच्या पायाला अंग घासणे, गळयातून अगदी मृदू व बारीक असा "म्याव म्याव" आवाज काढणे, शेपटीची हळुवार हालचाल करणे, मालकाच्या मांडीवर डोळे मिटून स्वस्थ बसून राहणे, असे अनेक प्रकार करून मांजरे मालकाविषयीचे आपले प्रेम व इमानदारी व्यक्त करते. मांजरासाठी आपण जे आवाज करतो तेही त्याला चांगले कळतात. आपण "हाड" म्हटले की ते आपल्याला हुसकावून देण्यासाठी आहे हे लक्षात घेऊन मांजर पळून जाते. आपण "फिसफिस" केले की ते बोलावण्यासाठी आहे हे मांजर लक्षात घेते. पाळीव मांजर असेल तर ते जवळ येईल. पण तुम्ही अगदी दुधाची वाटी समोर ठेवून "फिसफिस" केले तरी मांजर जवळ येईलच याची खात्री नाही. कारण दुधाच्या वाटीचे आमीष दाखवून तुम्ही पाठीत रट्टा घालणारच नाही याबद्दल मांजराला खात्री नसते. स्वयंपाकघरात त्याने जे चौर्यकर्म केलेले असते त्याबद्दल तुम्ही अशा प्रकारे शिक्षा तर करीत नाही ना, असा संशय मांजराच्या मनात येतो आणि त्याचा संशय नेहमीच खोटा असतो असे नाही. कारण कधी कधी तुमचा तसा डाव असतोही. तेव्हा मांजर सर्व प्रकारे सावधगिरी बाळगूनच तुमच्या "फिसफिस"ला साथ देते. मांजराचा हा संशयखोरपणा त्याच्या बुद्धीचे निदर्शक आहे. मांजर हा प्राणी जरी असा संशयखोर, सावध व अलिप्त असला तरी त्याची पिल्ले मात्र अतिशय खेळकर असतात. मांजराचे वय वाढते तसा त्याच्यात अलिप्तपणा येतो व ते एकाकी होते.

मांजराचे "म्याव म्याव" हे बहुधा माणसासाठी असते. इतर मांजरांना ते म्याव म्याव करीत नाही. आपल्या बांधवांसाठी ते जसा प्रसंग असेल त्याप्रमाणे निरनिराळे आवाज काढते. कधी ते गुरगुरते, कधी फुसफुसते, कधी किंचाळते; कधी भेडसावणारा तर कधी अगदी आर्त केविलवाणा आवाज काढते. मांजर तोंडावर आविर्भाव आणून किंवा अंगविक्षेप करूनही आपल्या भावना व्यक्त करते. मांजराच्या चेहऱ्यावर आनंद, समाधान, वेदना, तिरस्कार व भीती हे भाव व्यक्त होतात. ते कान पुढे करून आनंद व अपेक्षा व्यक्त करते. त्याने कान डोक्याच्या मागे नेले की समजावे, मांजर रागावले आहे.

मांजराला आपली अप्रतिष्ठा झालेली कधीच सहन होत नाही. याच कारणासाठी ज्या गोष्टीपासून त्याला काही फायदा नाही ती ते कधीही करणार नाही. माकडे, कुत्रे वगैरे प्राण्यांच्या बुद्धीची रंगीत तबकड्या, गोट्या वगैरे साधनांनी कसोटी करण्यात येते. अशा कसोट्या मांजराच्या बाबतीत पूर्णपणे निरुपयोगी ठरतात. त्याचे कारण, मांजराला स्वतःचे मन आहे आणि सांगकामेपणा त्याला अजिबात मान्य नसतो. म्हणून ज्यापासून काही मिळायचे नाही अशी अगदी साधी कृती वा खेळ ते शिकणार नाही. याउलट त्याला हवी असलेली वस्तू मिळवायची असेल तर मांजर असा पराक्रम करील की पाहात रहावे. मांजराकडून आज्ञाधारकपणाची कधीही अपेक्षा करू नये. ते आपल्या मनाप्रमाणेच वागणार. त्याच्या दृष्टीत एक विलक्षण असा निर्विकारपणा असतो. त्यामुळे त्याच्या डोक्यात काय विचार चालले आहेत याचा तुम्हाला कधीच थांगपत्ता लागत नाही.

मांजर हा एक मांसभक्षक प्राणी आहे. तो स्वभावतः शिकारी आहे. उंदीर, घुशी हे त्याचे प्रमुख खाद्य. पण पुष्कळ वेळा घूस मांजराच्या पुढ्यातून जाते तरी मांजर काही करत नाही असे दृश्य दिसते. यावरून मांजर घुशीला घाबरते असा जो समज आहे तो मात्र चुकीचा आहे. उंदीर जर हवे तेवढे मिळतात तर घुशीशी सामना करण्यात शक्ती कशाला वाया दवडा, असा मांजराचा साधा सरळ हिशेब असतो. उंदराखेरीज पाली, किडे, चिमण्या, कबुतरे, कोंबड्या हे प्राणीही मांजराचे भक्ष्य होतात. पण त्याचा मुख्य भर असतो उंदरावरच. उंदीर नाहीच मिळाले तर मग ते या प्राण्यांकडे आपला मोर्चा वळवते.

मांजराचे डोळे हा त्याचा सर्वात वैशिष्ट्यपूर्ण असा अवयव होय. कधी निळसर घारे तर कधी निळसर हिरवे असे त्याचे डोळे दिसतात. मांजराला अंधारात चक्क दिसते असा एक सर्वसामान्य समज आहे पण तो बरोबर नाही. मांजराला अंधारात दिसते याचा अर्थ इतकाच की अंधुक प्रकाशात मांजराला इतर प्राण्यांपेक्षा अधिक चांगले दिसते. मिट्ट काळोखात मांजराला दिसत नाही. दिसण्यासाठी अंधुकसा उजेड त्यालाही हवा असतो. मांजर त्याच्या रानटी



अवस्थेत वाघ-सिंहाप्रमाणे एक निशाचर प्राणी होते आणि हा स्वभावधर्म त्याने टिकवून ठेवला आहे. ते आपला शिकारीचा उद्योग जास्त करून चंद्रप्रकाशात करते. अनेक निशाचर प्राण्यांना त्यांच्या डोळ्यांतील मज्जापटलातून आत जाणाऱ्या प्रकाशाचे प्रमाण वाढविता येते, कारण त्याच्या नेत्रगोलात या मज्जापटलाच्या मागे प्रकाश परावर्तित करणारा एक खास पडदा असतो. त्याला इंग्रजीत 'टेपटम' असे म्हणतात. या 'टेपटम'मुळे रात्रीच्या वेळी मांजराच्या डोळ्यांवर प्रखर प्रकाश पडला असता ते काजव्यासारखे चमकतात. याच कारणासाठी प्राचीन इजिप्शियन लोक मांजराला पवित्र मानीत असत. रात्री सूर्य माणसापासून लपतो, तो मांजराच्या डोळ्यांत प्रतिबिंबित होतो अशी त्या लोकांची कल्पना होती.

मांजराच्या डोळ्यांची आणखी एक गंमत म्हणजे, त्याच्या डोळ्यांत असा एक स्नायू असतो की ज्याच्या योगे त्याचे बुबुळ जसा उजेड असेल त्याप्रमाणे प्रसरण पावते किंवा आकुंचन पावते. अंधुक उजेडात मांजराचे बुबुळ पूर्ण मोठे होते आणि ते जास्तीत जास्त प्रकाश आतल्या मज्जापटलाकडे पाठविते. प्रखर उजेडात बुबुळ बारक्या फटीएवढे आकुंचित होते आणि बाहेरच्या प्रखर उजेडाला मज्जाव करते. अशा रितीने प्रसरण व आकुंचन पावणाऱ्या बुबुळांच्या साहाय्याने मांजर प्रकाशात अकस्मात होणाऱ्या बदलांशी दृष्टी जुळवून घेते.

आपल्याला दोन पापण्या असतात, तर मांजराला तीन. त्याची ही तिसरी पापणी डोळ्याच्या नाकाकडे असलेल्या टोकाशी खालच्या बाजूस असते व ती काढती-घालती असते. ती वर आली की बुबुळाचा काही भाग झाकला जातो.





मांजर आजारी असते तेव्हा त्याची ही तिसरी पापणी स्पष्ट दिसते. पण मांजराच्या डोळ्यांची रचना एवढी कार्यक्षम असूनही मांजर रंगआंधळे असते. म्हणजे त्याला वस्तूंचे रंग दिसत नाहीत, तर त्या काळ्या व पांढऱ्या छटांमध्ये दिसतात. आहे की नाही मजा!

मांजराचे कानही अतिशय तिखट असतात. त्याची श्रवणशक्ती माणसाच्या कितीतरी पटीने अधिक असते. कुत्र्यापेक्षासुद्धा मांजराचे कान अधिक तीक्ष्ण असतात. मांजराच्या कानाच्या कर्ण्यांमध्ये सत्तावीस असे खास स्नायू असतात व त्यांच्या सहाय्याने मांजर आवाज पकडण्याकरिता कानाचे कर्णे निरनिराळ्या दिशांना सहजगत्या फिरवू शकते. मांजराची जीभ लांबसडक, सपाट व टोकाला थोडीशी निमुळती असते. जिभेवर सर्वत्र पांढऱ्या रंगाच्या रुचिकळ्या पसरलेल्या असतात. जीभ लांब काढून मांजर मान व पाठीचा मध्यभाग सोडल्यास बाकीचे सर्व अंग स्वच्छ धुऊन काढते. स्वच्छता हा मांजराचा मोठा गुण आहे. अंगावर थोडासासुद्धा चिखल, माती वा इतर घाण मांजराला सहन होत नाही. सकाळ झाल्यावर मांजर पहिले काम जर कोणते करीत असेल तर ते म्हणजे घराच्या छपरावर बसून अंग साफ करणे हे होय. अशी अंगसफाई एकदा आटोपली की मग ते दिवसाच्या उद्योगाला लागते.

मांजराच्या अनेक जाती आहेत. या जातींचे दोन प्रमुख गट पडतात–एक लांब केसांच्या जातींचा आणि दुसरा आखूड केसांच्या जातींचा. जगात जेथे

माणसांची वस्ती आहे अशा बहुतेक सर्व भागांत मांजरे आहेत. आपल्या राज्यात देशावर सर्वत्र भुऱ्या केसांची मांजरे आढळतात. हे मांजर तेवढे आकर्षक नाही. पण कोकणपट्टी व विशेषतः मुंबई शहरात शुभ्र पांढऱ्या व पिवळ्या रंगाची मांजरे आढळतात, ती दिसायला खरोखर सुंदर असतात. माजलेला निबरट बोका सोडला तर मांजर हा सडसडीत, काटक व बांधेसूद प्राणी आहे. त्याच्या ठिकाणी तरतरीत सौंदर्याचा व त्याचप्रमाणे मूक शक्तीचा प्रत्यय येतो. आपली शक्ती योग्य त्या जागीच वापरण्याचे शहाणपण मांजरात असते. कुत्रे मागे लागले तर मांजर पुढे पळत राहून त्याला पाठलाग करू देते. काही कारण नसताना उगाच लढाई कशाला अशी त्याची वृत्ती असते. पण वेळ आलीच तर उलटून, दात विचकून, पाठ उंचावून आणि घशातून गुरकावणीचा आवाज काढून ते असा काही रुद्र अवतार धारण करते की पाठलाग थांबवून कुत्रा जागच्याजागी थबकतो आणि मग यशस्वी माघार घेतो. कुत्रा फार मोठ्या आकाराचा नसेल तर मांजर लढाईत त्याची डाळ शिजू देणार नाही—कुत्र्यावरच उलट फजितीची पाळी येईल.

मांजर हा प्राणी या भूतलावर गेली सुमारे अडीच ते तीन कोटी वर्षे अस्तित्वात आहे असे शास्त्रज्ञ सांगतात. तो माणसाच्या सोबतीला कसा व केव्हा आला हे निश्चितपणे सांगता येण्यासारखे नसले तरी साधारण अंदाज असा आहे की माणसाने मांस भाजण्यासाठी अग्नीचा उपयोग सुरू केल्यावर मांजराने माणसाची संगत धरली. उबदार जागेच्या शोधात मांजराला अग्नीचे सान्निध्य मोठे सोयीचे वाटले असावे. शिवाय माणसाच्या खाण्यातून उरलेले मांसाचे तुकडे व हाडे आयतीच मिळाल्यामुळे मांजराची अन्नाची ददात थोडीफार मिटली. उलटपक्षी, माणसाला तो राहात असलेल्या गुहा वा खोपटयांमध्ये उंदीर, घुशी वगैरे प्राण्यांचा जो उपद्रव होत असे तो मांजरांमुळे कमी झाला. अशा रीतीने ही संगत दोघांसही फायद्याची ठरली आणि आज कित्येक हजार वर्षे ती टिकून राहिली आहे.

मांजर जंगल सोडून माणसाच्या आश्रयाला आले तरी त्याचे काही भाईबंद अद्यापही जंगलात आहेत. त्यांना आपण रानमांजर असे म्हणतो. रानमांजर आणि घरमांजर अशा दोन जाती त्यांच्या या प्रकारच्या वास्तव्यावरून पडल्या आहेत. रानमांजर घरमांजरापेक्षा आकाराने बरेच मोठे असते आणि अधिक हिंस्र व आक्रमक दिसते. पण दोघांच्या स्वभावात व प्रवृत्तीत तसा फारसा फरक आढळत नाही. याचा अर्थ असा की घरमांजराने वन्य अवस्थेतील आपल्या वृत्तींत विशेष बदल घडवून आणलेला नाही. मांजराने आपले जंगलचे स्वातंत्र्य टिकवून ठेवले याबद्दल खरे तर त्याच्या बुद्धीची तारीफच करायला हवी. माणसाला त्याने कधीच शरणचिठ्ठी लिहून दिली नाही.

माणूस व मांजर यांचे संबंध अशा प्रकारे फार जिव्हाळ्याचे व प्रेमाचे नसले तरी माणसाला सदोदीत आपल्या निकट वावरणाऱ्या या प्राण्याचा विसर पडणे शक्यच नाही.जगातील सर्व देशांच्या लोकजीवनात मांजराला स्थान मिळालेले आहे. आता हेच पाहा ना, मांजरावरून आपल्या भाषेत कित्येक म्हणी पडल्या आहेत. एखाद्या गोष्टीतले सुख तेवढे पाहतो आणि धोक्याकडे दुर्लक्ष करतो हे

कोणाच्या लक्षात आणून द्यावयाचे असेल तर—"घी देखा लेकिन बडगा नहीं देखा" (तूप पाहिले पण सोटा पाहिला नाही) ही मांजराला उद्देशून असलेली म्हण आपण वापरतो. पण खरे सांगायचे तर ही म्हण मांजराला अन्याय करणारी आहे. सोटा आणि सोटा मारणारा जवळपास नाही याची पक्की खात्री करून घेतल्यावरच तुपाच्या बरणीवर धाड घालावी इतपत सावधगिरी मांजर नक्कीच बाळगते. दहा वेळा त्याने तुपाची बरणी फस्त केली तर फार झाल्यास एखाद-दुसऱ्या वेळेस त्याची व तुमच्या सोटयाची गाठ पडेल आणि तेव्हासुद्धा सोटा त्याच्या पाठीत बसण्याऐवजी खिडकीवर किंवा दारावर नुसताच आपटण्याची शक्यता अधिक. कारण मार चुकविण्यातील मांजराची चपळाई येथे आपण लक्षात घेतली पाहिजे.

"मांजराच्या गळयात घंटा कुणी बांधायची?" ही म्हणही तुमच्या कानावर अनेक वेळा पडली असेल. या म्हणीच्या मागची कथा अशी की एकदा एका मांजराने उंदीर खाण्याचा सपाटा चालविला, तेव्हा त्या भागातील समस्त उंदीर मंडळींनी एक सभा घेतली आणि आपल्या जातीवर उठलेल्या त्या मांजराचा तीव्र शब्दांत धिक्कार केला. मांजर जवळपास आले तर त्याची चाहूल लागून उंदरांना सावध होता यावे म्हणून त्या मांजराच्या गळयात घंटा बांधावी असा उंदरांच्या या सभेने एकमताने ठराव पास केला. पण प्रश्न असा पडला की, मांजराच्या गळयात घंटा बांधायची कुणी? कारण जो उंदीर घंटा बांधायला जाईल तो परत येण्याची शक्यता नाही आणि घंटा बांधायचे काम तसेच राहून जाईल. उंदरांना हा शहाणपणा सुचल्यानंतर त्यांचा ठराव दप्तरी पडून राहिला हे सांगायला नको. एखादे काम किती अवघड आहे हे लक्षात न घेता उगाच अगोदर वल्गना करणाऱ्यांना उद्देशून ही म्हण वापरायची असते.

मांजराभोवती शुभ-अशुभ कल्पनांवर आधारलेल्या काही समजुती लोकांमध्ये आढळून येतात. "मांजर आडवे गेले तर काम होत नाही", "मांजर हातून मेले तर सोन्याचे मांजर बनवून ते काशीत जाऊन तेथल्या देवाला अर्पण करावे" अशा काही समजुती आहेत. या समजुती अर्थातच भ्रामक असून आजच्या विज्ञानयुगात कोणीही शहाणा माणूस त्यांवर विश्वास ठेवणार नाही. पण मांजरांसंबंधी अशा भ्रामक समजुती आपल्याच देशात आहेत असे नव्हे. इंग्लंडमध्ये पूर्वीच्या काळी चेटकिणी चेटूक करण्याकरिता मांजराचा उपयोग करतात, एवढेच नव्हे तर कधी कधी त्या स्वतः मांजराचे रूप घेतात असा एक समज लोकांमध्ये प्रचलित होता. १७१८ साली स्कॉटलंडमधील काइथनेस या गावाच्या विल्यम मॉंटगॉमेरी नावाच्या एका माणसाने चेटूक झाल्याच्या संशयावरून एके दिवशी रात्री आपल्या घरापाशी अनेक मांजरे गोळा केली आणि त्यातली दोन कुऱ्हाडीने ठार मारली व इतर जखमी केली. दुसऱ्या दिवशी त्या गावात दोन म्हाताऱ्या मेल्या व एका म्हातारीच्या पायास कशाने तरी जखम झाली. यावर आपण मारलेल्या मांजराची रूपे याच म्हाताऱ्यांनी चेटूक करण्याकरिता घेतली होती असे मॉंटगॉमेरी लोकांस सांगू लागला आणि अज्ञ लोकांचा त्यावर विश्वासही बसला. इंग्लंडमध्ये काळे कुळकुळीत मांजर हे भाग्यदायक समजतात आणि असे मांजर रस्त्यात आडवे आले तर ते शुभ लक्षण मानतात. मांजर अणि

हवामान यांच्याशी निगडित अशा काही समजुती इंग्लंडमधील खेड्यांतील लोकांत आढळतात. बोटीवरचे मांजर सारखे म्याव म्याव करू लागले तर प्रवासात संकटे येणार, मांजर खेळू-बागडू लागले तर समुद्रावर वादळ उठणार, बोटीवरच्या एखाद्या माणसास बोटीच्या प्रवासात विघ्न आणायचे असेल तर त्याने बोटीवरचे मांजर भांड्याखाली झाकून ठेवावे, वगैरे समजुती खलाशांमध्ये असतात. बोटीवरचे मांजर समुद्रात फेकले तर ताबडतोब वादळ उठते अशीही एक समजूत खलाश्यांमध्ये आहे. पण बोटीवरचे मांजर भाग्यदायक समजण्यात येत असल्याने असे "दुष्कर्म" कोणी करीत नाही. उलट बोट बुडण्याचा प्रसंग उद्भवला तर सर्वप्रथम बोटीवरच्या मांजराला वाचविण्यात येते. मांजरांविषयी अशा समजुती सर्वच देशांत प्रचलित आहेत. या समजुती अर्थातच वेडगळपणाच्या आहेत. पण आपल्या लोकजीवनात मांजराला काही विशिष्ट स्थान आहे एवढे मात्र त्यावरून म्हणता येईल.

प्राचीन धर्मग्रंथ, पुराणे व लोककथांमध्ये मांजराला पुष्कळच महत्त्वाचे स्थान मिळालेले आहे. आपल्या भारतात चार-साडेचार हजार वर्षांपूर्वी लिहिल्या गेलेल्या संस्कृत वाङ्मयात मांजराचे उल्लेख सापडतात. याचा अर्थ असा की भारतात त्या काळापासून मांजर आहे. इजिप्तमधील प्राचीन लोक तर मांजराला देवासमान मानून त्याची पूजाअर्चा करीत असत. त्यांनी देवळांच्या भिंतींवर व थडग्यांवर काढलेली चित्रे, कोरीव कामे वगैरेंत मांजराची प्रतिमा असते. तसेच ते



लोक आपल्या राजे-राण्यांच्या मृतदेहात भुसा भरून त्यावर दगडाच्या समाध्या बांधीत. समाधीखालील अशा मृत देहांना 'ममी' असे म्हणतात. इजिप्तमध्ये मांजराच्या अनेक ममी सापडल्या आहेत. यावरून ते लोक मांजराला किती थोर व पवित्र मानत हे दिसून येते.


आकाशात संध्याकाळी मावळणारा सूर्य रात्री मांजराच्या डोळ्यात येतो असा एक समज प्राचीन इजिप्शीयन लोकांमध्ये प्रचलित होता हा उल्लेख तर वर आलाच आहे. इजिप्शियन पुराणामध्ये मांजर हे सूर्याचे प्रतीक मानण्यात आले आहे. यासंबंधीची त्या पुराणातील कथा मोठी मजेशीर आहे. प्राचीन इजिप्शियन लोकांचा सूर्यदेव होता, त्याचे नाव होते रा. दुष्ट शक्तींचा मुकाबला करण्याकरिता रा मांजराचे रूप धारण करतो. राचे मुख्य शत्रू आहेत सर्प. सर्पदैत्यांचा राजा अपाप हा पाताळात खोल अंधारात राहतो. अपापाचे पारिपत्य करण्याकरिता सूर्यदेव रा मांजराचे रूप घेऊन रोज रात्री पाताळावर स्वारी करतो. हे देवरूपी मांजर सर्पदैत्यावर हल्ला चढवून त्याची चामडी लोळवते आणि त्याला रक्तबंबाळ करून सोडते. दिवसभर आकाशात तळपणारा सूर्य संध्याकाळी मावळल्यावर दुसऱ्या कोणत्या तरी जगात जात असावा या तर्कावर ही कथा आधारलेली आहे हे उघडच आहे. त्या काळी इजिप्तमध्ये मांजराचे महात्म्य एवढे होते की मांजर मारणारास देहांताची शिक्षा होत असे. एकदा एका रोमन सैनिकाने मांजर मारले तेव्हा संतप्त समुदायाने त्याला चेचून चेचून ठार मारले. घरातल्या मांजराची कुटुंबातील प्रत्येकजण भक्तिभावाने जपणूक करी. घराला आग लागली तर प्रथम मांजराला वाचविण्यात येई आणि मांजर मेल्यावर त्याचे सुतक पाळण्याकरिता कुटुंबातील माणसांनी आपल्या भुवया छाटल्या पाहिजेत असा कायदा होता.


इजिप्तप्रमाणेच जपानी लोकांचे पुराण व लोककथा यांमधेही मांजराकडे फार महत्त्वाची भूमिका असते. एक इटालियन लोककथा अशी आहे की मेरीने येशू ख्रिस्तास जन्म दिला त्याच क्षणाला एक मांजरही व्यायली. पूर्वीचे इटालियन चित्रकार येशूच्या जन्माच्या चित्रात हमखास एक मांजर दाखवितात ते या लोककथेच्या प्रभावामुळेच. युरोपात पंधराव्या शतकापर्यंत मांजराची पूजा करणाऱ्या लोकांचा एक गुप्त पंथ होता. पोप आठवा इन्नोसंट याने या मार्जार-भक्तांना हुडकून काढून चेटके म्हणून जाळून टाकावे अशी आज्ञा काढली होती.

प्राचीन काळात लोक मांजराला एवढे महत्त्व देत असत ते काही अकारण नव्हे. मांजरे त्यांच्या धान्यसाठ्यांचे उंदीर, घुशी, किडे वगैरेंपासून संरक्षण करीत असत. म्हणजे त्या काळी मांजराला एक आर्थिक मूल्य होते व त्यातून त्याला धार्मिक महत्त्व प्राप्त झाले. आजही धान्याचे साठे आणि ग्रंथालये व सरकारी कागदपत्रांचे संग्रह यांचे उंदीर-घुशींपासून संरक्षण करण्याकरिता मांजरे पाळण्यात येतात. संस्कृतीचा उदयही झाला नव्हता त्या काळापासून गेली दहा-पंधरा हजार वर्षे माणूस व मांजर यांचे हे साहचर्य व सहकार्य अखंड चालू आहे. मांजराच्या पाठीत सोटा घालताना तुमच्या डोक्यात हा विचार आला तर सोटाचा तडाखा कदाचित कमी होईल.

# चिमणी

चिमण्यांच्या पन्नासाहून अधिक जाती आहेत. पण माणसाच्या वस्तीच्या आसपास राहणारी चिमणी ही संख्येच्या दृष्टीने सर्वात मोठी जात. घरचिमणी असे या चिमणीस म्हणतात. घराच्या छपरावर, आढ्याच्या वळचणीला, खिडक्या-दारांवर बसून दिवसभर चिवचिवाट करीत राहून या चिमण्या माणसांना पुरते भंडावून सोडतात. चिमण्या कोणी पाळीत नाही, कारण हा पक्षी तसा काही सुंदर नाही, पण पाळल्या नाहीत तरी चिमण्या परवानगीची वाट वगैरे न पाहाता माणसाच्या घरात मुक्तपणे संचार करतात. खाण्याजोगे जे मिळेल ते खातात,





रात्रीच्या झोपतात आणि छताच्या वळचणीला, माळ्यावरील अडगळीत जिथे कुठे माणसांचे हात पोचणार नाहीत अशा जागी ओबडधोबड खोपटे बांधून त्यात सुखाने संसार करतात. पिलांना जन्म देतात आणि वाढवितात. माणसांची त्यांना यत्किंचितही भीती वाटत नाही. उलट, कुत्र्यामांजरापासून माणूस आपल्याला अभय देईल अशी त्यांना खात्री वाटत असावी.

पशुपक्ष्यांमध्ये आपआपसातले भांडण ही काही नवलाची गोष्ट नाही. कुत्री भांडतात, मांज़रे भांडतात, धान्याच्या शेतात भोरड्यांचा आरडाओरडा व किचकिचाट ऐकला की या पक्ष्यांना वेड तर लागले नाही ना, अशी शंका यावी. "मंजूळ मैना" असे कौतुकाने आपण ज्याचे वर्णन करतो त्या साळुंक्यांच्या भांडणापुढे मासळी बाजार काहीच नाही. चिमणी हाही मोठा भांडकुदळ पक्षी आहे. खोपटाची जागा किंवा अशाच काही कारणासाठी चिमण्या एकमेकींशी कडाकडी भांडतात. कुणीही माघार घ्यायला तयार नसते. मग हे प्रकरण ढोसाढोसी, मारामारी, व चोचाचोचीच्या थराला येते. दोन-तीन चिमण्या एखाद्या चिमणीवर एवढ्या हिरीरीने तुटून पडतात की ती चिमणी आता जिवंत राहाते की नाही अशी पाहाणाऱ्याला भीती वाटते. सामोपचार, मध्यस्थी, न्यायनिवाडा या गोष्टींना येथे स्थान नसल्यामुळे कुणा एकाचा पराभव होईपर्यंत भांडण चालू रहाते. शेवटी घरातल्या माणसांचे डोके उठल्याने ते हाशहुश करून चिमण्यांना हुसकावून लावतात. पण चिमण्या कसल्या, त्या घरातून उडत जाऊन बाहेर झाडाच्या फांदीवर बसतात आणि भांडण पुढे चालू करतात. निकाली कुस्तीप्रमाणे निकाली भांडण हे कदाचित त्यांचे धोरण असावे.

चिमणी हा असा एक प्राणी आहे की जो माणसाने बनविलेल्या आरसा या चिजेचा सर्रास वापर करतो. कदाचित माणसापेक्षाही अधिक. पाळीव प्राण्यांपैकी मांजर आरशासमोर कधी ठरत नाही. कुत्र्याला आरसा हे काही भलतेच प्रकरण असे वाटून तो बावचळल्यागत होतो आणि आरशापासून चटकन दूर होतो. चिमणीला आरसा ही काय चीज आहे हे एकदा समजले की तिच्या डोक्यातून तो

विषय जाणे फार कठीण. चिमणीला आरसा काही सौंदर्यप्रसाधनासाठी नको असतो. आरशाशी संबंध हा चिमणीच्या भांडकुदळपणाचाच भाग होय. आरशातले आपले प्रतिबिंब पाहून चिमणी त्याच्याशी भांडण सुरू करते व त्याला टोची मारत सुटते. ''इथं माझं घरटं आहे, हे माझं घर आहे. तू ग सटवे, इथं कशाला आलीस?'' असे जणू काय ती आरशातल्या प्रतिबिंबाला म्हणत असते. चिमणी जे करते तेच तिचे प्रतिबिंब करीत असल्यामुळे चिमणीला भयंकर चेव येतो, आणि ती आरशावर अधिक जोरजोराने टोची मारू लागते. आता तेथे कसे कोण माघार घेणार? चिमणीने मागे घेतले तर आरशातले प्रतिबिंब मागे घेणार, पण चिमणी अगदी हट्टाला पेटलेली असते, बेभान झालेली असते. तुम्ही तिला हुसकावून लावले तर चिमणी आरशाशी भांडण्यासाठी थोड्याच वेळात परत येते. या भांडणाने चिमणीची अगदी वेड लागल्यागत स्थिती होते. आरशावर टोची मारून मारून आणि पंखांचा फडफडाट करून ती अगदी हतबल होते, तरीसुद्धा भांडणाचे तिच्या डोक्यातले वेड आवरत नाही. पोटापाण्याचा आपला उद्योग सोडून चिमणी भांडण करण्यासाठी आरशाकडे पुन्हा पुन्हा येत राहते. पराभवाची नामुष्की तिला पत्करायची नसते. शेवटी आपल्याला चिमणीची कीव येते. आरशावर फडके टाकून तो झाकून टाकणे हाच चिमणीची ही निष्फळ लढाई संपविण्याचा एक उपाय असतो आणि तो आपण करतो.

पण माणसाच्या आयुष्यात चिमणीने एक महत्त्वाचे स्थान पटकावले आहे. चिमणीच्या चिवचिवाटाने आपल्याला त्रास होतो. कधी कधी आपण रागावतोही. पण चिमणीविषयी आपल्या मनात आकस असत नाही. उंदीर, पाल, झुरळ हे प्राणी आपल्याला नकोसे वाटतात तशी चिमणी नकोशी कधीच वाटत नाही. उलट एखाद्या निर्जन वगैरे जागी चिमण्या नसतील तर आपल्याला काही तरी चुकल्यासारखे होईल. माणूस जेव्हा केव्हा घर करून राहू लागला तेव्हापासून हा चिमुकला पक्षी त्याच्या आश्रयाला येऊन राहिला आहे आणि माणसाची सोबत करीत आहे. तान्हचा बाळाला मनुष्येतर प्राणी जीवनाची पहिली ओळख चिमणीच करून देते. बाळंत्यावर पडलेल्या बाळाला खिडकीवर, खुंटीवर किंवा तारेवर चिवचिव करीत उड्या घेणारी चिमणी दिसते तेव्हा स्तिमित नजरेने ते तिच्याकडे पाहू लागते. जगाच्या अद्भुततेचा पहिलाच स्पर्श त्याला या वेळी होतो. म्हणूनच जगातील सर्व भाषांमधील अंगाईगीतांत व बालगीतांत प्रथम येते ती चिमणी. जेवू लागलेले बाळ पहिला घास घेते तोही चिमणीचाच.




# कावळा

तुम्ही म्हणाल की या मालिकेत कावळ्याला कशाला स्थान दिलेत? कावळा हा काय जगातल्या विलक्षण प्राण्यांत जमा आहे? आम्ही रोज तर पाहातो कावळ्याला. पण कावळ्याच्या एकेक करामती तुम्ही पाहिल्यात तर कावळ्याइतका विलक्षण प्राणी दुसरा कोणी क्वचितच असेल याबद्दल तुमची खात्री पटेल. पक्ष्यांमध्ये कावळ्याइतका हिकमती लढविणारा, आलेल्या संधीचा फायदा उठविणारा, चलाख व हुशार पक्षी दुसरा कोणताही नाही. कावळ्याच्या हुशारीची एक सुप्रसिद्ध गोष्ट आहे. उन्हाळ्याचे दिवस होते. एका कावळ्याला अतिशय तहान लागली. कडक उन्हाळ्यामुळे नदीनाले सर्व कोरडे पडले होते. त्या कावळ्याला एका घरानजीक मातीचे एक मडके दिसले. त्या मडक्याच्या तळाशी थोडेसे पाणी होते. मडक्यात उतरून पाणी पिणे कावळ्याला शक्य नव्हते. त्याने एक युक्ती योजली. आजुबाजूला पडलेला एक-एक खडा उचलून तो त्या मडक्यात टाकत राहिला. असे पुष्कळ खडे मडक्यात टाकल्यानंतर आतल्या पाण्याची पातळी वर आली, त्यामुळे ते त्याच्या आटोक्यात येऊन त्याने ते पिऊन टाकले. अशा रितीने त्या कावळ्याने डोके लढवून आपली तहान भागविली. ही गोष्ट अर्थातच काल्पनिक आहे. परंतु कावळ्याची हुशारी मात्र काल्पनिक नाही हं. युरोपात शेतकरी, पिकांना त्रास देणाऱ्या कोल्ह्यांना पकडण्यासाठी सापळे लावतात. कोल्ह्याला आमीष म्हणून मांसाचा एक तुकडा सापळ्याच्या वरील पट्टीला लावलेला असतो. कावळे या सापळ्यावर दगड टाकून तो मांसाचा तुकडा वरचेवर उडवितात आणि खाऊन टाकतात. आहे की नाही कावळ्याची हुशारी? जाड कवचाची फळे,खेकडे वगैरे जे पदार्थ चोचीने फोडता येत नसतील ते, कावळे खूप उंचीवरून खाली खडकावर टाकतात आणि फोडून घेतात. म्हणजे कठीण पदार्थ खडकावर आघात होऊन फुटतो ही अक्कल कावळ्याने संपादन केली आहे.

हुशारी व कावेबाजपणा या गुणांबरोबर कावळ्याच्या अंगी धिटाई व निर्भयता हे गुणही पुरेपूर असतात. त्याच्याहून आकाराने लहान प्राण्यांची तर गोष्टच सोडा, पण त्याच्यापेक्षा आकाराने खूप मोठ्या प्राण्यांच्या खोड्या काढण्यात, त्यांच्याशी दोन हात करण्यात कावळ्याला कसलीच भीती वाटत नाही. कावळ्यांमध्ये एकी फार असते आणि या एकीच्या जोरावर ते मोठमोठ्या प्राण्यांची त्रेधातिरपीट उडवून देतात. तुम्ही पाहिले असेल की उंदीर, बेडूक वा असेच काही भक्ष्य पकडून घार आभाळात उडत जाते, अशा वेळी नेमके दोन कावळे तिच्यामागे लागतात. पकडलेले भक्ष्य खाण्यासाठी घार एखाद्या झाडाच्या

फांदीवर किंवा घराच्या छपरावर बसते. हे दोन कावळे तिच्या दोन्ही बाजूस बसून तिला अगदी सळो की पळो करून सोडतात. शत्रू बलिष्ट असेल तर त्याला दोन आघाडयांवर तोंड द्यावयाला लावून त्याचा पराभव करावा हा युद्धशास्त्रातला डावपेच कावळे येथे लढवतात. घार एका कावळयावर चाल करून जाते न जाते तोच दुसरा कावळा दुसऱ्या बाजूने घारीच्या पकडीतील भक्ष्यावर उडी घालतो. या दोन कावळयांमध्ये पुष्कळ वेळा घारीची स्थिती मोठी केविलवाणी होते. घारीच्या पकडीतील भक्ष्य सुटतेच असे नाही. पण ते दोन कावेबाज कावळे त्यातले थोडे काही तरी पळवितातच. भिंतीवरून जात असलेल्या मांजरालाही कावळे असेच जेरीला आणतात. मांजराच्या तोंडात भक्ष्य वगैरे काही नसते. तरीसुद्धा कावळे त्याच्या वाटेला जातात. कावळयाचा हा शुद्ध खोडसाळपणा म्हणायला हरकत नाही. मांजर आपले आपल्या नादात जात असते. एवढयात बाजूच्या झाडावर वा छपरावर बसलेला कावळा झेप मारून मांजराला टोच मारतो किंवा त्याची शेपटी ओढतो. मांजर फिस्कारते. पण टोच मारून उडून जाणाऱ्या कावळयाला त्याला काहीच करता येण्यासारखे नसते. दोन कावळे असतील तर मांजरीची अवस्था फारच दयनीय होते. त्यांचा मारा चुकविण्यासाठी ते बिचारे मग कोठे तरी आडोशाच्या जागी निघून जाते.

कावळा हा पक्षी इतका धीट व चढाईखोर की ज्या गरुडाला पक्ष्यांचा राजा म्हणून मानले जाते त्याची खोड काढायलाही तो घाबरत नाही. मध्य युरोप व दक्षिण अमेरिका या भागात गरूड पक्ष्यांची वस्ती आहे. तेथले कावळे गरूड पक्ष्यांच्या घरटयात शिरून त्यांची अंडी पळवितात. हे पक्षीनिरीक्षकांनी अनेक





वेळा पाहिले आहे. पृथ्वीच्या पाठीवरचा सर्वात बुद्धिमान आणि बलश्रेष्ठ प्राणी म्हणजे माणूस. सर्वश्रेष्ठ मानवाला कावळा घाबरतो म्हणून म्हणता का? मुळीच नाही. कावळा माणसाला घाबरत तर नाहीच, पण वेळप्रसंगी माणसावर हल्ला चढवायलाही तो मागेपुढे पहात नाही. पैदाशीच्या हंगामात कावळे झाडावर घरटी बांधतात, अशा वेळी जर तुम्ही त्या झाडाच्या जवळून गेलात तर कावळा तुमच्या डोक्यावर चोच मारतो. तसेच एखादा कावळा मरत असेल अथवा नुकताच मेला असेल तर त्या प्रसंगी त्याचे जातभाई अंत्यदर्शनासाठी आजुबाजूला गोळा होतात. अशा वेळी जर एखादा माणूस तेथून गेला तर कावळे त्याला टोची मारतात. कोळी स्त्रिया मासळीने भरलेली टोपली डोक्यावरून घेऊन जातात, तेव्हा कावळे त्या टोपलीतले मासे निःशंकपणे वरच्यावर उचलून घेऊन जातात. दुसरा कोणताही पक्षी हे धाडस करू धजणार नाही. थोडक्यात, कावळ्याला माणसाची भीती अशी वाटतच नाही.

कावळ्याच्या दोन जाती आहेत. एक कावळा आणि दुसरा डोमकावळा. कावळ्याची मान मातकट रंगाची असते आणि त्यामुळे ती नुकतीच कटिंग केलेल्या माणसाच्या मानेसारखी दिसते. डोमकावळा हा पूर्णपणे काळा असतो व त्याचा रंगही अतिशय काळाभोर असतो. डोमकावळा कावळ्यापेक्षा आकाराने थोडा मोठा असतो. कावळे जास्ती करून माणसाच्या वस्तीच्या आसपास राहतात, तर

डोमकावळे रानात राहणे अधिक पसंत करतात. दोन स्थळांमधले अंतर सांगायचे झाले तर इंग्रजीमध्ये ''स्ट्रेट ॲज दि क्रो फ्लाईज'' म्हणजे ''कावळा सरळ उडतो तेवढे अंतर'' असा एक वाक्प्रचार आहे. हे वर्णन डोमकावळ्याच्या बाबतीत खरे असते. कारण डोमकावळा खाद्य मिळविण्यासाठी जेथे गेला असेल तेथून आपल्या घरट्याकडे अगदी सरळ रेषेत उडत जातो. हुशारी, धूर्तपणा, धिटाई हे जे कावळ्याचे गुण म्हणून सांगतात, ते अधिकांश साध्या कावळ्याचे होत, डोमकावळ्याचे नव्हेत. साधा कावळा आणि डोमकावळा यांच्यात तरी सख्य असते म्हणता का? तसेसुद्धा नाही. कावळा आणि डोमकावळा विशेषत: अंडी घालण्याच्या हंगामात एकमेकांचे अगदी हाडवैरी बनतात. साधे कावळे डोमकावळ्यांच्या घरट्यांवर या दिवसात हल्ले चढवतात आणि कधीकधी त्यांची पिल्लेही पळवितात.

अनेक पक्ष्यांमध्ये मादीला खूष करण्याकरिता नर निरनिराळे रंगढंग करतात. पिसारा फुलवणे, नृत्य करणे, गळ्यातून गोड आवाजाच्या ललकाऱ्या काढणे वगैरे मार्गांनी नर मादीचे मन जिंकण्याचा प्रयत्न करीत राहतो. प्रियाराधनाच्या बाबतीत कावळा हा रूक्षच म्हटला पाहिजे. आपली जोडदारीण चांगली सुदृढ असली पाहिजे एवढीच त्याची अपेक्षा असते. एकदा आपली जोडीदारीण ठरला की नर कावळा तिच्याशी आयुष्यभर प्रामाणिक राहतो. त्याचे प्रियाराधन म्हणजे पंख पसरणे, शेपटी थोडीशी फुलविणे आणि शक्य तितका मृदू आवाज काढणे. एवढे केल्यावर तो अकस्मात हवेत उडी घेतो आणि चारदोन उलटयासुलटया सुरकांडया मारतो. ''बघ कसा कसरतपटू मी आहे'' असेच जणू तो आपल्या मादीला सांगतो.

कावळ्याचे घरटेसुद्धा अगदी ओबडधोबड असते. त्यात कसल्याही प्रकारची कलाकुसर नसते. वाळलेल्या काटक्याकुटक्या, पालापाचोळा, केसांची गुंतवळ, चिंध्या वगैरे टाकाऊ माल तो घरट्यासाठी वापरतो. घरटे बहुधा झाडावर



उंच जागी दोन फांदयांच्या बेचक्यात तो बांधतो. घरटे खोल ठेवण्याची एक खास खबरदारी मात्र तो घेतो. घरटे खोल असल्यामुळे मादी जेव्हा अंडी उबवते, तेव्हा बाहेरून ती कोणासही दिसत नाही. म्हणजे हासुद्धा कावळयाच्या अक्कल - हुशारीचाच एक भाग म्हटला पाहिजे. घरटे ओबडधोबड बांधण्यात ते काही विशेष आहे हे कोणाच्या लक्षात येऊ नये असाही हेतू असण्याचा संभव आहे. साधारणपणे पावसाळा सुरू होण्याच्या सुमारास कावळी अंडी घालते. एका वेळेस ती चार ते सहा अंडी घालते. अंडयाचा रंग फिकट निळसर पांढरा असतो व त्यावर काळया व तपकिरी रंगाचे ठिपके असतात. अंडे सुमारे तीन आठवडयांत उबते. अंडयातून बाहेर पडणाऱ्या पिलांना नरमादी दोघेजण ती चांगली उडू लागेपर्यंत अन्न भरवितात.

अन्नाची टंचाई निर्माण झाल्यास कावळे अतिशय आक्रमक बनतात. अशा वेळी ते पिके, धान्याची कोठारे, राने, समुद्रकिनारे अशा ठिकाणांवर पद्धतशीर हल्ले चढवितात. समुद्रावर वादळ होऊन समुद्रातले मासे किनाऱ्यावर फेकले जातात, अशा वेळी कावळे नेमके तेथे धाडी घालतात व ते मासे फस्त करतात. कावळयांच्या हुशारीची आणखी एक गंमत सांगतो. हिवाळयात भारताच्या किनाऱ्यावर सी-गल पक्षी मोठया संख्येने स्थलांतर करून येतात. हे पक्षी खाडयांवर घिरटया घालून तेथील मासे पकडण्याचा उद्योग करीत असतात. कावळे या पक्ष्यांमध्ये सामील होऊन त्यांचे अनुकरण करतात. वास्तविक पाहाता कावळा हा काही गल किंवा बगळे यांच्यासारखा पाणपक्षी नव्हे. पाण्यातील मासे पकडण्यास आवश्यक अशी त्याच्या शरीराची रचना नाही. तरीसुद्धा केवळ अक्कलहुशारीने सी-गल पक्ष्यांच्या या मासेमारीच्या उद्योगात तो सामील होतो. पाण्यात सूर मारून मासे पकडण्याचे त्याला जरी जमले नाही तरी गल पक्ष्यांनी पकडलेले मासे पळविण्यात तो यशस्वी होत असला पाहिजे. मुंबईस माहिमच्या खाडीत गल पक्ष्यांबरोबर कावळे मासे पकडण्याचा उद्योग करीत असल्याचे दृश्य मी अनेक वेळा पाहिले आहे.

कावळा हा अशा रितीने डाके घालण्यात मोठा पटाईत असतो. घराच्या स्वयंपाकघराकडील खिडक्यांच्या दारावर बसून आतले खाद्यपदार्थ पळविणे हा कावळयांचा एक नेहमीचाच धंदा आहे. इतर पक्ष्यांच्या घरटयांत बेधडक घुसून कावळे त्यांची अंडी व पिले पळवितात. विशेषत: कोंबडयांना त्यांचा हा उपद्रव फारच होतो. अंडे उचलून नेण्याची कावळयाची एक नामी युक्ती असते. तो अंडयाला एक भोक पाडतो आणि खालची चोच त्या भोकातून आत घालून वरच्या चोचीने अंडयाचा वरचा भाग पकडीत धरतो. अशा प्रकारे खूप मोठया आकाराचे अंडे तो सहज लीलेने वाहून नेऊ शकतो.

कावळा असा सराईत डाकू असला तरी त्याच्या शेरास सवाई शेर ठरणारे पक्षीही आहेत. एखादा धीट कावळा बगळयांच्या घरटयांवर धाड घालतो. पण तो जर बगळयाच्या तावडीत सापडला तर मात्र त्याची धडगत नसते. बगळा त्याचा पिच्छा पुरवून आपल्या लांब, धारदार चोचीने त्या कावळयावर वार करून त्याला ठार मारून टाकतो. एका पक्षी निरीक्षकाने सांगितलेली ही गोष्ट आहे. एकदा एका

मूर्ख कावळ्याने टर्न पक्ष्याच्या घरट्यावर धाड घातली. त्याबरोबर तेथे आसपास असलेल्या सर्व टर्न पक्ष्यांनी त्या कावळ्याला गराडा घातला. टर्न पक्षी हा उडण्यात कावळ्यापेक्षा खूपच अधिक असतो. त्या टर्न पक्ष्यांनी त्या कावळ्याला पंखांचे तडाखे मारून समुद्रावर रेटीत नेले आणि मग सगळ्यांनी मिळून त्याला समुद्राच्या पाण्यात डुबविले. कावळ्याची हुशारी त्याला नेहमीच उपयोगी पडते असे नाही. रानात गाईगुरे चरत असतात तेव्हा त्यांच्या अंगावर, डोक्यावर व शेपटीवर बिनदिक्कतपणे बसून कावळे त्यांच्या अंगावरचे किडे खाण्याचा उद्योग करतात. हा दोन प्राण्यांमधल्या सहकार्याचा भाग म्हणता येईल. पण कधी कधी गुरांच्या अंगावर झालेल्या जखमेत चोच खुपसून कावळे मांस ओरबाडून नेण्याचा प्रयत्न करतात. गुरांना कावळ्यांचा हा नेहमीच एक उपद्रव असतो.

कावळा हा असा जरी एक उपद्रवकारक व विध्वंसक पक्षी असला तरी निसर्गरचनेत तो सुद्धा इतर सर्व प्राण्यांना उपकारक ठरेल अशा प्रकारची कामगिरी बजावीत असतो. कावळा हा निसर्गाचा सफाई-कामगार आहे. माणसाच्या वस्तीत काय किंवा रानात काय, तो सफाईचे मोठेच काम करीत असतो. मरून पडलेले उंदीर, घुशी वगैरे लहान प्राणी व त्याचप्रमाणे मोठ्या प्राण्यांची मढी चोचीने कोरून कावळे आतले मांस खाऊन ती अगदी साफ करून टाकतात. कावळ्यांनी हे कार्य केले नसते तर ठिकठिकाणी केवढी तरी घाण व दुर्गंधी साचली असती. माणसाच्या वस्तीतील इतर घाण साफ करण्याचेही काम कावळे करीत असतात. म्हणूनच कावळ्याला 'स्कॅव्हेंजर बर्ड' (म्हणजे सफाईगार पक्षी) असे म्हणण्याचा प्रघात आहे. सफाईच्या या कामात कावळे गिधाडांची सोबत करतात.

रोज सकाळी उठल्याबरोबर चिमण्यांच्या चिवचिवाटाबरोबर कावळ्यांचा ''कावकाव'' हा आवाज आपण ऐकतो. कावळ्याचा ''कावकाव'' हा ध्वनी तसा कर्णकर्कशच असतो. पण या ''कावकाव''मध्येसुद्धा तारस्वरापासून ते खर्जापर्यंत कावळे अनेक स्वर काढीत असल्याचे तुम्ही ऐकले असेल. विशेषतः भर दुपारच्या वेळी परसातल्या झाडावर किंवा घराच्या खिडकीवर बसून कावळा ''कुर कुर'' असा जो आवाज काढतो त्यात पुष्कळच मार्दव असते. कावळा हा माणसाचा मित्र जरी म्हणता येणार नाही तरी चिमणीप्रमाणेच तो माणसाच्या आश्रयाला येऊन राहिलेला पक्षी आहे. माणसाच्या जीवनाशी तो इतका समरसून गेला आहे की आपल्या लोकगीतांत व अंगाईगीतांत कावळ्याला महत्त्वाचे स्थान मिळाले आहे. आपल्या लहान बाळांना भरविताना आपण त्यांना चिऊकाऊचे घास भरवितो. चिऊकाऊची गाणी म्हणतो. त्यांना रिझविण्यासाठी काऊला बोलावतो. कावळ्याला आपण आपल्यातलाच मानल्याचे हे लक्षण नाही का?

कावळ्यांच्या विध्वंसक वृत्तीमुळे शहरांमध्ये आपण जी उद्याने तयार करतो, तेथे रानातले इतर पक्षी येण्यास प्रतिबंध होतो. कावळे या पक्ष्यांना तेथे येऊच देत नाहीत. त्यासाठी कावळ्यांचा बंदोबस्त करण्याच्या योजनेचा माणसांनी अनेक वेळा विचार केला आहे. पण या कावेबाज, धूर्त, धिटाईखोर पक्ष्याला आवर घालण्याचा उपाय माणसाला अद्याप तरी सापडलेला नाही.

# कोकिळा

पक्ष्यांमध्ये कवींचा सर्वात लाडका पक्षी कोणता असेल तर कोकिळा. अनेक कवींनी कोकिळेवर सुंदर सुंदर कविता लिहिल्या आहेत. आंब्याच्या झाडला मोहर फुलतो त्या वेळी कोकिळांना कंठ फुटतो. आंब्याला फुटलेला मोहर कोकिळा खाते, हा एका कवीने "समसमा संयोग" म्हणून जाहीर केला आहे. कोकिळेच्या गाण्याने कवींना तर अशी भुरळ घातली आहे की, दुसऱ्या एका कवीने "अवेळ असली तरी तुझे गाणे मला ऐकू दे" (अवेळ तरीही बोल कोकिळे, अवेळ तरीहि बोल) अशी कोकिळेची मनधरणी केली आहे. कोकिळेचा कुहू कुहू असा उंचावत जाणारा स्वर खरोखरच मन मोहरून टाकणारा असतो. विशेषतः पहाटेच्या शांत वेळी कोकिळेचा हा आर्त स्वर कानी पडतो तो एक दिव्य अनुभव असतो. तेव्हा कोकिळेच्या या गाण्याने कवी वेडावून जावेत यात काहीच आश्चर्य म्हणता येणार नाही. वसंत ऋतू, आंब्यास आलेला मोहोर व त्याचा सर्वत्र दरवळणारा उग्र गोड सुगंध आणि कोकिळेच्या बेभान हाका–हा सृष्टीच्या नाटकातला एक मोठा अतिरम्य प्रसंग आहे यात काही शंका नाही.

पण या नाटकातली नायिका एक सराईत चोर आहे याची किती लोकांना माहिती आहे? कोकिळा आपली अंडी इतर पक्ष्यांच्या घरट्यांत घालते हे सर्वांना ठाऊक आहे. तुम्हालाही ते ठाऊक असेल. पण एवढेच नाही, ती चोर आहे आणि चोरांची लबाडी व क्रूरपणा हे गुणही तिच्या ठिकाणी भरपूर आहेत. बिचारे कवी, त्यांना हे समजले तर कोकिळेवर केलेल्या कवितांकडे बघून कदाचित त्यांना पश्चात्तापही वाटेल.

तुम्हाला माहिती आहेच की कोकिळा कधीही आपले स्वतःचे घरटे बांधीत नाही. वास्तविक पहाता एक माणूस सोडला तर उत्तम प्रकारची घरे तयार करण्यात पक्ष्यांइतका दुसरा कोणीही प्राणी कुशल नाही. बाया पक्ष्याचे घरटे तुम्ही पाहिले का? विहिरीच्या आसपासच्या झाडांना चंबूच्या आकाराची ही घरटी टांगलेली दिसतात. त्यांची वीण पाहून मन थक्क होते. काडचा विणण्यातील बाया पक्ष्याच्या चोचीचे कौशल्य माणसाच्या हातापेक्षा कमी नाही. कोणी पक्षी आपल्या घरट्यात पिसे व कापूस यांसारख्या पदार्थांची मऊ गादी व अस्तर तयार करतात, तर कोणी घरट्यांच्या आतील बाजूंवर झालरी सोडतात. हे सर्व कशासाठी, तर जी बाळे जन्माला येणार आहेत त्यांना सुख लाभावे, पंख फुटून ती उडून जाईपर्यंत त्यांना आरामशीरपणे जगता यावे यासाठी.

आणि कवींची ही लाडकी कोकिळा, ती आपल्या पिलांसाठी घरटे बांधीत नाही. आपल्याला पिले व्हावीत, ती मोठी व्हावीत ही प्रेरणा तिच्या ठिकाणीही असते. पण त्यासाठी आपल्याला कोणत्याही प्रकारची तोशीस लागता कामा नये असा तिचा हट्ट असतो. त्यासाठी दुसऱ्या पक्ष्यांना फसवायला, त्यांचे नुकसान करायला ती मुळीच मागेपुढे पहात नाही.

आपल्याला होणाऱ्या पिलांची अगदी योग्य प्रकारे काळजी घेतील असे त्याच्यासाठी "सावत्र" आईबाप ती शोधून काढते. आपली अंडी घालण्याची वेळ आली आहे हे समजल्याबरोबर ती आपल्या भावी पिलांसाठी असे सावत्र आईबाप शोधण्याचा उद्योग सुरू करते. ती बहुधा ज्या पक्ष्यांची अंडी दिसायला आपल्या अंड्यांसारखी दिसतात अशा पक्ष्यांची या घरठावासाठी निवड करते. मग हे पक्षी कुठे तरी दूर गेले असतील अशा वेळी त्यांच्या घरट्यात प्रवेश करून तिथे आपली अंडी घालते. गमतीचा भाग असा की हे पक्षी ज्या दिवशी अंडी घालणार असतील त्याच दिवशी कोकिळा त्यांच्या घरट्यात जाऊन अंडी घालते. कोकिळेला हा दिवस कसा समजतो या प्रश्नाचे उत्तर निसर्गाखेरीज दुसरे कोण देऊ शकणार? पशुपक्ष्यांमध्ये ज्या आश्चर्यकारक सहजप्रवृत्ती आढळतात तशी ही एक सहजप्रवृत्ती. ज्या पक्ष्यांच्या घरट्यात आपली अंडी टाकायची असतील त्यांच्या हालचालींवर कोकिळा दूर बसून बारकाईने नजर ठेवते. ते केव्हा घरटे बांधायला सुरुवात करतात, घरटे बांधून पुरे झाले का, आता ते पक्षी कुठे आहेत, किती दूर गेले आहेत हे सर्व पाहून ठेवते. आता ते लवकर परतणार नाहीत याची खात्री करून





घेऊन ती त्यांच्या घरट्यात घुसते आणि त्यांच्या अंड्यांमध्ये आपले पहिले अंडे घालते. पण मग अंड्यांची संख्या वाढून त्या पक्ष्यांना संशय येणार नाही का? आणि घरट्यात अंड्यांची गर्दी होणार नाही का? हो, कोकिळेला या अडचणींची पूर्ण कल्पना असते. त्यावर तिच्यापाशी युक्ती आहे. आपले अंडे घालताना ती त्या पक्ष्यांचे एक अंडे चोचीत धरून उचलते आणि त्या जागी आपले अंडे टाकते. अंडे घालून झाल्यावर चोचीत धरलेल्या त्या पक्ष्यांच्या अंड्यासहीत ती पलायन करते आणि दूर अशा जागी बसून ते अंडे वरून खाली टाकते. कधीकधी त्या अंड्यातला मालमसाला ती खाऊनही टाकते. दोन दिवसांच्या मुदतीत कोकिळा अशा प्रकारे चार किंवा पाच अंडी घालते आणि प्रत्येक अंडे वेगवेगळ्या पक्ष्यांच्या घरट्यात. म्हणजे आपल्या अंड्यासाठी तिने चार किंवा पाच यजमान शोधून ठेवलेले असतात. आता या कोकिळेला तुम्ही चोर म्हणणार नाही तर काय म्हणणार?

कोकिळेची अंडी सुमारे बारा दिवसांत उबतात. इतर पक्ष्यांची अंडी इतक्या लवकर सहसा उबत नाहीत. म्हणजे कोकिळेने ज्या पक्ष्याच्या घरटचात अंडे घातले असेल त्या पक्ष्याच्या अंडचांच्या अगोदर कोकिळेचे अंडे उबते. कोकिळेचे पिल्लू हे त्या घरटचात जन्माला येणारे पहिले पिल्लू असते. हे कोकिळेचे पिल्लू तिची लबाडी घेऊन ते जन्माला येणार. जन्माला आल्याबरोबर ते बाजूची अंडी घरटचातून खाली ढकलून देण्याचा उद्योग सुरू करते. त्यातली काही अंडी शाबूत राहून त्यातून पिल्ले बाहेर आली तर कोकिळेचे पिल्लू आपल्या या "सावत्र" बहीणभावांनाही घराच्या बाहेर लोटून देण्याचा प्रयत्न करून पहाते. असे करण्यातला त्याचा उद्देश घरटचात आपण एकुलते एक असावे आणि दत्तक आईबापांचे सर्व लक्ष आपल्यावर रहावे हा असतो. पहिले तीन किंवा चार दिवस कोकिळेच्या पिल्लांचा हा घरभेदी उद्योग चालू असतो. यातून जी पिल्ले वाचतात त्यांना नंतर मात्र ते त्रास देत नाही. पण कोकिळेच्या पिल्लाची वाढ झपाटचाने होते आणि ते अतिशय अधाशी व आक्रमक असते. दत्तक आईबापांनी आणलेले अन्न इतर पिल्लांना मिळू न देता सर्वच्या सर्व आपण एकटचाने खाण्याची घिसाडघाई ते करते. यामुळे पुष्कळवेळा इतर पिल्लांवर उपासमारीची पाळी येते. कोकिळेने ज्या पक्ष्याच्या घरटचात अंडे टाकले तो आकाराने तिच्याहून लहान असेल तर कोकिळेच्या या नाटकाला भलतेच विनोदी वळण मिळते. झपाटचाने वाढणारे हे कोकिळेचे पिल्लू काही थोडचाच दिवसांनंतर आपल्या सावत्र आईबापापेक्षाही आकाराने मोठे होते आणि तरीसुद्धा त्या आईबापांना यात विचित्र काहीच वाटत नाही. कोकिळेच्या पिल्लाला पंख फुटून उडण्याची शक्ती येईपर्यंत ते बिचारे मायेने त्याला भरवीत राहतात आणि मग एके दिवशी पंखांत ताकद आलेली ती कोकिळा (किंवा कोकिळ) आपल्या या सावत्र आईबापांचा त्याग करून आपले स्वतंत्र जीवन जगण्यासाठी निघून जाते.

तुम्ही म्हणाल, कोकिळ पक्ष्याचे केवढे हे क्रौर्य? पण तसे समजण्याचे काही कारण नाही. कोकिळेचे पिल्लू आपल्या सहजप्रवृत्तीप्रमाणे वागत असते. दुष्टपणा करायचा म्हणून तो ते करीत नाही. शिवाय त्याच्या शरीराची रचनाच अशी असते की ती त्याला अशा प्रकारे वागायला लावते. त्याच्या पाठीला थोडासा बाक असतो आणि हा भाग अतिशय संवेदनाक्षम असतो. या भागाला थोडासा स्पर्श झाला तरी पिल्लू अतिशय कावरेबावरे व अस्वस्थ होते. घरटचाचा एखादा कोपरा किंवा एखादी काटकी पिल्लाच्या अंगाला घासत असेल तर ते सारखे पुढेमागे होत राहाते, आणि आपला अस्वस्थपणा दूर करण्यासाठी पाठीने घरटचातील वस्तू ढकलून देते. घरटचातील अंडी किंवा पिल्ले बाहेर काढण्यावर त्याचा कटाक्ष असतो असेच काही नाही. तुम्ही जर घरटचात गोटचा किंवा सुपाऱ्या ठेवल्या तर त्यासुद्धा ते ढकलून देईल. आपण काय करतो याचा विचार त्याला नसतो. आपल्या सहजप्रवृत्तीनुसार ते वागत असते. असे वागावे हे काही त्याच्या आईबापांनी त्याला शिकविलेले नसते. कारण आपल्या खऱ्या आईबापांची व त्याची कधीच गाठ पडलेली नसते आणि दत्तक आईबाप त्याला असे कधीच शिकविणार नाही. त्याचा गुण म्हणा, दुर्गुण म्हणा, आनुवंशिक असतो. त्याला त्याचा तरी काय इलाज आहे?

# मुंगूस

खेडेगावातील मुले मुंगूस पाहिले की ओरडतात, "मुंगसा, मुंगसा तोंड दाखव, तुला रामाची शपथ." मुलांचे ओरडणे ऐकून मुंगूस त्यांच्या दिशेने पाहातेही. मुलांना वाटते मुंगसाने रामाच्या शपथेला साथ दिली आणि ती खूष होतात. रावणाने सीतेला दंडकारण्यातून पळवले तेव्हा राम तिच्या शोधासाठी निघाला असता एका मुंगसाने त्याला लंकेची वाट दाखवली अशी आख्यायिका आहे. मुंगूस सापाचा जन्मजात शत्रू आणि साप माणसाचा शत्रू. म्हणून माणसाला मुंगसाविषयी स्वाभाविक असे प्रेम वाटते. आपल्या प्राचीन वाङ्मयात मुंगसासंबंधी अनेक उल्लेख आहेत. तसेच ते ग्रीक व रोमनांच्या प्राचीन वाङ्मयातही आहेत. एक रोमन इतिहासकार लिहितो की नाईल नदीच्या काठी मुंगसे मगरीची अंडी फोडून टाकतात ते खाण्यासाठी नव्हे तर आपला मित्र जो माणूस त्याच्या संरक्षणासाठी. मुंगसे चिखलात लोळून अंगे बरबटून घेतात आणि नदीच्या काठावर खबदाडात लपून बसतात. नदीतून मगर बाहेर आल्यावर ती त्यांच्यावर तुटून पडतात आणि मगरीच्या माना आपल्या तीक्ष्ण नखांनी फोडून त्यांना ठार मारतात. मुंगसांनी अशा प्रकारे मगरींना ठार मारले नाही तर त्यांची संख्या इतकी वाढेल की माणसाला नदीपर्यंत पोहोचणेसुद्धा अशक्य होईल, अशी हकीकत या इतिहासकाराने लिहून ठेवली आहे.

मुंगूस हा जमिनीच्या आश्रयाने राहणारा प्राणी आहे. त्याला झाडावर चांगले चढता येत नाही. झाडावर मुंगूस चढलेच तर सहसा बुंध्यालगतच्या फांद्यांच्या वर जात नाही. झाडांची जमिनीखाली मुळे पसरलेली असतात त्या मुळांच्यामध्ये पोकळी करून मुंगूस तेथे आपली घरे करतात. दुसऱ्या प्राण्यांनी तयार केलेली व नंतर सोडून दिलेली बिळेही मुंगसांची घरे होतात. म्हणजे आयत्या बिळावर नागोबाच नव्हे तर मुंगूसही घरासाठी डोळा ठेवून असते.

मुंगसाच्या अनेक जाती आहेत आणि जगाच्या सर्व भागात हा प्राणी आढळतो. मुंगसाच्या अनेक जातींमध्ये भारतीय मुंगूस ही सर्वात प्रमुख जात होय. या जातीचे मुंगूस हे फक्त भारतातच आहेत असे नव्हे तर पाकिस्तान, सिलोन, नेपाळ, अफगाणिस्तान, इराक, अरबस्तान, मॉरिशस इ. देशांतही आहेत. मुंगसाचे अन्न ज्या भागात ते राहत असतात त्या भागातील परिस्थितीवर अवलंबून असते. सर्वसाधारणपणे गवती टोळ व भुंग्यांच्या आकाराचे कीटक आणि कोळी हे मुंगसाचे प्रमुख खाद्य होय. तथापि संधी मिळेल तेव्हा मुंगसे बेडके, पाली, सरडे, साप, पक्षी, गोगलगायी, विंचू, सापांची व पक्ष्यांची अंडी हेही खातात. तसेच लहानमोठी फळे, कंदमुळे यावरही ते उदरनिर्वाह करतात. मुंगूस भक्ष्याची शिकार

कधी कधी एकटयाने करते, कधी कधी नरमादी दोघे मिळून करतात तर कधी कधी सर्व कुटुंब शिकारीचा उद्योग करतात. शेतावर पाळलेल्या कोंबडयांना मुंगसांचा फार उपद्रव होतो. कोंबडयांची अंडी तर ते पळवतातच, पण कित्येक वेळा कोंबडयाही पळवतात. मुंगूस हा तसा बुजरा प्राणी वाटतो. पण बुजते ते माणसाला. त्याच्या शत्रूशी लढताना ते अतिशय हिंस्र बनते. मोठमोठया घुशींना ते एका झडपीत लोळवतात. मांजरेसुद्धा अशा घुशींच्या वाटयाला जात नाहीत. मुंगूस मात्र घुशीला सहसा सोडत नाही. घूस दिसली की मुंगूस उडी घालून तिची मान पकडते आणि आपल्या तीक्ष्ण दातांनी तिच्या मानेतली हाडे फोडते. मुंगसाची चपळाई व मारा इतका अचूक असतो की घुशीला प्रतिकार करण्यास क्षणाचाही अवसर मिळत नाही. मानेचे हाड मोडल्यामुळे घूस अर्धमेली होते आणि मग मुंगूस तिच्या तोंडाचे लचके तोडून तिला ठार मारते. सुमारे अर्ध्या मिनिटाच्या आत घुशीचा कारभार आटोपतो. नंतर मुंगूस घुशीच्या तोंडाकडून तिला खाण्यास सुरुवात करते आणि एक शेपटी सोडल्यास सर्व घूस पोटात रिचवते. मुंगूस पक्षी व पक्ष्यांची अंडी खात असल्यामुळे पक्षी मुंगसाला आपला नैसर्गिक शत्रू मानतात. मुंगूस शेतातून पळताना दिसले की साळुंक्या त्याच्यावर जमावाने हल्ला चढवितात. अशा वेळी मुंगसाची मोठी त्रेधातिरपीट उडते आणि साळुंक्यांचा मारा चुकविण्याकरिता त्याला एखाद्या बिळाचा वा खबदाडीचा आश्रय घेण्यावाचून गत्यंतर उरत नाही.

पण साप आणि मुंगूस हे एकमेकांचे खरे जन्मजात वैरी. निसर्गामध्ये इतर कोणत्याही दोन प्राण्यांमधील शत्रुत्वाची साप व मुंगसामधील शत्रुत्वाशी तुलना होणार नाही. "अहिनकुलवत वैर" असा शब्दप्रयोग यावरूनच आपल्या भाषेत आला आहे. (अहि म्हणजे साप आणि नकुल म्हणजे मुंगूस.) भारताच्या ज्या भागात नाग जास्त प्रमाणावर आढळून येतात त्या भागात मुंगसेही आढळतात. म्हणून नाग व मुंगूस यांच्या लढायांचे प्रसंग अधिक. अनेक लोकांनी नाग व मुंगूस यांची रोमहर्षक लढाई पाहिली आहे, आणि लेखकांनी व प्राणिनिरीक्षकांनी या लढायांची साद्यंत वर्णने लिहून ठेवली आहेत. त्यांची छायाचित्रे व चित्रपटही घेण्यात आले आहेत.

पण नाग व मुंगसाची दृष्टादृष्ट झाली की त्यांची लढत जुंपते असे नाही. मुंगूस पुष्कळ वेळा नाग केवढा आहे याचा अंदाज घेते आणि नाग फार मोठा असल्यास आपल्या आटोक्यात येणार नाही असे पाहून निघून जाते. कित्येक वेळा मुंगूस नागाशी एकएकटे लढण्याचा धोका पत्करत नाही. तर दोन मुंगसे मिळून लढतात. तसेच प्रत्येक लढाईत नाग ठार मारला जातो असेही नाही. पण एक मात्र नक्की ५. या लढाईत मुंगूस सहसा मरत नाही. मरतो तो नागच.

नाग व मुंगसाची लढाई होते ती अशी. नागाला मुंगूस दिसले आणि ते लढाई करण्याच्या पवित्र्यात उभे आहे असे वाटले की तो शरीराचा पुढचा भाग उचलून फडा काढतो आणि शेपटी मागे जमिनीवर आपटतो. नागाला अशा पवित्र्यात पाहिल्यावर मुंगूस एक किंचाळी आवाज काढते आणि अंगावरचे केस ताठ करून व

शेपटी फुलवून त्याच्या समोर येऊन उभे रहाते. लढाईची ही सलामी असते. दात विचकून समोर उभ्या ठाकलेल्या मुंगसाला पाहून नाग जबडा उघडतो आणि फड्यात जोर भरून मुंगसाला पहिला तडाखा हाणतो. मग मुंगूस चपळाईने दूर जाते व हा तडाखा सहज चुकवते व त्याच वेळी जमिनीलगत आलेल्या नागाच्या तोंडाचा खालचा जबडा पकडते. त्याचबरोबर आपल्या पायांच्या तीक्ष्ण नखांनी ते नागाच्या शरीराची पकड घेते. मुंगसाची नखे शरीरात घुसल्याने नागाला तीव्र वेदना होतात आणि तो संतप्त होऊन मुंगसाच्या अंगाभोवती कसून विळखे घालतो व हे विळखे आवळून मुंगसाला करकचून मारण्याचा प्रयत्न करतो. पण येथेच नागाचा हिशेब चुकतो. कारण मुंगसाच्या अंगावरील झुपकेदार केसावर नागाचा विळखा पडतच नाही. मुंगूस अंग आकसून देऊन केस खाली ओढून घेते आणि नागाच्या विळख्यातून सुटते. आता ते पुन्हा नागाच्या समोर येऊन उभे राहते. नाग पुन्हा तडाखा हाणतो. पण मुंगसाने त्याच्या अंगावर जखमा केल्यामुळे या वेळी त्याच्या तडाख्याचा जोर कमी असतो. नाग असे तडाखे पुन्हा पुन्हा हाणीत असतो व त्यातच त्याचा शक्तिपात होतो. मुंगूस विलक्षण चपळाई करून नागाच्या या तडाख्यांतून निसटते आणि त्याचे नाक, जबडा व तोंडाचे लचके तोडीत राहते. नागाचा जोर कमी झाल्यावर मुंगूस बेधडक त्याच्यावर हल्ला चढविते आणि त्याचे तोंड ओरबाडून काढते. मुंगसाच्या चढाईचे वैशिष्ट्य हे की ते नागाच्या शरीराकडे



दुर्लक्ष करते. त्याच्या हल्ल्याचा रोख हा सगळा नागाच्या तोंडावर असतो. मुंगसाने काढलेल्या लचक्यांमुळे जायबंदी झालेल्या नागाला ग्लानी येते. यानंतर त्याचा निकाल लावण्यास मुंगसाला फार वेळ लागत नाही. मुंगसालासुद्धा नागाबरोबरची लढाई ही फार सोपी जाते अशातला भाग नाही. पुष्कळ वेळा थकवा आल्याने मुंगूस मध्येच लढाई सोडून जाते आणि एक-दीड मिनिटांनी परत येऊन नागावर जोराचा हल्ला चढवते. नाग मुंगसावर हल्ले चढवतो खरे. पण ही एकूण लढाई पाहता मुंगूस हे नेहमी आक्रमक असते आणि नाग बचावाची लढाई करत राहतो. मुंगसाचा विजय हा प्रामुख्याने त्याच्या गतीचा व चापल्याचा विजय असतो. तसेच लढाई करताना मुंगूस आपल्या अंगावरील केस फुगवितो, त्यामुळे त्याच्या शरीराचा आकार दुप्पट झाल्यासारखा दिसतो. यामुळे नाग चकतो आणि त्याचे कित्येक बार फुसके जातात.



नागाच्या विषारी दातांची व जबडयाची रचना अशा लढाईत वार करण्याच्या दृष्टीने सोयीची नाही, अशा कारणामुळेही त्याला हार खावी लागते. त्याचे विषाचे दात त्याच्या वरच्या जबडयात, पुढच्या भागी घट्ट बसवलेले असतात. ते काहीसे आखूडच असतात. तसेच त्याला आपला जबडा फक्त ४५ अंशाचा कोन करून उघडता येतो. या दोन्ही गोष्टींमुळे मुंगसाला विषारी दातांनी चावा घेऊन त्याच्या शरीरात विष भिनविण्याचे काम त्याला झटपट करता येत नाही. लढाईच्या एकूण डावपेचात नागाचे चापल्य मुंगसापेक्षा पुष्कळच कमी पडते. यामुळे त्याने तोंड वळवण्याच्या आत मुंगूस त्याच्यावर एकदा या बाजूने तर एकदा त्या बाजूने असे हल्ले चढवीत राहते आणि त्याला हतबल करून टाकते.

घोणस हा साप-नागापेक्षा मुंगूसाचा अधिक चांगल्या प्रकारे प्रतिकार करू शकतो. याचे कारण घोणशीचे विषारी दात तिच्या जबडयात टाळूच्या वरच्या बाजूला बसविलेले असतात आणि तिला आपला जबडा सुमारे १८० अंशांचा कोन करून उघडता येतो. तसेच घोणस हल्ला करताना आपल्या शरीराचा पुढचा भाग वर न उचलता त्याला इंग्रजी अक्षर एसचा आकार देते आणि वार करण्यातील तिची गती व जोरही विलक्षण असतो. यामुळेच मुंगूस व घोणस यांची लढाई क्वचितच होते.

साप-मुंगसाच्या लढाईत मुंगसाला सापाच्या विषारी दाताच्या जखमा होतातही. पण विषाचा प्रतिकार करण्याची शक्ती मुंगसामध्ये इतर प्राण्यांपेक्षा अधिक असते. सर्वसाधारणपणे सर्पविषाचा प्रतिकार करण्याची प्राण्यांमधील क्षमता ही त्यांच्या एकूण सवयींवर अवलंबून असते असे आढळून आले आहे. डुक्कर आणि सायाळ यांच्यामधे ही क्षमता विशेष प्रमाणात आढळून येते. सायाळाचे तर घोणस हे विशेष आवडीचे खाद्य आहे. मुंगसाला सापाचे विष भिनत नाही असे नाही, पण ते त्याचा चांगल्या प्रकारे प्रतिकार करते. याबाबत केलेल्या प्रयोगात असे आढळून आले की नागाच्या १ मि.मी. विषाने २ कि.ग्रॅ. वजनाचा ससा ३ तासांतच मरतो. पण एवढ्या विषाचा १ कि.ग्रॅ. वजनाच्या मुंगसावर काहीही दृश्य परिणाम झाला नाही. सशाला प्राणघातक ठरलेल्या विषाच्या चौपट विष मुंगसाला दिले असता त्याला काही झाले नाही, सहापट दिले असता ते दोन दिवस अस्वस्थ होते पण त्यानंतर ठीक झाले. सशाला प्राणघातक ठरलेल्या विषाच्या आठपट विष दिल्यावर मुंगूस १२ तासांनी मेले.

सापाशी लढाई झाल्यानंतर मुंगूस रानात जाऊन "मुंगो" वनस्पतीची फळे खाते व त्यामुळे त्याला विषबाधा होत नाही असा भारतातील खेडयातील लोकांचा एक समज आहे. तर मुंगसाच्या जिभेवर एक असा औषधी पट्टा असतो की ज्यामुळे सापाचे विष त्याला चढत नाही असा ब्रम्हदेशातल्या लोकांमध्ये एक समज आढळून येतो. पण या दोन्ही समजांना शास्त्रीय आधार नाही.

मुंगूस हा सस्तन प्राणी आहे. त्याचे आयुष्यमान सुमारे १५-१६ वर्षांचे असते. मुंगसाची मादी वर्षातून दोन वेळा विते. तिचा गाभणपणाचा काळ सुमारे आठ ते नऊ आठवडयांचा असतो. तिला दोन ते तीन बच्चे होतात. बच्चा सोळाव्या किंवा सतराव्या दिवशी डोळे उघडतो. जन्मतः त्याच्या अंगावर तुरळक केस

असतात. चवदा दिवसांनंतर त्याचे सर्व अंग केसांनी भरून जाते आणि सुमारे दोन महिन्यांनंतर केसांचा रंग आईबापांच्या केसांच्या रंगासारखा होतो. मुंगसाची पिल्ले कुत्र्याच्या व मांजराच्या पिल्लांप्रमाणेच खूप खेळकर असतात. ती जसजशी वाढतात तसतसे त्यांचे खेळांचे प्रकारही वाढतात. धराधरी, लपंडाव, लढाई, शिकार वगैरे त्यांच्या खेळांचे प्रकार असतात. भक्ष्य पकडण्याच्या खेळात पिल्ले आळीपाळीने शिकारी व सावज होतात. पिसे, काटक्या, सुकलेली फळे, दगडगोटे यांसारख्या वस्तूंनाही सावज करून ती शिकारीचा खेळ खेळतात. या खेळात त्यांच्या शिक्षणाचाही भाग असतो. भावी आयुष्याची तयारी ते या खेळातून करीत असतात.

आपल्या प्राचीन वाङ्मयात मुंगसाचे अनेक उल्लेख येतात हे वर सांगितलेच आहे. पंचतंत्रात मुंगसाच्या दोन सुप्रसिद्ध गोष्टी आहेत त्या ऐकण्यासारख्या आहेत. एक गोष्ट अशी–

एका गावात एक ब्राम्हण कुटुंब रहात असे. एके दिवशी ब्राम्हणाची बायको बाळंत होऊन तिला मुलगा झाला. त्याच दिवशी त्या घराच्या आश्रयाला रहाणाऱ्या एका मुंगसाच्या मादीसही पिल्लू झाले. पण ती मुंगसाची मादी पिल्लाला जन्म दिल्यानंतर ताबडतोब मरण पावली. ब्राम्हणाच्या बायकोने मग त्या मुंगसाच्या पिल्लास आपल्या मुलाबरोबर स्वतःच्या अंगावर पाजून वाढवले. मुंगसाच्या पिल्लावर तिचे प्रेम होते. पण तरीसुद्धा मुंगूस हा एक पशू असल्याने ते शेवटी आपल्या वळणावर जाईल आणि कधी तरी आपल्या मुलाला इजा करील अशी भीती तिला मनातून वाटत असे. एके दिवशी ती आपल्या मुलाला निजवून नदीवर पाणी आणण्यासाठी गेली. ब्राम्हणही भिक्षा मागण्याकरिता बाहेर गेला.



यामुळे मूल एकटेच घरात राहिले. दरम्यान एक नाग एका बिळामधून मूल झोपले होते त्या खोलीत आला. ब्राम्हणाच्या बायकोने पाळलेले मुंगूस तेथेच होते. नागाला पाहून सर्प जातीशी असलेले जन्मजात वैर जागृत होऊन त्या मुंगसाने नागावर हल्ला केला आणि मोठी झुंज देऊन नागाच्या खांडोळ्या केल्या आणि अशा रीतीने आपल्या भावाला प्राणसंकटातून वाचविले. आपल्या या पराक्रमाबद्दल आपल्या आईची शाबासकी मिळवावी म्हणून ते घराच्या दारात येऊन तेथे तिची वाट पहात बसले. ब्राम्हणाची बायको नदीवरून घागरी पाण्याने भरून घेऊन घरी परत आली. पाहते तो दारात मुंगूस बसलेले आणि त्याचे सर्व तोंड रक्ताने माखलेले. तिला वाटले मुंगसाने डाव साधून आज आपले मूल मारले. तिचा संताप अनावर झाला आणि त्या क्षणी तिने डोक्यावरची पाण्याने भरलेली घागर मुंगसावर फेकली. मुंगूस जागच्या जागी मेले. ब्राम्हणाची बायको घरात गेली तेव्हा तिला आपले मूल शांतपणे झोपलेले दिसले व त्याच्या बिछान्यापाशी नागाच्या खांडोळ्या दिसल्या. आपण केलेली भयंकर चूक तिच्या लक्षात आली. आपल्या मुलाचे प्राण वाचविणाऱ्या मुंगसाला आपण आपल्या हाताने मारले याचे तीव्र दुःख होऊन तिला रडू कोसळले. कोणतीही गोष्ट करण्यापूर्वी सर्व परिस्थितीचा नीट विचार करावा हे या गोष्टीचे तात्पर्य सांगण्यात आले आहे.

दुसरी गोष्ट अशी—

एका अरण्यात एक मोठा वटवृक्ष होता. या वटवृक्षाच्या बुंध्यालगत असलेल्या ढोलीत एक मोठा कृष्ण सर्प राहात असे. वटवृक्षावर काही बगळ्यांची वस्ती होती. तो सर्प नित्यनेमाने या बगळ्यांची पिल्ले खात असे. एकदा त्याने अशाच एका बगळ्याची पिल्ले खाल्ली. दुःखित झालेला हा बगळा त्या वृक्षाच्या नजीक असलेल्या एका तळ्याकाठी जाऊन अश्रू ढाळीत बसला. बगळ्याला असे दुःख करताना पाहून तेथे असलेल्या एका खेकड्याने त्याला विचारले, महाराज आपल्याला काय झाले आहे? मी आपल्याला काही मदत करू का? बगळा म्हणाला, आज या कृष्णसर्पाने माझी पिल्ले खाल्ली, त्याचे दुःख होऊन मी अश्रू ढाळतो आहे. त्या सर्पाचा नाश करण्यास तू जर मला मदत करशील तर तुझे माझ्यावर मोठे उपकार होतील. खेकड्याने विचार केला की साप आणि बगळे हे दोघेही खेकड्यांचे जन्मजात शत्रू आहेत, तेव्हा त्या दोघांचाही नाश करण्याची ही उत्तम संधी आहे. खेकडा बगळ्याला म्हणाला, ''महाराज, त्या कृष्ण सर्पाचा नाश करण्याची एक युक्ती मी तुम्हांला सांगतो. या वृक्षाच्या जवळच एका बिळात एक मुंगूस राहते. तुम्ही या बिळापासून वृक्षाच्या ढोलीत सर्प राहतो त्या ढोलीपर्यंत मांसाचे तुकडे टाकून ठेवा. ते मुंगूस मांसाच्या तुकड्यांचा माग काढीत सर्पाच्या ढोलीपर्यंत जाईल आणि सर्पाला ठार करील.'' बगळ्याला ही युक्ती पसंत पडली आणि त्याने त्याप्रमाणे केले. मांसाचे तुकडे खात ते मुंगूस वृक्षाच्या ढोलीपर्यंत आले आणि तेथे बसलेल्या सर्पाला त्याने ठार मारले. पण नंतर ते वटवृक्षावर चढले आणि त्याने बगळ्याचे सर्व कुटुंबही ठार केले. गोष्टीचे तात्पर्य असे की मित्राचा बुरखा पांघरलेल्या शत्रूवर विश्वास ठेवू नका.

# बलाढ्य मुंगी

वाचनालय
बाल वाङ्मय विभाग
दिनांक

मुंगी बलाढ्य? तुम्ही म्हणाल, हे काय सांगता? आपल्याला माहीत असलेल्या प्राण्यांमध्ये मुंगी हा सर्वात लहान आणि म्हणून सर्वात दुर्बळ प्राणी आहे, असे आपण समजतो. मग मुंगी बलाढ्य कशी? हो, तसे असले तरी मुंगी हा बलाढ्य प्राणी आहे. मुंगीचे बळ हे तिच्या संघटनेत आहे. एकेक मुंगी कोणीही सहज चिरडून टाकील. पण मुंगी हा संघटना करून सामुदायिक जीवन जगणारा प्राणी आहे. मुंग्यांच्या संघटनेचे बळ एवढे मोठे असते की, मोठमोठे प्राणी त्यांना घाबरून पळतात. माणसाचा एक अपवाद सोडला तर, उत्तम संघटना करून जगणारा मुंगीसारखा दुसरा प्राणी नाही.

मुंग्यांच्या शास्त्रज्ञांना माहीत असलेल्या ५,००० जाती आहेत. या जातींचे ठळक असे आठ गट आहेत. रानात मातीची वारुळे करून राहणारी मुंगी ही मुंग्यांची प्रमुख जात होय. उत्तर व दक्षिण ध्रुवाकडचे अति थंड प्रदेश सोडल्यास जगाच्या सर्व भागांत या मुंग्या आढळतात. मुंग्यांच्या संघटनेची शिस्त, चिकाटी आणि त्यांचे क्रौर्य पाहून मन थक्क होते. रानातल्या मुंग्या त्यांच्या मार्गात येणाऱ्या प्रत्येक प्राण्यावर सामुदायिक हल्ला चढवून त्याचा हा हा म्हणता फडशा पाडतात. त्यांच्या तडाख्यातून निसटण्याचा चपळपणा ज्यांच्या अंगी असेल असेच प्राणी फक्त मग सुखरूप राहू शकतात.

मुंग्यांचे वारूळ जर फोडले तर मुंग्यांच्या झुंडीच्या झुंडी आतून बाहेर पडतात. एका वारुळात कित्येक लाख मुंग्या असतात. गंमत अशी की मुंग्यांची ही



प्रचंड प्रजा एकाच 'राणी' पासून झालेली असते. ही 'राणी' वर्षातून दहा वेळा अंडी घालते. यांपैकी पहिल्या नऊ खेपेस अंडी घालते तेव्हा त्यामधून जन्मणाऱ्या मुंग्या या कामगार व सैनिक मुंग्या असतात. या मुंग्या प्रजोत्पादनाचे काम करत नाहीत. आपल्या समूहासाठी खाद्य गोळा करणे, ते वाहून आणून वारुळात साठवणे आणि समूहांचे संरक्षण करणे ही या कामगार मुंग्यांची कामे असतात. त्यात या मुंग्या थोडासुद्धा कामचुकारपणा करणार नाहीत. राणी जेव्हा दहाव्या खेपेस अंडी घालते तेव्हा त्यामधून सुमारे २,००० नर आणि सहा राण्यांचा जन्म होतो. राणीने दहा वेळा अंडी घालून जन्मास येणाऱ्या मुंग्यांची संख्या मूळ समूहाच्या जवळजवळ दुप्पट असते!

मुंगीच्या जन्माच्या तीन अवस्था असतात : (१) अंड्यामधून बाहेर पडणारी अळी, (२) कोश आणि (३) मुंगी. मुंगी कामगार-मुंगी असो, सैनिक-मुंगी असो वा राणी असो, तिचा जन्म या तीन अवस्थांनीच होतो. मुंग्यांचा या तीन अवस्थांतून जन्म होतो, तेव्हा त्यांच्या समूहात घडणाऱ्या घडामोडी फार मनोरंजक असतात. पक्व झालेल्या कोशांच्या आतील जीव बाहेर पडण्यासाठी जेव्हा वळवळू व धडपडू लागतात, तेव्हा कामगार मुंग्यांच्या अंगात भलताच जोम व उत्साह संचारतो. त्या या कोशाला पुढेमागे असे जोजवतात, त्याला चाटतात, चुचकारतात, गोंजारतात, आपल्या पायांनी त्याला थापटतात. मुंग्यांच्या समूहाचा हा एक प्रकारे उत्सवच असतो. पण एकदा कोशांमधून नव्या मुंग्या बाहेर पडल्या की आजपर्यंत एका ठिकाणी स्थिर असलेला मुंग्यांचा हा समूह ताबडतोब भटकेगिरी सुरू करतो. अशा रीतीने भटकत राहिल्यावर, राणीची जेव्हा अंडी घालण्याची दुसरी खेप येते तेव्हा हा समूह पुन्हा कोठे तरी वारूळ करून पुन्हा स्थिर होतो. याप्रमाणे स्थिर जीवन आणि भटकंती असा हा क्रम चालू राहतो.

मुंग्यांची फौज एकदा वारुळाच्या बाहेर पडली की रानातील जमिनीवर जे जे मध्ये येईल त्याचा पडशा पाडीत ती आगेकूच करत राहते. कोणत्या एका विशिष्ट दिशेला जायचे असे त्यांचे ठरलेले नसते. एकदा चाल सुरू झाल्यावर जी दिशा लागेल त्या दिशेने त्या जात राहतात. बहुधा होते ते असे. मुंग्यांचे थवे बाहेर पडले की त्यांच्यात गर्दी व रेटारेटी सुरू होते, तेव्हा काही कामगार मुंग्या आघाडीवर रेटल्या जातात. मग या आघाडीवरच्या मुंग्या जी दिशा घेतील, त्या दिशेने सर्व मुंग्या डोळे झाकून जाऊ लागतात. एखाद्या वेळेस रांग तुटते किंवा पुढच्या व मागच्या मुंग्यांमध्ये जास्त अंतर पडते. परंतु मुंग्यांच्या गुदद्वाराला एक वास येतो व या वासाचा माग काढीत मुंग्या जात राहतात. त्यामुळे रांग तुटली तरी शेवटी त्या एके ठिकाणी येतात.

मुंग्यांची फौज येत आहे, असे पाहिल्यावर रानातील प्राणीवर्गात अक्षरशः घबराट उडते. पाखरे, फुलपाखरे यांसारखे ज्यांना उडता येते ते प्राणी झटपट हवेत उडून सुरक्षित ठिकाणी जातात. उड्या मारणारे गवती किड्यांसारखे प्राणी आगेकूच करणाऱ्या मुंग्यांच्या दळापुढे सैरावैरा उड्या मारीत पळत सुटतात. पण विंचू, कोळी यांच्या सारखे, कमी चपळ असलेले प्राणी मुंग्यांच्या तडाख्यात



सापडतात आणि मग मुंग्या या प्राण्यांना फोडून काढतात. असा एखादा प्राणी मुंग्यांच्या कचाटचात एकदा सापडला की त्यातून त्याची सुटका होणे अगदी अशक्य. कारण तो प्रतिकार करू लागला, फार काय तो नुसते अंग झटकू लागला की मुंग्या अधिकच चवताळतात आणि जास्त जास्त मुंग्या येऊन त्याच्यावर त्वेषाने तुटून पडतात. मुंग्यांचे दळ वाटेत सापडणाऱ्या इतर कृमिकीटकांची अंडी, घरटी वगैरेंचा विध्वंस करीत पुढे जात राहते. मुंग्यांच्या सैनिकांनी अशा रीतीने भक्ष्य एकदा खतम केले की मागाहून येणाऱ्या कामगार मुंग्या ते वारुळात नेण्याचे काम करतात.

लहानसहान प्राण्यांची गोष्ट तर सोडाच, पण सापासारखा मोठा प्राणीसुद्धा मुंग्यांना भयंकर घाबरतो. मुंग्यांचे दळ येत असल्याची नुसती चाहूल लागली तरी साप झपाझप दूर निघून जातो. सापाला कोठे खरचटले असेल अशा वेळी जर तो मुंग्यांच्या तावडीत सापडला तर मरण्याखेरीज त्याला दुसरी गतीच नाही. मुंगी हा असा हिंस्र व बलाढ्य प्राणी आहे. पण त्याची शक्ती त्याच्या समूहात व त्या समूहाच्या शिस्तशीर संघटनेत आहे.


# हत्ती

हत्ती पाहिला नाही असा माणूस आपल्या देशात शोधूनही सापडणार नाही. भारताच्या पूर्व व दक्षिण भागात हत्ती वन्य अवस्थेत आढळतात. पाळलेले हत्ती तर देशाच्या बहुतेक भागात कुठे ना कुठे तरी पाहायला मिळतात. गेल्या हजारो वर्षांपासून आपण हत्तींचा अनेक कामांसाठी उपयोग करून घेत आहोत. अगदी पेशवाईच्या काळापर्यंत हत्तींचा लढाईसाठी उपयोग करीत. शिवाय हत्ती हे खानदानी श्रीमंतीचे एक लक्षण मानण्यात येत असे. अशा श्रीमंत माणसाचे वर्णन "त्याच्या दारात हत्ती झुलतो" अशा शब्दांत करण्यात येत असे. राजेराजवाड्यांच्या मिरवणुकांत शृंगारलेल्या हत्तींना मोठे मानाचे स्थान असे. जंगले तोडण्यासाठी आणि लाकडाचे ओंडके वाहून नेण्यासाठी हत्तीसारखे दुसरे उपयुक्त जनावर नाही. सर्कशीत हत्ती हा सर्वांच्या आकर्षणाचा विषय. आपल्या देशात तरी हत्तीशिवाय सर्कस होणारच नाही.

हत्तीचा अगडबंब आकार बघितला की आपल्याला गंमत वाटते. पण हत्तीच्या आकारालाही सौष्ठव आहे. हत्तीची सोंड, सुळे, गोल डोके, पंख्यासारखे कान आणि खांबासारखे पाय यांनी एक सुंदरशी लय साधली आहे. आपल्या देशात पूर्वीच्या काळी शिल्पकारांनी दगडात जे कोरीव काम करून ठेवले आहे त्यात हत्ती हमखास आढळून येतो. कित्येक ठिकाणी हत्तींच्या ओळींच्या ओळी दाखवतात. कसे सुंदर नक्षीकाम दिसते ते! हत्ती हा आपल्या खास प्रेमाचा विषय आहे. म्हणून तर इतर देशातल्या मुलांना विशेष भेट पाठवायची झाली तर आपण हत्तीचे पिल्लू पाठवतो. अनेक देशांत आपण अशी हत्तीची पिल्ले तेथल्या प्राणीसंग्रहालयात पाठविली आहेत. हे हत्ती पाहून त्या देशातल्या मुलांना भारताची आठवण नक्कीच होत असेल.

हत्तींच्या दोन जाती आहेत. आफ्रिकन आणि आशियाई किंवा भारतीय अशा हत्तींच्या या दोन जाती आहेत. आफ्रिकन हत्ती भारतीय हत्तींपेक्षा आकाराने मोठा व लांबट असतो. तसेच आफ्रिकन हत्तीचे कान व सुळे भारतीय हत्तीपेक्षा अधिक मोठे असतात.

जमिनीवर राहणाऱ्या सर्व प्राण्यांपेक्षा हत्ती हा सर्वात मोठा प्राणी तर आहेच, पण त्याच्या लांबलचक सोंडेमुळे सर्व प्राण्यांत तो अगदी वेगळा आहे. गंमत अशी की हत्ती हा आपल्याला इतका परिचित आहे की त्याचे वेगळेपण आपल्या लक्षात येत नाही. हत्तीचे सुळे म्हणजे त्याचे धारदार दात होत. मोठ्या आफ्रिकन हत्तीचा



एकएक सुळा सात-आठ फुटांपर्यंत लांब असतो व त्याचे वजन ८५ ते ९० किलो भरते. हे हस्तिदंत जसे घट्ट व भरीव असते तसेच ते मऊ व ठिसूळही असते. म्हणून हस्तिदंतावर अतिशय नाजूक असे कोरीव काम करता येते. हस्तिदंताच्या या गुणामुळे तो एक अत्यंत किमती पदार्थ मानला गेला आहे. हस्तिदंताच्या कोरीव वस्तूंना जगात सर्वत्र मोठी मागणी असते. हस्तिदंतावर हत्तीचीच कोरीव माळ बघितली म्हणजे मोठी मौज वाटते.

हत्ती आपल्या सुळचांचा उपयोग झाडेझुडपे उन्मळून टाकण्यासाठी व ती उचलण्यासाठी करतात. शिवाय शत्रूशी लढण्याचा प्रसंग असेल तर या सुळचांचा हत्तीला चांगलाच उपयोग होतो. अन्न चावण्यासाठी म्हणून हत्तीच्या तोंडात जे

दात असतात ते सुद्धा अगदी वेगळ्या धर्तीचे आहेत. वरच्या जबड्यात एक व खालच्या जबड्यात एक असे दोन्ही बाजूला मिळून खाण्याचे अवघे चारच दात असतात. पण कालांतराने हे दात झिजून निकामी होतात आणि त्यांची जागा त्यांच्या मागे असलेले सुप्त दात घेतात. अशा प्रकारे हत्तीच्या आयुष्यात पाच वेळा दात बदलतात. म्हणजे पहिले चार आणि नंतर पाच वेळा बदलून आलेले वीस असे एकूण चोवीस दात हत्तीला त्याच्या आयुष्यात प्राप्त होतात. जसा हत्ती तसा त्याचा दात. हत्तीचा एक दात सुमारे चार किलो वजनाचा असतो आणि त्याची लांबी सुमारे एक फुट व रुंदी जवळजवळ तितकीच असते. दाताचा वरचा भाग करवती असतो.

हत्तीचा आकार केवढा असतो? आफ्रिकन हत्तीची सरासरी उंची ११ फूट आणि वजन ७ टन (६३५०.४ कि.ग्रॅ.) आणि भारतीय हत्तीची सरासरी उंची १० फूट आणि वजन ६ टन (५,४४३.२ कि.ग्रॅ.) असते. हत्ती हा पूर्णतया शाकाहारी प्राणी आहे. वयात आलेला हत्ती फळे, पाला व फांद्या मिळून रोजी पाव टन खाद्य खातो. हत्ती पाणीही जबर पितो. रोज त्याला सुमारे १९० लिटर (५० गॅलन) पाणी प्यायला लागते. हत्ती प्रथम सोंडेत पाणी घेतो आणि नंतर सोंडेतून त्याची धार घशात सोडतो. सोंडेत एका वेळी ८ लिटर (२ गॅलन) पाणी मावते.

हत्तीची सोंड ही एक अजब गोष्ट आहे. असा विलक्षण अवयव दुसऱ्या कोणत्याही पशूस नाही. वास्तविक पहाता, हत्तीची सोंड म्हणजे लांबट झालेले नाक होय. नाक नुसतेच लांबट झालेले नाही तर ते हलविता, फिरविता येते. हत्तीच्या सोंडेस आतून दोन नळ्या असतात आणि तिच्या पुढच्या टोकाला नाकपुड्यांची दोन भोके असतात. सोंडेचे वजन सुमारे ११५ कि.ग्रॅ. असते आणि तीत गुंतागुंतीच्या हजारो स्नायूंचे एक जाळे असते. हे स्नायू इतके बलदंड असतात की हत्ती सोंडेने लाकडांचे मोठमोठे ओंडके सहज लीलया उचलू शकतो. मोठमोठे वृक्ष उन्मळून टाकू शकतो, त्याचबरोबर त्याची सोंड इतकी संवेदनाक्षम असते की तिने तो बारीकशी फांदी, कोवळे पानसुद्धा पकडू शकतो. आपल्या हाताची बोटे जे काम करतात ते हत्तीच्या सोंडेचे टोक करते. त्याला हत्तीचे "बोट" असेच म्हणतात. आफ्रिकन हत्तीला अशी दोन "बोटे" असतात तर भारतीय हत्तीला एकच असते.

सोंडेचा आणखी एक उपयोग म्हणजे हत्ती सोंडेने आवाज काढतो. हत्तीचा हा आवाज तुतारीसारखा असतो. वाघसिंहाच्या जंगल फाडून टाकणाऱ्या डरकाळीसारखा हत्तीचा आवाज भयप्रद नसला तरी खूप दूरपर्यंत ऐकू येईल इतका तो मोठा असतो. हत्तीला सोंडेचा आणखी एक उपयोग आहे. हत्ती जेव्हा नदीत किंवा सरोवरात डुबतो तेव्हा सोंड पाण्याच्या पृष्ठभागावर ठेवून तिने तो हवा घेत राहतो. हत्ती हा पाण्यातला प्राणी नव्हे. तरीसुद्धा हत्तीला पाण्याची फार आवड असते. सोंडेत पाणी भरून ते आपल्या अंगावर व वेळप्रसंगी इतरांच्या अंगावर उडविणे हा हत्तीचा एक आवडता खेळ होय. हत्ती खोल पाण्यात शिरला की आपोआप पोहू लागतो आणि शरीराचे एवढे अवाढव्य धूड असूनही हत्ती आश्चर्य करावे इतक्या सहजतेने पोहतो. हत्तीचे नाक फार तिखट असते. त्याला



बारीकसारीक गोष्टींचेही वास येतात. पण या प्रचंड शरीरात निसर्गाने एक न्यून मात्र ठेवले आहे, ते म्हणजे हत्तीचे डोळे. हत्तीचे डोळे अगदी लहान असतात आणि त्याची दृष्टीही काहीशी अधू असते. हत्तीचे कातडे खूप जाड असते आणि त्यावर घर्मग्रंथी म्हणजे घाम बाहेर पडण्याची छिद्रे नसतात. यामुळे हत्तीला उष्णता सहन करता येत नाही. हवा फार गरम असेल अशा वेळी मग हत्ती पाण्यात जाऊन बसतात व सोंडेने पाणी अंगावर उडवत राहतात. गरम हवा सहन करण्याची हत्तींची आणखी एक युक्ती आहे. ते सर्व शरीर चिखलाने माखवून घेतात. अंगावर कपडा घालावा तसे.


हत्ती हा कळपाने राहणारा प्राणी आहे. कळपात दहा-बारा हत्ती असतात. पण गंमत अशी की कळपात नर मात्र दोन-तीनच असतात, बाकीच्या सर्व माद्या. अपत्याचा सांभाळ, पालनपोषण करण्यात हत्तींच्या प्रगत बुद्धीची प्रचिती येते. हत्तीण व्यायली की कळपातल्या इतर हत्तिणी तिचे सुईणपण करतात. बच्चा चिखलात रुतून पडला असेल अथवा अवघड जागी धडपडला असेल तर त्याला वर उचलून चांगल्या आरामशीर जागी नेऊन ठेवण्यास त्याच्या आईला त्याच्या काकू-मावश्या मदत करतात. बच्चा चांगला पाच-सहा वर्षांचा होईपर्यंत कळपातील सर्व हत्तिणी त्याच्या खाण्यापिण्याची व सुरक्षिततेची काळजी वाहतात. त्यातही पुन्हा त्या लहानग्याची वयात आलेली थोरली बहीण विशेषच काळजी घेत असल्याचे काही प्राणीनिरीक्षकांनी प्रत्यक्ष पाहिले आहे. बच्चा नर असेल तर त्याला सातव्या-आठव्या वर्षी कळपाच्या बाहेर काढण्यात येते. तो मग काही वर्षे

दात असतात ते सुद्धा अगदी वेगळ्या धर्तीचे आहेत. वरच्या जबड्यात एक व खालच्या जबड्यात एक असे दोन्ही बाजूला मिळून खाण्याचे अवघे चारच दात असतात. पण कालांतराने हे दात झिजून निकामी होतात आणि त्यांची जागा त्यांच्या मागे असलेले सुप्त दात घेतात. अशा प्रकारे हत्तीच्या आयुष्यात पाच वेळा दात बदलतात. म्हणजे पहिले चार आणि नंतर पाच वेळा बदलून आलेले वीस असे एकूण चोवीस दात हत्तीला त्याच्या आयुष्यात प्राप्त होतात. जसा हत्ती तसा त्याचा दात. हत्तीचा एक दात सुमारे चार किलो वजनाचा असतो आणि त्याची लांबी सुमारे एक फुट व रुंदी जवळजवळ तितकीच असते. दाताचा वरचा भाग करवती असतो.

हत्तीचा आकार केवढा असतो? आफ्रिकन हत्तीची सरासरी उंची ११ फूट आणि वजन ७ टन (६३५०.४ कि.ग्रॅ.) आणि भारतीय हत्तीची सरासरी उंची १० फूट आणि वजन ६ टन (५,४४३.२ कि.ग्रॅ.) असते. हत्ती हा पूर्णतया शाकाहारी प्राणी आहे. वयात आलेला हत्ती फळे, पाला व फांद्या मिळून रोजी पाव टन खाद्य खातो. हत्ती पाणीही जबर पितो. रोज त्याला सुमारे १९० लिटर (५० गॅलन) पाणी प्यायला लागते. हत्ती प्रथम सोंडेत पाणी घेतो आणि नंतर सोंडेतून त्याची धार घशात सोडतो. सोंडेत एका वेळी ८ लिटर (२ गॅलन) पाणी मावते.

हत्तीची सोंड ही एक अजब गोष्ट आहे. असा विलक्षण अवयव दुसऱ्या कोणत्याही पशूस नाही. वास्तविक पहाता, हत्तीची सोंड म्हणजे लांबट झालेले नाक होय. नाक नुसतेच लांबट झालेले नाही तर ते हलविता, फिरविता येते. हत्तीच्या सोंडेस आतून दोन नळ्या असतात आणि तिच्या पुढच्या टोकाला नाकपुड्यांची दोन भोके असतात. सोंडेचे वजन सुमारे ११५ कि.ग्रॅ. असते आणि तीत गुंतागुंतीच्या हजारो स्नायूंचे एक जाळे असते. हे स्नायू इतके बलदंड असतात की हत्ती सोंडेने लाकडांचे मोठमोठे ओंडके सहज लीलया उचलू शकतो. मोठमोठे वृक्ष उन्मळून टाकू शकतो, त्याचबरोबर त्याची सोंड इतकी संवेदनाक्षम असते की तिने तो बारीकशी फांदी, कोवळे पानसुद्धा पकडू शकतो. आपल्या हाताची बोटे जे काम करतात ते हत्तीच्या सोंडेचे टोक करते. त्याला हत्तीचे "बोट" असेच म्हणतात. आफ्रिकन हत्तीला अशी दोन "बोटे" असतात तर भारतीय हत्तीला एकच असते.

सोंडेचा आणखी एक उपयोग म्हणजे हत्ती सोंडेने आवाज काढतो. हत्तीचा हा आवाज तुतारीसारखा असतो. वाघसिंहाच्या जंगल फाडून टाकणाऱ्या डरकाळीसारखा हत्तीचा आवाज भयप्रद नसला तरी खूप दूरपर्यंत ऐकू येईल इतका तो मोठा असतो. हत्तीला सोंडेचा आणखी एक उपयोग आहे. हत्ती जेव्हा नदीत किंवा सरोवरात डुंबतो तेव्हा सोंड पाण्याच्या पृष्ठभागावर ठेवून तिने तो हवा घेत राहतो. हत्ती हा पाण्यातला प्राणी नव्हे. तरीसुद्धा हत्तीला पाण्याची फार आवड असते. सोंडेत पाणी भरून ते आपल्या अंगावर व वेळप्रसंगी इतरांच्या अंगावर उडविणे हा हत्तीचा एक आवडता खेळ होय. हत्ती खोल पाण्यात शिरला की आपोआप पोहू लागतो आणि शरीराचे एवढे अवाढव्य धूड असूनही हत्ती आश्चर्य करावे इतक्या सहजतेने पोहतो. हत्तीचे नाक फार तिखट असते. त्याला



बारीकसारीक गोष्टींचेही वास येतात. पण या प्रचंड शरीरात निसर्गाने एक न्यून मात्र ठेवले आहे, ते म्हणजे हत्तीचे डोळे. हत्तीचे डोळे अगदी लहान असतात आणि त्याची दृष्टीही काहीशी अधू असते. हत्तीचे कातडे खूप जाड असते आणि त्यावर घर्मग्रंथी म्हणजे घाम बाहेर पडण्याची छिद्रे नसतात. यामुळे हत्तीला उष्णता सहन करता येत नाही. हवा फार गरम असेल अशा वेळी मग हत्ती पाण्यात जाऊन बसतात व सोंडेने पाणी अंगावर उडवत राहतात. गरम हवा सहन करण्याची हत्तींची आणखी एक युक्ती आहे. ते सर्व शरीर चिखलाने माखवून घेतात. अंगावर कपडा घालावा तसे.

हत्ती हा कळपाने राहणारा प्राणी आहे. कळपात दहा-बारा हत्ती असतात. पण गंमत अशी की कळपात नर मात्र दोन-तीनच असतात, बाकीच्या सर्व माद्या. अपत्याचा सांभाळ, पालनपोषण करण्यात हत्तींच्या प्रगत बुद्धीची प्रचिती येते. हत्तीण व्यायली की कळपातल्या इतर हत्तिणी तिचे सुईणपण करतात. बच्चा चिखलात रुतून पडला असेल अथवा अवघड जागी धडपडला असेल तर त्याला वर उचलून चांगल्या आरामशीर जागी नेऊन ठेवण्यास त्याच्या आईला त्याच्या काकू-मावश्या मदत करतात. बच्चा चांगला पाच-सहा वर्षांचा होईपर्यंत कळपातील सर्व हत्तिणी त्याच्या खाण्यापिण्याची व सुरक्षिततेची काळजी वाहतात. त्यातही पुन्हा त्या लहानग्याची वयात आलेली थोरली बहीण विशेषच काळजी घेत असल्याचे काही प्राणीनिरीक्षकांनी प्रत्यक्ष पाहिले आहे. बच्चा नर असेल तर त्याला सातव्या-आठव्या वर्षी कळपाच्या बाहेर काढण्यात येते. तो मग काही वर्षे

कळपाच्या आसपास पण एकटाच राहतो. साधारणपणे विसाव्या वर्षी तो वयात येतो, तेव्हा त्याला पुन्हा कळपात घेण्यात येते. हत्तींचे कळप तर असतातच, शिवाय ज्या प्रदेशात हत्तींची वस्ती असते त्या प्रदेशातल्या निरनिराळ्या कळपांचे एकमेकांशी पूर्ण सहकार्य असते. आवाज करून ते सतत एकमेकांना संदेश देतात आणि संकटाच्या प्रसंगी एकमेकांच्या मदतीला धावून जातात.

हत्तीचा उत्क्रांतीचा काळ चार कोटी वर्षांचा आहे. आफ्रिकन आणि आशियन अशा हत्तींच्या ज्या दोन जाती आहेत त्यांचा मूळ पूर्वज एकच होता. त्याचे प्राणीशास्त्रातील नाव उच्चारायला जरा कठीणच आहे– ''मोएरिथ्रियम''. सांगितले तर तुम्हाला खरे वाटणार नाही–हत्तींचा हा जो कोणी पूर्वज होता तो अवघा दोन फूट उंचीचा प्राणी होता. दिसायला म्हणाल तर डुकरासारखा. पाय जाड व भक्कम. तोंड लांबोळके. शाकाहारी. जमिनीतले कंद व मुळे हे त्याचे खाद्य. कठीण व घट्ट जमिनीतले कंद व मुळे उकरून खाण्याच्या उद्योगात, आधीच लांबोळके असलेले त्याचे तोंड जास्त जास्त लांबोळके होत गेले आणि तोंडातले सुळे बाहेर आले. कालांतराने तोंडाच्या लांबोळक्या भागाची सोंड झाली आणि सुळे खूपच मोठे झाले. संरक्षणाच्या गरजेतून शरीर वाढत वाढत अवाढव्य झाले व कातडी जाड झाली.



हत्तींचे सुळे हे त्याचे वैशिष्टय खरे, पण आज तेच त्याच्या मुळावर आले आहे. खरे तर माणूस त्याच्या मुळावर आला आहे. हस्तिदंत ही माणसाने एक मूल्यवान वस्तू मानली आहे. अगदी सोन्याच्या मोलाची. आफ्रिकेत हस्तिदंतासाठी गेल्या पन्नास-पाऊणशे वर्षांत हत्तीची जी प्रचंड हत्या झाली ती छाती दडपून टाकणारी आहे. आफ्रिकेत कोटयावधी हत्ती आहेत, कितीही मारले तरी चालतील, असा सोयीस्कर समज करून घेऊन हस्तिदंताचे स्थानिक व युरोपीय व्यापारी आणि त्यांचे मारेकरी हस्तक यांनी दिसला हत्ती की मार असा धडाका लावला. हजारो हत्ती या क्रौर्याचे बळी झाल्याने हत्तींची संख्या बेसुमार घटली. हे एक उदाहरण पाहा. युगांडामध्ये १९६६ साली ८००० हत्ती होते ती संख्या १९७६ साली १६० झाली. काही प्राणी निरीक्षकांनी आफ्रिकेतील हत्तींच्या प्रदेशात प्रवास केला तेव्हा त्यांना जागोजागी हत्तींची मढी व सांगाडे विखुरलेले आढळले. हत्तींचे सुकवलेले मांस तेथले लोक खातात, त्याला मोठी मागणी असते. त्यासाठीही हत्ती मारले जातात. समाधानाची गोष्ट इतकीच की नव्या आफ्रिकन राष्ट्रांच्या सरकारांना हत्तींच्या या भीषण हत्याकांडाची आता पूर्ण जाणीव झाली असून, त्यांनी त्याला पायबंद घालण्याचे कायदे केले आहेत आणि हत्तींची अभयारण्ये उघडली आहेत. पण ही हत्या थांबविण्याचा अटीतटीचा प्रयत्न केल्याखेरीज़ या भव्य, बलशाली, शहाण्या व समंजस प्राण्याला आपण कायमचे मुक.



# उंट व जिराफ

वाळवंटी प्रदेशाचे आपण नेहमी "वैराण", "ओसाड", "निर्जन" या शब्दांत वर्णन करतो. हे प्रदेश तसे असतात हे खरेच. "निर्जन" या शब्दाचा अर्थ जेथे लोक रहात नाहीत असा प्रदेश. पण वाळवंटी प्रदेश ओसाड, वैराण असूनही तेथे कोठे कोठे माणसांची वस्ती असते. वाळवंटी प्रदेशात अनेक प्रकारचे प्राणी राहातात, राहू शकतात याची फारच थोडया जणांना कल्पना असेल. वाळवंटी प्रदेशात जशा काही विशिष्ट प्रकारच्या वनस्पती असतात, तसेच काही प्राणीही असतात. या प्राण्यांचे एक वेगळेच जग आहे, त्यांच्या जगण्याचीही एक वेगळी धर्त आहे.

वाळवंट म्हटले की आपल्यासमोर पहिला कोण उभा रहात असेल तर तो उंट. उंट आणि वाळवंट यांचे आपल्या मनात एक समीकरण झालेले असते म्हणा ना. रेतीमधून चालण्यासाठी योग्य असे लांब पाय व फताडे खूर, अंगाचा फिकट पिवळसर रंग, कसेतरी गुंडाळलेल्या गाठोड्यासारखे शरीर, लोंबते ओठ, लांबलचक मान आणि तोंडावर दिसणारा संथ सोशिकपणाचा भाव हे सर्व उंटाचे ध्यान पाहिले की हा प्राणी निसर्गाने ओसाड वाळवंटासाठी खास पैदा केला आहे असे वाटते. पण वस्तुस्थिती मात्र उलट आहे. उंटाने आपले शरीर वाळवंटाला सोयीचे असे बनवून घेतले आहे.

उंट हा प्राणी आता वन्य अवस्थेत राहाणारा प्राणी राहिलेला नाही. तो माणसाच्या आश्रयाने गेली काही हजार वर्षे राहात आहे. माणसाच्या पाळीव प्राण्यांत तो जमा झालेला आहे. वाळवंटात त्याने माणसाची सतत साथ केली आहे. वाळवंट म्हणजे रेतीचा समुद्र. या रेतीच्या समुद्रातून प्रवास करायला शतकानुशतके माणसाचे एकमेव वाहन उंट हाच होता. म्हणून "वाळवंटातले जहाज" असे उंटाचे वर्णन करण्यात येते. वाळवंटातल्या वाहतुकीसाठी त्याच्यासारखे दुसरे सोयीस्कर जनावर नाही. याचे मुख्य कारण उंट पाण्याशिवाय अनेक दिवस राहू शकतो. या बाबतीत एक गंमत झाली. इसवी सनाच्या पहिल्या शतकात प्लिनी नावाचा एक निसर्गशास्त्रज्ञ झाला. प्लिनीने उंटाच्या पोटात एक मोठी पिशवी असते आणि त्या पिशवीत तो अनेक दिवस पुरेल इतके पाणी भरून ठेवतो अशी माहिती आपल्या एका पुस्तकात लिहून ठेवली. सुमारे दीड हजार वर्षे लोकांनी या गोष्टीवर विश्वास ठेवला. नंतर आधुनिक प्राणीशास्त्रज्ञांनी उंटाचा अभ्यास केला तेव्हा उंटाच्या शरीरात कोठेही पाणी भरून ठेवण्याची पिशवी नाही



असे त्यांना आढळून आले. जेव्हा हिरवे गवत व पाला मिळतो तेव्हा उंट कित्येक महिने पाणी पीत नाही. त्याला जेवढे पाणी लागते ते सर्व त्याला हिरव्या गवतपाल्यापासून मिळते. उन्हाळ्याच्या दिवसात वाळवंटाचा प्रदेश कोरडा ठणठणीत असतो आणि कोठे गवत असेलच तर त्याचा वाळलेला चारा झालेला असतो. असे असले तरी भर उन्हाळ्यात उंट एक आठवडा किंवा त्याहूनही अधिक दिवस पाण्याशिवाय काढू शकतो. तसेच तो दहाबारा दिवस अन्नाशिवाय काढू शकतो. उंट इतके दिवस अन्नपाण्याशिवाय राहू शकतो याचे रहस्य काय? ते



रहस्य आहे उंटाच्या पाठीवरच्या कुबडात. उंटावरच्या पाठीवरचे हे कुबड म्हणजे चरबीचा गोळा असतो. पाणी मिळत नाही तेव्हा उंट कुबडातील चरबी वितळवून त्यातील पाणी शरीराला पुरवितो. शिवाय या चरबीचा तो अन्न म्हणून उपयोग करतो. पाणी आणि हिरवा झाडपाला उपलब्ध असतो तेव्हा उंट त्याचे चरबीत रूपांतर करून ही चरबी पाठीवर साठवून ठेवतो. उंटाच्या कुबडात १० ते १५ किलो चरबी असते. चरबीतून मिळणाऱ्या पाण्याला "चयापचयी पाणी" असे म्हणतात. साधारणपणे एक किलो चरबीतून एक किलो पाणी मिळते. या पाण्यावर उंट आठ-दहा दिवस निभावून नेतो. वाळवंटातल्या प्रवासात चालतानाही त्याची या पाण्याने गरज भागते. हवेत खूप उष्मा असेल तर सस्तन प्राणी त्वचेवर रंध्रामधून घाम बाहेर टाकून शरीर गार ठेवतात. पण उंटाला घामावाटे पाणी वाया दवडून चालण्यासारखे नसते. म्हणून या दिवसात उंट घाम येऊ देत नाही. तसेच तो लघवीही अगदी कमी करतो व त्या मार्गानेही पाणी बाहेर पडू देत नाही. हजारो वर्षे सवय करून त्याने हे शरीरधर्म प्राप्त करून घेतलेले आहेत.

पण पाठीवरच्या चरबीचा अन्नपाण्यासाठी जसजसा उपयोग केला जातो तसतसा उंटा रोडावतो, त्याची ताकद कमी होते. १०-१५ दिवस गेले की मग मात्र त्याला पाणी मिळायला हवे. उंटाच्या मालकांना हे माहिती असते व त्याप्रमाणे ते वाळवंटातील प्रवासाची योजना आखतात. पाण्याचे ठिकाण आले की उंट यथेच्छ पाणी पिऊन घेतात. पुरेसे पाणी व अन्न मिळाले की उंटाचे कुबड हळूहळू फुगत जाते आणि थोड्या दिवसांत पुन्हा पहिल्यासारखे होते. पाण्याशिवाय आठ-दहा दिवस राहू शकेल असे दुसरे कोणते जनावर नाही आणि म्हणूनच वाळवंटातल्या प्रवासासाठी ओझ्याचे जनावर म्हणून उंट माणसाला एवढा उपयुक्त ठरला आहे.

उंटाची एक गंमत सांगायची राहिली. हवेतला ऑक्सीजन शरीरात घेण्यासाठी आणि शरीरातील कार्बन-डाय-ऑक्साईड बाहेर टाकण्यासाठी सर्व प्राणी श्वासोच्छ्वास करतात. श्वास जेव्हा नाकावाटे बाहेर पडतो तेव्हा

शरीरातील पाणीही बाष्परूपाने बाहेर जाते. उंटाला उच्छ्वासातून शरीरातील पाणी असे बाहेर टाकणे परवडण्यासारखे नसते. म्हणून उंटाचा श्वासोच्छ्वास अतिशय मंद गतीने चालतो. श्वासोच्छ्वासाच्या क्रियेने प्राण्याच्या चेहऱ्याला आपोआपच एक तरतरी येते. उंटाचा चेहरा एवढा मख्ख दिसतो त्याचे कारण त्याचा मंद श्वासोच्छ्वास हे आता तुमच्या लक्षात आले असेल.

उंट बेढब दिसतो, पण कलावंताच्या दृष्टीने आपण त्याच्याकडे पाहिले तर त्याच्या आकृतीतही एक लय असल्याचे आपल्याला जाणवेल. लांब पाय, पाठीचे टेकाड, हंसाच्या मानेसारखी बाकदार मान आणि तुंब्यासारखे तोंड या त्याच्या अवयवांनी एक मजेशीर लय साधली आहे. एक उंट बेढब दिसत असेलही, पण उंटाच्या तांड्याचे दृश्य किती सुंदर दिसते. वाळवंटात मावळत्या सूर्याच्या प्रकाशाच्या पार्श्वभूमीवर उंटांची क्षितिजापर्यंत गेलेली लांबच लांब रांग, हे दृश्य अनेक चित्रकारांनी व छायाचित्रकारांनी टिपले आहे.

उंटाबरोबर हटकून आठवण होते ती जिराफाची. कारण दोघेही लांबमाने. पण जिराफ हा काही उंटासारखा वाळवंटी प्राणी नव्हे. गवताळ प्रदेशात जेथे झाडेझुडपे पुष्कळ आहेत अशा ठिकाणी जिराफांची वस्ती असते. आफ्रिका खंड हे जिराफांचे मुख्य वस्तीस्थान. दक्षिण अमेरिकेतही जिराफ आहेत. भारतात मात्र नाही. "जिराफ" हा शब्द भारतीय भाषेतला नाही. लांब मान हे जिराफाचे वैशिष्ट्य आहेच, पण फिकट पिवळसर कातडीवर तऱ्हेतऱ्हेचे नक्षीदार ठिपके हेही जिराफाचे वैशिष्ट्य. उंटाची मान बाकदार, तर जिराफाची सरळ. जिराफाचे तोंड उंटासारखेच, पण थोडे अधिक लांबसर. दोघेही अर्थातच शाकाहारी प्राणी.





जिराफ हा पृथ्वीवरच्या सर्व प्राण्यांमध्ये उंच प्राणी होय. त्याची खांद्यापर्यंत उंची १२ फूट असते. खांद्यापासून पुढे त्याची मान सुमारे ९ फूट असते. अगदी भूमितीच्या भाषेत सांगायचे तर जिराफाची तिरकी मान जमिनीशी ४५ अंशांचा कोन करते. जिराफाने मान ताठ केली तर त्याचे डोके जमिनीपासून १८ फूट उंचीवर येते. जिराफाची मान इतकी उंच असली तरी त्याला फक्त सात मणके (म्हणजे माणसाच्या मानेइतके) असतात. जिराफ आपल्या उंच मानेने १८ ते २० फूट उंचीच्या झाडांचा पाला सहजपणे खाऊ शकते. उंच मानेबरोबरच निसर्गाने जिराफाला लांब जीभही दिली आहे. त्याची जीभ सुमारे दीड फूट लांब असते. तसेच ओठ लवचिक व हलते असतात. म्हणजे झाडपाला ओरबाडून खाण्याच्या दृष्टीने जिराफाच्या शरीराची रचना आदर्श म्हटली पाहिजे. जो पाला इतरांना खाणे शक्य नसते तो जिराफ सहज खाऊ शकते. जिराफाची मान ही अशा रितीने त्याच्या अतिशस फायद्याची गोष्ट आहे. पण ती त्याला घातक ठरणारी पण आहे. एवढी ही उंच मान पाणी पिण्यासाठी खाली वाकविणे त्याला अत्यंत अवघड असते. मानेमुळे त्याला उभ्याने पाणी पिताच येत नाही. त्यासाठी त्याला पुढचे पाय फाकून बसावे लागते, तेव्हा कोठे तोंड पाण्याला मिळवता येते. पण असे पाय फाकून जिराफ बसले की पुन्हा उठून उभे राहणे त्याला फार अवघड होते. म्हणून पाणी पीत असताना जिराफावर हल्ला केला तर ते तावडीतून जाण्याचा, सुटून जाण्याचा संभव कमी. जिराफ हे वाघ, सिंह या प्राण्यांचे भक्ष्य आहे. जिराफ पाणी प्यायला

बसते वेळी हे भक्षक प्राणी आपला मोका साधतात आणि जिराफाचा फडशा पाडतात. सांबराला आपली फांदेरी शिंगे जशी धोक्याची ठरतात तशीच जिराफाला त्याची मान घातक ठरते.

पण एक आहे, जिराफाच्या अंगावरचे ठिपके त्याला संरक्षण देतात. जिराफ विशेषत: संध्याकाळी झाडखाली जाऊन उभे राहिले तर त्याच्या ठिपक्यामुळे ते झाडापासून वेगळे दिसत नाही. वाघ-सिंह संध्याकाळी भक्ष्य शोधायला बाहेर पडतात तेव्हा झाडाच्या आश्रयाने उभे असलेले जिराफ त्यांना चटकन दिसत नाही. अशा वेळी त्यांना चकवा देऊन जिराफ क्षणार्धात झाडांत पसार होते.

जिराफाची शिंगेही विचित्रच. इतर प्राण्यांची शिंगे टोकेरी असतात तर जिराफाची आजोबांच्या काठीच्या मुठीसारखी. शिंगे म्हणण्यापेक्षा त्या खुंटचा म्हणणे अधिक बरोबर होईल. जिराफाला बहुधा चार शिंगे असतात पण काही काहींना पाच असतात. जिराफाच्या अनेक जाती आहेत आणि त्यांच्या अंगावरच्या ठिपक्यावरून व त्यांच्या रंगावरून त्या सहज ओळखता येतात. जिराफाचे पिल्लू जन्मते तेव्हाच तें थेट त्याच्या आईबापांसारखे असते. आकार छोटा इतकेच. जन्मल्यानंतर ते तासाभरात चांगले चालू लागते.



# कासव

कासव म्हटले म्हणजे आपल्याला ससा आणि कासव यांची गोष्ट हटकून आठवते. अगदी संथ गतीने चालणारे कासव शर्यतीत अतिशय चपळ असलेल्या, पण वाटेत चार ठिकाणी झोप काढणाऱ्या सशाला हरवते अशी ही गोष्ट आहे. चंचलपणाच्या आहारी न जाता माणूस धीमेपणाने प्रगती करत राहिल्यास आपले ध्येय निश्चितपणे गाठू शकतो असे या गोष्टीचे तात्पर्य आहे. धीमेपणाने प्रगती करत राहण्याचा हा जो गुण कासवाला या गोष्टीत चिकटवण्यात आला आहे, तो त्याच्या संथ गतीमुळे होय. कासवाची चाल अतिशय मंद असते याचे कारण त्याचे शरीर, एखादे उपडे केलेले घमेले किंवा टोपली यासारखा दिसणारा पण अत्यंत टणक असलेला त्याचा पाठीचा भाग, या टोपलीखालून कसेबसे बाहेर आलेले



त्याचे डोके, पाय, आणि आखूड शेपूट असे हे कासवाचे रूप मोठे विचित्र वाटते. पण कासव ओबडधोबड असले तरी सुसरी-मगरीसारखे ते आपल्याला ओंगळ व भयप्रद वाटत नाही किंवा त्याची आपल्याला घृणाही येत नाही. एक विचित्र पण मजेशीर दिसाारा प्राणी अशी कासवासंबंधी आपली भावना असते. म्हणून तर जगातल्या लोककथा व नीतिकथा यांमध्ये कासवाचा प्रेमाने समावेश केलेला आढळतो. आपल्या पुराणात विष्णूने जे बारा अवतार घेतल्याचे सांगितले आहे, त्यांत पहिल्या अवताराचा मान कासवाला आहे. कासवाचे रूप तसे विचित्र वाटत असले तरी त्याच्या शरीराला एक प्रमाणबद्ध आकार आहे. याचसाठी आपल्या रांगोळयांमध्ये कासवाची आकृती नेहमी काढतात. विणकामातही कासवाच्या आकृतीची एक विण विणतात.

कासव हा सरपटी प्राण्यांच्या वर्गातला प्राणी आहे. म्हणजे मगरी-सुसरी, साप, सरडे-पाली यांचा कासव भाईबंद होय. सरपटी प्राणी हे पृष्ठवंशीय म्हणजे पाठीचा कणा असलेले प्राणी होत. कासवाच्या पाठीविषयी तर काय सांगावे? एवढया टणक व कठीण कवचाची पाठ असलेला दुसरा कोणताही प्राणी नाही. याच कारणासाठी पूर्वीच्या काळी लोक लढाईत कासवाच्या पाठीच्या ढाली वापरत. पोलादाच्या धारदार तलवारीचा जोराचा घाव पडूनसुद्धा ही ढाल चिरत वा तुटत नसे. म्हणजे बघा कासवाची पाठ किती मजबूत व घट्ट असते. या अवजड पाठीखाली कासव कसे चेंगरल्यासारखे वाटते. एवढा मोठा भार पाठीवर घेऊन चालायचे म्हणजे गती मंद होणारच. पण कासवाच्या शरीराची रचना एकंदरीत मोठी मजेदार असते. त्याच्या पाठीचा कणा हा वरच्या कवचात मिसळला गेलेला असतो. त्यामुळे या कवचाला टणकपणा आलेला आहे. कासवाच्या फासळया बघा कशा फळयांसारख्या सपाट व रुंद आहेत. या फासळयांचा वरील अवजड कवचाला भक्कम आधार मिळतो. पाठीचा कणा असलेल्या सर्व प्राण्यांमध्ये खांद्याची हाडे ही त्याच्या छातीचा वरचा भाग म्हणून असतात. कासवाची खांद्याची हाडे गळयाच्या आत असतात. त्याची मान एवढी लवचिक असते की मान गुंडाळून ते ती कवचाच्या आत सहज ओढून घेऊ शकते. मान, मानेबरोबर डोके आत ओढून घेण्याच्या या युक्तीमुळे कासवाला शत्रूच्या हल्ल्यापासून आपला उत्तम प्रकारे बचाव करता येतो.

कासव जगाच्या बहुतेक सर्व भागात आढळतात. कासवाच्या एकूण सुमारे २०० जाती आहेत. जमिनीवर राहणारी कासवे आहेत तशी नदीच्या व समुद्राच्या पाण्यात राहणारी कासवे आहेत. आपल्या भारतात यमुना नदीत फार कासवे आहेत असे सांगतात. तुम्ही जर कधी मथुरेला गेला असाल तर त्याचे प्रत्यंतर तुम्हाला आले असेल. येथे यमुनेच्या काठावर शेकडो कासवे येऊन पडलेली दिसतात. खेडयांतून विहिरींतही कित्येक ठिकाणी कासवे आढळतात. ज्या विहिरीत कासव आहे त्या विहिरीचे पाणी स्वच्छ व निर्मळ होते अशी एक समजूत आहे. पाण्यातले कीटक कासव खाऊन टाकत असल्याने पाणी स्वच्छ राहते,

एवढाच याचा अर्थ. कासवाच्या समुद्रात राहणाऱ्या काही जाती आहेत, पण कासव हा एकंदरीत पाण्याच्या जवळ राहणारा प्राणी आहे. नद्या, तलाव, सरोवरे, विहिरी, बारवा अशा पाण्याच्या ठिकाणी कासवे राहतात. पाण्यातील छोटे-मोठे मासे व इतर जलचर हे त्यांचे खाद्य.

पण साप, सरडे, मगरी यांच्या भक्ष्य पकडण्याच्या जशा नाटयपूर्ण पद्धती आहेत तशा कासवाच्या नाहीत. हासुद्धा कासवाच्या एकूण मंदपणाचाच एक भाग होय. तथापि, कासवांमध्येही काही अशा जाती आहेत की भक्ष्य पकडण्याच्या त्यांच्या क्लृप्त्या मोठ्या विलक्षण म्हटल्या पाहिजेत. दक्षिण अमेरिकेत ''माटामाटा'' नावाची एक कासवाची जात आहे. हे कासव नद्या-ओहळ यांच्या पाण्याखालील तळाशी राहते. माटामाटा याच्यासारखा विचित्र दिसणारा प्राणी कदाचित शोधूनसुद्धा सापडणार नाही. नुसता चिखलाचा ओबडधोबड गोळा. हा प्राणी घडवताना निसर्गाची काहीतरी चूक झाली असावी असे त्याच्याकडे पाहिल्यावर वाटते. त्याची मान एखाद्या नळकांड्यासारखी लांबच लांब असते आणि त्याच्या नाकपुड्यांतून ते दोन सोंडा बाहेर टाकून पाण्याच्या पृष्ठभागावरून हवा घेऊ शकते. पण सर्वांत गंमतीची गोष्ट म्हणजे त्याच्या अंगावर उगवणारी शेवाळ्यासारखी लव. छोट्या माशांना कासवाच्या अंगावरील ही लव म्हणजे खाण्याची काही वनस्पतीच आहे असे वाटते. बरे, कासव असे मुर्दाड की येथे काही जिवंत प्राणी आहे असे त्या बिचाऱ्या माशांना कळतसुद्धा नाही. ते खुशाल त्याच्याजवळ येतात आणि त्याच्या अंगावरील लव ओरबाडून खाऊ लागतात. ते असे जवळ आले की एखाद्या पंपाने आपण पाणी ज्याप्रमाणे आत खेचून घेतो त्याप्रमाणे हे कासव आपल्या लांबलचक मानेने त्या माशांना तोंडात खेचून घेऊन स्वाहा करते. माटामाटा कासवाप्रमाणेच इतर अमेरिकेच्या नैऋत्य भागात ''अलिगेटर-स्नॅपर'' नावाची एक कासवाची जात आहे. हे कासवसुद्धा दिसायला एखाद्या कचऱ्याच्या ढिगासारखे दिसते आणि त्याच्या अंगावरही शेवाळ्यासारखी लव असून ती खाण्यासाठी मासे त्याच्याकडे आकृष्ट होतात. पण या कासवाची आणखी एक गंमत अशी की ते आपल्या तोंडाचा ''आ'' वासून बसते आणि त्याच्या तोंडामधून गांडुळाप्रमाणे दिसणाऱ्या दोन दोऱ्या लोंबकळत असलेल्या दिसतात. मासे ही ''गांडुळे'' खाण्यासाठी येतात आणि आयतीच कासवाच्या तोंडात पडतात.





कासवाच्या सुमारे २०० जाती आहेत हा उल्लेख वर आलाच आहे. काही कासवे वजनात जेमतेम शंभर-दीडशे ग्रॅम भरतील इतकी छोटी असतात, तर काही कासवे अर्ध्या टनाहून अधिक भरतील एवढी प्रचंड असतात. समुद्र-कासवे ही वजनात व आकाराने मोठी होत. समुद्र-कासवांतही कातडी-पाठीचे किंवा बुंधा-पाठीचे कासव म्हणून जी एक जात आहे त्या जातीचे कासव सुमारे ६०० किलो वजनाचे असते. या कासवाचे वैशिष्टच म्हणजे त्याच्या पाठीवरचे हाडाचे

टणक कवच त्याने टाकून दिलेले आहे. म्हणूनच त्याला कातडी-पाठीचे कासव असे म्हणतात. पाठीवरचे असे टणक कवच नसल्यामुळे हे कासव पाण्यात अतिशय वेगाने जाऊ शकते. कासव हा अत्यंत मंद प्राणी असे आपण म्हणतो ना? पण समुद्रातील हे कासव जगातील सर्व सरपटी प्राण्यांपेक्षा अधिक वेगवान आहे. हिरवे कासव म्हणून समुद्र-कासवाची आणखी एक जात आहे. हिरवे कासव हे सुद्धा पाण्यात पोहण्यात अत्यंत पटाईत असते. पण समुद्र-कासवांच्या बाबतीत महत्त्वाची गोष्ट म्हणजे ही कासवे समुद्रात राहतात आणि अंडी समुद्राच्या काठावरील जमिनीवर घालतात. अंडी घालण्याची वेळ आली की कासवाची मादी समुद्राच्या काठावर येऊन एखाद्या जागची वाळू पायांनी उकरून तेथे खड्डा तयार करते आणि या खड्ड्यात अंडी कधीच उबवत नाही. अंडी वाळूमधील उष्णतेने उबतात. अंड्यात पिल्लू तयार झाल्यानंतर ते स्वतः अंडे फोडून बाहेर येते. अंडे फोडण्यासाठी त्याच्या नाकावर या वेळी एक सोंड उगवलेली असते. पण पिल्लू बाहेर पडल्यानंतर ही सोंड लवकरच गळून पडते.

अंड्यातून बाहेर पडणारी ही पिले मग स्वतःच समुद्राकडे आपला प्रवास सुरू करतात. पण हा प्रवास पुष्कळ वेळा फार धोक्याचा ठरतो. समुद्रावर घिरट्या घालणारे भक्षक पक्षी या पिलांवर झडप घालून त्यांचा चट्टामट्टा करतात. समुद्रात गेल्यावरही काही मोठ्या माशांचे ही पिले भक्ष्य होतात. यातून जगलीवाचलेली पिले मोठी होतात.

कासवाच्या बाबतीत एक विशेष आश्चर्यकारक गोष्ट आढळून आली आहे. काही जातींची कासवे विशिष्ट हंगामात अंडी घालण्याच्या जागी प्रचंड संख्येने जमतात. या संमेलनासाठी काही काही तर खूप अंतरावरून येतात. या संमेलनाचा उद्देश नक्की काय असावा हे प्राणीशास्त्रज्ञांना अद्याप कळलेले नाही. कदाचित अंडी घालण्याच्या नव्या जागा शोधून काढणे हाही त्यांचा उद्देश असावा. कदाचित कासवाच्या प्रवासविषयक आनुवंशिक प्रवृत्तीचा हा भाग असावा. पण कासवांची ही संमेलने एवढी मोठी असतात की ती पाहण्यासाठी आजूबाजूच्या भागातील स्थानिक लोक तेथे गोळा होतात. या वेळी कासवाच्या शिकारी करण्याचा मोका हे लोक साधून घेतात. मास आणि पाठीवरचे कठीण कवच यांसाठी कासवाची शिकार केली जाते. अलीकडील काही वर्षांत कासवांच्या शिकारीचे प्रमाण फार वाढल्याने कासवाच्या काही विशिष्ट जाती नामशेष होतील की काय अशी शास्त्रज्ञांना भीती वाटते. माणसाच्या बाबतीत कासव हा तसा अगदी निरुपद्रवी प्राणी आहे. उलट विहिरी, तलाव यासारखी पाणीपुरवठ्याची साधने स्वच्छ ठेवण्यासाठी त्याचा माणसांला उपयोगच होतो. तेव्हा कासवांची ही मोठ्या प्रमाणावर होणारी हत्या माणसाने थांबविली पाहिजे. पृथ्वीवरील सृष्टीला अनेकविध प्राण्यांमुळे शोभा आलेली आहे व त्यात कासवाचेही एक विशिष्ट स्थान आहे. हे त्याचे स्थान टिकून राहण्यासाठी कासव तर टिकले पाहिजे ना?

घोडा. घोड्याच्या देखण्या सौंदर्याने अनेक चित्रकारांना अगदी वेड लावले. पंधराव्या-सोळाव्या शतकात झालेला जगविख्यात चित्रकार लिआनार्दो द व्हिंची याने घोड्याची निरनिराळ्या अवस्थांतील रेखाचित्रे काढली आहेत. एखाद्या मोठ्या धष्टपुष्ट घोड्याकडे तुम्ही जरा न्याहळून पाहा, किंवा अशा घोड्याचे चित्र पाहा. लांबसर तोंड, उभे बारीक कान, तिरकी भरदार मान, मानेवर उडती आयाळ, पुष्ट छाती, लांबडे शरीर व गोलाकार पुठ्ठे, सडसडीत पाय व सोंगट्यांसारखे खूर, लांब केसांची झुपकेदार शेपूट या घोड्याच्या आकृतीला कशी सुंदर लय आहे! असा प्रमाणबद्ध व बांधेसूद प्राणी दुसरा कोणता नाही. घोड्याचे रंग कितीतरी सुरेख! काही दुधासारख्या शुभ्र पांढऱ्या रंगाचे, तर काही मखमली काळ्याभोर रंगाचे. तांबूस तपकिरी रंगाच्या कित्येक खुलावट छटा घोड्यांमध्ये आढळतात. उगाच नाही चित्रकार व शिल्पकार एवढे घोड्याच्या प्रेमात पडत! तुम्ही वीरपुरुष व वीरांगनांचे पुतळे पाहा. पुतळे बहुधा घोड्यावर स्वार झालेले असतात. घोड्यांमुळे पुतळ्याच्या सौंदर्यात आपोआप भर पडते अशी शिल्पकारांची दृष्टी असते.

असा हा उमदा, देखणा प्राणी घोडा. पण आपण आज घोडा पाहातो तसा तो प्रारंभीपासून नव्हता. उत्क्रांत होत होत त्याने सध्याचे देखणे रूप घेतले. प्राण्यांच्या उत्क्रांतीची ही कथा मोठी मजेशीर आहे.

घोडा हा सस्तन प्राणी. सस्तन प्राण्यांचा अवतार पृथ्वीवर सुमारे अठरा कोटी वर्षांपूर्वी झाला. त्याकाळी पृथ्वीवर दिनासुरासारख्या (डायनोसोरस) प्रचंड शरीराच्या सरपटी प्राण्यांचे युग जोरात होते. सस्तन प्राण्यांनी आपली शरीरे खुटखुटीत व बांधेसूद करून घेतली आणि चार पायांवर जलदपणे धावण्याचे कसब अंगी मुरवले. जीवनकलहात हे सस्तन प्राणी अधिक यशस्वी ठरले आणि त्यांनी या प्रचंड, ओबडधोबड सरपटी प्राण्यांना जगण्याच्या लढाईत हरवून पृथ्वीवर आपले अधिराज्य स्थापन केले. तरी हे सर्व व्हायला सातआठ कोटी वर्षांचा काळ जावा लागला. अशा रीतीने सुमारे सात कोटी वर्षांपूर्वी सस्तन प्राण्यांचे युग भरभराटीला आले ते आजतागायत चालू आहे. गेल्या दहा हजार वर्षांपासून माणसाने (तो स्वतः सस्तन प्राणी असूनही) सस्तन प्राण्यांचा अपरंपार संहार केल्याने त्यांची पिछेहाट सुरू झाली आणि पूर्वीचे काही प्रबळ प्राणी आज नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत, ही गोष्ट जाता जाता लक्षात घ्यायची.

घोड्याची उत्क्रांती सहा कोटी वर्षांपूर्वी झाली. घोड्यांचा आद्य पूर्वज होता त्याला 'इओहिप्पस' असे नाव देण्यात आले आहे. इओहिप्पस आकाराने मांजराएवढा होता. त्याच्या पायांना आंगठे होते. त्याची वस्ती घनदाट जंगलात असे. तो शाकाहारीच होता. झाडांची मऊ, लुसलुशीत पाने हे त्याचे खाद्य होते. त्याच्या दातांची रचना हे खादय खाण्यास सोयीची अशीच होती. कालांतराने पृथ्वीवरचे वातावरण थंड झाले आणि जंगले विरळ झाली. घोड्याचा पूर्वज मग जंगलाचा आपला निवास सोडून मैदानी प्रदेशांच्या आश्रयाला गेला. या प्रदेशांतली परिस्थिती एकदम निराळी होती. येथे जमीन मोकळी, झाडे कमी पण गवत भरपूर. घोड्याच्या त्या पूर्वजांचे गवत हे येथे खाद्य झाले, आणि त्याप्रमाणे त्याच्या

तोंडाच्या व दाताच्या रचनेत बदल झाला. तो प्राणी पाहिल्यापासूनच शाकाहारी व बिनशिंगांचा होता. शत्रूपासून बचाव करण्याचे त्याचे एकमेव साधन म्हणजे पळणे. मैदानी प्रदेशात पळण्याच्या क्रियेत त्याने खूपच वेग व सफाई आणली. त्यासाठी पायाच्या अंगठ्यांचा लोप करून त्या जागी त्याने खूर आणले. त्याच्या शरीराचा आकारही क्रमांक्रमाने वाढत गेला. अशा रीतीने मांजराएवढा तो इओहिप्पस उत्क्रांतीच्या अनेक अवस्थांमधून गेला. घोडा ही त्याची अखेरची अवस्था. आजचा घोडा सुमारे दहा लाख वर्षांपूर्वी आला. तेव्हापासून तो आज आहे तसाच आहे.

घोडा माणसाचा आश्रित आहे. माणूस शेती करू लागला आणि पाठोपाठ त्याने जनावरे पाळण्यास सुरुवात केली, हा मानवाचा उत्क्रांतीतला सर्वात क्रांतिकारक टप्पा होता. माणूस शेती करू लागला म्हणजे काय झाले? जनावर भूक लागली की जेथे खाद्य मिळेल तेथे ते खाऊन घेते आणि पोट भरले की जेथे खाद्य मिळेल तेथे ते खाऊन घेते आणि पोट भरते. अन्नासाठी त्याला वणवण फिरावे लागते. माणूसही या अवस्थेत होता. माणसालाही अन्नाचा शोध घेत असे चारी दिशांना फिरावे लागे. पण माणूस शेती करू लागला, अन्न पिकवू लागला तसा त्याच्यापाशी अन्नाचा वरकड साठा होऊ लागला. अन्नासाठी त्याचे भटकणे संपले. जमीन पिकवायची आणि पिकवलेले धान्य साठवायचे म्हणजे एकाच जागी राहाणे आले. माणसाने घर केले आणि तो स्थिर झाला.

पण जमीन पिकवायची म्हणजे त्यात काबाडकष्ट फार होते. हे काबाडकष्ट हलके करण्यासाठी त्याने एक युक्ती योजली. त्याने आपल्या मदतीस अवतीभोवतीच्या जनावरांपैकी जी नमवता येतील अशी जनावरे घेण्यास सुरुवात केली. तो ही जनावरे पाळू लागला. माणसाच्या आश्रयाला सर्वात पहिला आला तो कुत्रा. माणूस आणि कुत्रा यांची संगत झाली त्याला आता दहा हजार वर्षांहून अधिक काळ लोटला आहे. माणसाने कुत्र्याला जवळ केले तेव्हा तो शेती करीत नव्हता. माणसाने कुत्रा हाताशी घेतला तो बहुधा शिकारीच्या मदतीसाठी. शिवाय हिंस्र श्वापदांपासून संरक्षणाचाही हेतू त्यात असावा. कुत्र्यानंतर आल्या शेळ्यामेंढ्या त्यांचे दूध हे तर त्याचे अन्न झालेच, शिवाय या प्राण्यांमुळे मांसभक्षणाचे एक हमखास साधन त्याच्या हाती आले. शेळ्यामेंढ्यांची कातडी थंडीवाऱ्यापासून संरक्षण करण्याकरिता त्याच्या उपयोगी आली. मेंढपाळ माणूस भटक्याच होता. शेळ्यामेंढ्यांच्या चराईसाठी तो त्यांचे कळप घेऊन नव्या नव्या कुरणांच्या शोधात फिरत राही.

शेळ्यामेंढ्यांनंतर माणसाच्या पाळीव प्राण्यांत गायीगुरांचा व गाढवांचा क्रमांक लागतो. माणूस शेती करू लागल्यानंतरची ही घटना आहे. माणूस प्राणी पाळू लागला तर त्यात भूतदयेचा भाग मुळीच नव्हता. या प्राण्यांच्या खाण्यापिण्यासाठी व संगोपनासाठी माणसाला जो व्यय करावा लागे, त्यापेक्षा त्यांच्या कष्टाने त्याच्या उत्पादनात होणारी वाढ कितीतरी अधिक असे. जमिनीची नांगरणी-वखरणी वगैरे शेतीच्या कामांना त्याने बैलांना जुपले. गायीचे दूध हे तर त्याचे बहुमोल अन्न झाले. शेती व दूधदुभते यावर आधारलेल्या कृषिप्रधान


टणक कवच त्याने टाकून दिलेले आहे. म्हणूनच त्याला कातडी-पाठीचे कासव असे म्हणतात. पाठीवरचे असे टणक कवच नसल्यामुळे हे कासव पाण्यात अतिशय वेगाने जाऊ शकते. कासव हा अत्यंत मंद प्राणी असे आपण म्हणतो ना? पण समुद्रातील हे कासव जगातील सर्व सरपटी प्राण्यांपेक्षा अधिक वेगवान आहे. हिरवे कासव म्हणून समुद्र-कासवाची आणखी एक जात आहे. हिरवे कासव हे सुद्धा पाण्यात पोहण्यात अत्यंत पटाईत असते. पण समुद्र-कासवांच्या बाबतीत महत्त्वाची गोष्ट म्हणजे ही कासवे समुद्रात राहतात आणि अंडी समुद्राच्या काठावरील जमिनीवर घालतात. अंडी घालण्याची वेळ आली की कासवाची मादी समुद्राच्या काठावर येऊन एखाद्या जागची वाळू पायांनी उकरून तेथे खड्डा तयार करते आणि या खड्ड्यात अंडी कधीच उबवत नाही. अंडी वाळूमधील उष्णतेने उबतात. अंड्यात पिल्लू तयार झाल्यानंतर ते स्वतः अंडे फोडून बाहेर येते. अंडे फोडण्यासाठी त्याच्या नाकावर या वेळी एक सोंड उगवलेली असते. पण पिल्लू बाहेर पडल्यानंतर ही सोंड लवकरच गळून पडते.

अंड्यातून बाहेर पडणारी ही पिले मग स्वतःच समुद्राकडे आपला प्रवास सुरू करतात. पण हा प्रवास पुष्कळ वेळा फार धोक्याचा ठरतो. समुद्रावर घिरट्या घालणारे भक्षक पक्षी या पिलांवर झडप घालून त्यांचा चट्टामट्टा करतात. समुद्रात गेल्यावरही काही मोठ्या माशांचे ही पिले भक्ष्य होतात. यातून जगलीवाचलेली पिले मोठी होतात.

कासवाच्या बाबतीत एक विशेष आश्चर्यकारक गोष्ट आढळून आली आहे. काही जातींची कासवे विशिष्ट हंगामात अंडी घालण्याच्या जागी प्रचंड संख्येने जमतात. या संमेलनासाठी काही काही तर खूप अंतरावरून येतात. या संमेलनाचा उद्देश नक्की काय असावा हे प्राणीशास्त्रज्ञांना अद्याप कळलेले नाही. कदाचित अंडी घालण्याच्या नव्या जागा शोधून काढणे हाही त्यांचा उद्देश असावा. कदाचित कासवाच्या प्रवासविषयक आनुवंशिक प्रवृत्तीचा हा भाग असावा. पण कासवांची ही संमेलने एवढी मोठी असतात की ती पाहण्यासाठी आजूबाजूच्या भागातील स्थानिक लोक तेथे गोळा होतात. या वेळी कासवाच्या शिकारी करण्याचा मोका हे लोक साधून घेतात. मास आणि पाठीवरचे कठीण कवच यांसाठी कासवाची शिकार केली जाते. अलीकडील काही वर्षांत कासवांच्या शिकारीचे प्रमाण फार वाढल्याने कासवाच्या काही विशिष्ट जाती नामशेष होतील की काय अशी शास्त्रज्ञांना भीती वाटते. माणसाच्या बाबतीत कासव हा तसा अगदी निरुपद्रवी प्राणी आहे. उलट विहिरी, तलाव यासारखी पाणीपुरवठ्याची साधने स्वच्छ ठेवण्यासाठी त्याचा माणसांना उपयोगच होतो. तेव्हा कासवांची ही मोठ्या प्रमाणावर होणारी हत्या माणसाने थांबविली पाहिजे. पृथ्वीवरील सृष्टीला अनेकविध प्राण्यांमुळे शोभा आलेली आहे व त्यात कासवाचेही एक विशिष्ट स्थान आहे. हे त्याचे स्थान टिकून राहण्यासाठी कासव तर टिकले पाहिजे ना?

# घोडा

प्राण्यांमध्ये सर्वात सुंदर कोण असा प्रश्न विचारला तर त्याचे उत्तर देणे खरोखर कठीण आहे. हरीण आपल्याला भुरळ घालते ते त्याच्या नाजुक, लयदार सौंदर्याने. हत्तीचा भव्य देह आणि लांब, लवचिक सोंड याने हत्तीला एक वेगळाच डौल व रुबाब दिला आहे. आयाळधारी सिंह आणि पिवळा जर्द रंग व त्यावर काळे पट्टे असलेला वाघ हे प्राणी सुंदर नाहीत असे कोण म्हणेल? त्यांचे सौंदर्य रौद्र; खवळलेल्या समुद्रासारखे! हे प्राणी असे सुंदर आहेत म्हणून प्राचीन चित्र-शिल्प कलेत ते हमखास दाखविले जात. प्राचीन भारतीय शिल्पकारांना तर हत्तीखेरीज चैनच पडत नसे. हत्तीची विविध रूपे त्यांना दाखवली आहेत. या प्राण्यांइतका सुंदर, किंबहुना बांधेसूदपणात सरसच म्हणावा असा प्राणी म्हणजे



घोडा. घोड्याच्या देखण्या सौंदर्याने अनेक चित्रकारांना अगदी वेड लावले. पंधराव्या-सोळाव्या शतकात झालेला जगविख्यात चित्रकार लिआनार्दो द व्हिंची याने घोड्याची निरनिराळ्या अवस्थांतील रेखाचित्रे काढली आहेत. एखाद्या मोठ्या धष्टपुष्ट घोड्याकडे तुम्ही जरा न्याहळून पाहा, किंवा अशा घोड्याचे चित्र पाहा. लांबसर तोंड, उभे बारीक कान, तिरकी भरदार मान, मानेवर उडती आयाळ, पुष्ट छाती, लांबडे शरीर व गोलाकार पुठ्ठे, सडसडीत पाय व सोंगट्यांसारखे खूर, लांब केसांची झुपकेदार शेपूट या घोड्याच्या आकृतीला कशी सुंदर लय आहे! असा प्रमाणबद्ध व बांधेसूद प्राणी दुसरा कोणता नाही. घोड्याचे रंग कितीतरी सुरेख! काही दुधासारख्या शुभ्र पांढऱ्या रंगाचे, तर काही मखमली काळ्याभोर रंगाचे. तांबुस तपकिरी रंगाच्या कित्येक खुलावट छटा घोड्यांमध्ये आढळतात. उगाच नाही चित्रकार व शिल्पकार एवढे घोड्याच्या प्रेमात पडत! तुम्ही वीरपुरुष व वीरांगनांचे पुतळे पाहा. पुतळे बहुधा घोड्यावर स्वार झालेले असतात. घोड्यांमुळे पुतळ्याच्या सौंदर्यात आपोआप भर पडते अशी शिल्पकारांची दृष्टी असते.

असा हा उमदा, देखणा प्राणी घोडा. पण आपण आज घोडा पाहातो तसा तो प्रारंभीपासून नव्हता. उत्क्रांत होत होत त्याने सध्याचे देखणे रूप घेतले. प्राण्यांच्या उत्क्रांतीची ही कथा मोठी मजेशीर आहे.

घोडा हा सस्तन प्राणी. सस्तन प्राण्यांचा अवतार पृथ्वीवर सुमारे अठरा कोटी वर्षांपूर्वी झाला. त्याकाळी पृथ्वीवर दिनासुरासारख्या (डायनोसोरस) प्रचंड शरीराच्या सरपटी प्राण्यांचे युग जोरात होते. सस्तन प्राण्यांनी आपली शरीरे खुटखुटीत व बांधेसूद करून घेतली आणि चार पायांवर जलदपणे धावण्याचे कसब अंगी मुरवले. जीवनकलहात हे सस्तन प्राणी अधिक यशस्वी ठरले आणि त्यांनी या प्रचंड, ओबडधोबड सरपटी प्राण्यांना जगण्याच्या लढाईत हरवून पृथ्वीवर आपले अधिराज्य स्थापन केले. तरी हे सर्व व्हायला सातआठ कोटी वर्षांचा काळ जावा लागला. अशा रीतीने सुमारे सात कोटी वर्षांपूर्वी सस्तन प्राण्यांचे युग भरभराटीला आले ते आजतागायत चालू आहे. गेल्या दहा हजार वर्षांपासून माणसाने (तो स्वत: सस्तन प्राणी असूनही) सस्तन प्राण्यांचा अपरंपार संहार केल्याने त्यांची पिछेहाट सुरू झाली आणि पूर्वीचे काही प्रबळ प्राणी आज नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत, ही गोष्ट जाता जाता लक्षात घ्यायची.

घोड्याची उत्क्रांती सहा कोटी वर्षांपूर्वी झाली. घोड्यांचा आद्य पूर्वज होता त्याला 'इओहिप्पस' असे नाव देण्यात आले आहे. इओहिप्पस आकाराने मांजराएवढा होता. त्याच्या पायांना आंगठे होते. त्याची वस्ती घनदाट जंगलात असे. तो शाकाहारीच होता. झाडांची मऊ, लुसलुशीत पाने हे त्याचे खाद्य होते. त्याच्या दातांची रचना हे खादय खाण्यास सोयीची अशीच होती. कालांतराने पृथ्वीवरचे वातावरण थंड झाले आणि जंगले विरळ झाली. घोड्याचा पूर्वज मग जंगलाचा आपला निवास सोडून मैदानी प्रदेशांच्या आश्रयाला गेला. या प्रदेशांतली परिस्थिती एकदम निराळी होती. येथे जमीन मोकळी, झाडे कमी पण गवत भरपूर. घोड्याच्या त्या पूर्वजांचे गवत हे येथे खाद्य झाले, आणि त्याप्रमाणे त्याच्या

तोंडाच्या व दाताच्या रचनेत बदल झाला. तो प्राणी पाहिल्यापासूनच शाकाहारी व बिनशिंगांचा होता. शत्रूपासून बचाव करण्याचे त्याचे एकमेव साधन म्हणजे पळणे. मैदानी प्रदेशात पळण्याच्या क्रियेत त्याने खूपच वेग व सफाई आणली. त्यासाठी पायाच्या अंगठ्यांचा लोप करून त्या जागी त्याने खूर आणले. त्याच्या शरीराचा आकारही क्रमांक्रमाने वाढत गेला. अशा रीतीने मांजराएवढा तो इओहिप्पस उत्क्रांतीच्या अनेक अवस्थांमधून गेला. घोडा ही त्याची अखेरची अवस्था. आजचा घोडा सुमारे दहा लाख वर्षांपूर्वी आला. तेव्हापासून तो आज आहे तसाच आहे.

घोडा माणसाचा आश्रित आहे. माणूस शेती करू लागला आणि पाठोपाठ त्याने जनावरे पाळण्यास सुरुवात केली, हा मानवाचा उत्क्रांतीतला सर्वांत क्रांतिकारक टप्पा होता. माणूस शेती करू लागला म्हणजे काय झाले? जनावर भूक लागली की जेथे खाद्य मिळेल तेथे ते खाऊन घेते आणि पोट भरले की जेथे खाद्य मिळेल तेथे ते खाऊन घेते आणि पोट भरते. अन्नासाठी त्याला वणवण फिरावे लागते. माणूसही या अवस्थेत होता. माणसालाही अन्नाचा शोध घेत असे चारी दिशांना फिरावे लागे. पण माणूस शेती करू लागला, अन्न पिकवू लागला तसा त्याच्यापाशी अन्नाचा वरकड साठा होऊ लागला. अन्नासाठी त्याचे भटकणे संपले. जमीन पिकवायची आणि पिकवलेले धान्य साठवायचे म्हणजे एकाच जागी राहाणे आले. माणसाने घर केले आणि तो स्थिर झाला.


पण जमीन पिकवायची म्हणजे त्यात काबाडकष्ट फार होते. हे काबाडकष्ट हलके करण्यासाठी त्याने एक युक्ती योजली. त्याने आपल्या मदतीस अवतीभोवतीच्या जनावरांपैकी जी नमवता येतील अशी जनावरे घेण्यास सुरुवात केली. तो ही जनावरे पाळू लागला. माणसाच्या आश्रयाला सर्वांत पहिला आला तो कुत्रा. माणूस आणि कुत्रा यांची संगत झाली त्याला आता दहा हजार वर्षांहून अधिक काळ लोटला आहे. माणसाने कुत्र्याला जवळ केले तेव्हा तो शेती करीत नव्हता. माणसाने कुत्रा हाताशी घेतला तो बहुधा शिकारीच्या मदतीसाठी. शिवाय हिंस्र श्वापदांपासून संरक्षणाचाही हेतू त्यात असावा. कुत्र्यानंतर आल्या शेळ्यामेंढ्या त्यांचे दूध हे तर त्याचे अन्न झालेच, शिवाय या प्राण्यांमुळे मांसभक्षणाचे एक हमखास साधन त्याच्या हाती आले. शेळ्यामेंढ्यांची कातडी थंडीवाऱ्यापासून संरक्षण करण्याकरिता त्याच्या उपयोगी आली. मेंढपाळ माणूस भटक्याच होता. शेळ्यामेंढ्यांच्या चराईसाठी तो त्यांचे कळप घेऊन नव्या नव्या कुरणांच्या शोधात फिरत राही.

शेळ्यामेंढ्यांनंतर माणसाच्या पाळीव प्राण्यांत गायीगुरांचा व गाढवांचा क्रमांक लागतो. माणूस शेती करू लागल्यानंतरची ही घटना आहे. माणूस प्राणी पाळू लागला तर त्यात भूतदयेचा भाग मुळीच नव्हता. या प्राण्यांच्या खाण्यापिण्यासाठी व संगोपनासाठी माणसाला जो व्यय करावा लागे, त्यापेक्षा त्यांच्या कष्टाने त्याच्या उत्पादनात होणारी वाढ कितीतरी अधिक असे. जमिनीची नांगरणी-वखरणी वगैरे शेतीच्या कामांना त्याने बैलांना जुपले. गायीचे दूध हे तर त्याचे बहुमोल अन्न झाले. शेती व दूधदुभते यावर आधारलेल्या कृषिप्रधान

अर्थव्यवस्थेत गायीगुरांना इतके महत्त्व प्राप्त झाले की माणूस त्यांची संपत्तीत गणना करू लागला. आपल्या भारतात तर गायींना थेट देवांमध्ये नेऊन बसविण्यात आले.

पाळीव प्राण्यांच्या या रांगेत शेवटी आला तो घोडा. सुमारे पाच हजार वर्षांपूर्वी माणसाने घोडा हा प्राणी जवळ केला. घोडयाला प्रथम त्याने शेतीच्या कामांसच जुंपले. पण घोडा हा पळण्यात वेगवान, त्याचा दम मोठा आणि शरीरयष्टी बळकट हे पाहिल्यावर माणसाने त्याची वाहतुकीच्या कामावर योजना केली. एव्हाना माणसाने चाकाचा शोध लावला होता व वहातुकीसाठी तो गाडया बनवू लागला होता. घोडयाला त्याने गाडीला जोडले. घोडयाचा पळण्यातला वेग आणि दम मोठा असल्याने माणसाला घोडागाडीने लांबलांबची अंतरे कापणे सहज शक्य झाले आणि त्यामुळे माणसामाणसांमधील दळणवळण खूपच वाढले. घोडयाने अशा रीतीने मानवजातीच्या प्रगतीस खूपच मदत केली.

घोड़ा माणसाच्या आणखी एका कामी उपयुक्त ठरला आणि ते म्हणजे लढाई. लढाईसाठी घोडे ज्या गाडयांना जुंपीत त्यांना रथ असे खास नाव होते. योद्धे रथांत बसून तो रणांगणावर सोडीत आणि धनुष्यबाणांनी लढाई करीत. महाभारतीय युद्धात अर्जुन व इतर योद्धे रथांतून कसे लढले याची वर्णने तुम्ही वाचलीच असतील. रथ लढाईचे एक प्रमुख साधन होते, शिवाय राजे लोकांचे ते वाहनही होते.



गाड्या व रथांना घोडे जोडण्याच्या तंत्राचा अवलंब त्या प्राचीन काळी पुढारलेल्या संस्कृतींमध्ये जरी नित्याचा झाला, तरी घोड्यावर बसून घोडदौड करण्याची कला त्यांना अवगत नव्हती. ही कला प्रथम हस्तगत केली ती इसवी सनपूर्व सुमारे दोन हजार वर्षांपूर्वी मध्य आशियातील मंगोल लोकांनी. हे लोक भटके जीवन जगत आणि घोड्यांवर स्वार होऊन दूरदूरच्या भागात जाऊन हल्ले व लुटालूट करण्याचा त्यांचा धंदा असे. ते अत्यंत कडवे लढवय्ये होते. थेट मध्य युरोपापर्यंत ते स्वाऱ्या करीत. लढाईत आक्रमण करण्याच्या दृष्टीने हा घोडेस्वार फार प्रभावी ठरला. एक तर त्याची धडक जबरदस्त असे. दुसरे असे की घोड्यावर तो उंच जागी असल्याने जमिनीवरील माणसापेक्षा त्याला हत्याराचा मारा करणे अधिक सोयीचे असे. यामुळेच मध्य आशियातील या घोडेस्वारांच्या धाडी येत तेव्हा त्यांच्यापुढे कुणाचीही मात्रा चालत नसे. एक गंमत अशी की इसवी सनपूर्व सुमारे एक हजार वर्षांपूर्वीच्या काळात ग्रीकांनी घोडा हा प्राणी पाहिलाही नव्हता. आशियातून आलेले हल्लेखोर घोडेस्वार त्यांनी पाहिले तेव्हा घोडा व त्यावर बसलेला माणूस हे दोन नव्हे तर एकच प्राणी आहे असा समज त्यांचा प्रथम झाला. खालचे शरीर घोड्याचे व वरचे शरीर माणसाचे असा 'सेंटॉर' हा अतिमानवी प्राणी त्यांनी कल्पिला तो या समजापायीच!

घोड्याचा प्रसार वाढला तशी घोड्यावर बसण्याची कला जगातल्या विविध भागांतले लोक शिकले. युद्धाच्या तंत्रात तर घोड्याला पहिल्या प्रतीचे स्थान प्राप्त झाले. घोडदळ हा सैन्याचा प्रमुख विभाग बनला. गेल्या शतकापर्यंत घोड्याचे लढाईतले हे स्थान कायम होते. ग्रीक जगज्जेता शिकंदर याने इ.स. पूर्व ४ थ्या शतकात भारताच्या सीमेपर्यंत युरोप-आशिया खंड पादाक्रांत केले ते मुख्यतः त्याच्या घोडदळाच्या बळावर. त्याच्या सैन्यात अतिशय तरबेज असे ५००० घोडेस्वार होते. पुढे तेराव्या शतकात मध्य आशियातला मंगोल सरदार चिंगिझखान याने चीनपासून युरोपच्या पूर्व सरहद्दीपर्यंतचा आवाढव्य प्रदेश जिंकला त्याचे रहस्य त्याच्या तुफानी घोडदळात होते. फ्रान्सचा महान सेनानी नेपोलियन बोनापार्ट हा उत्तम घोडेस्वार होता. त्याची घोड्यावरची मांड इतकी पक्की असे की घोड्यावर बसल्याबसल्या तो झोपा काढीत असे. आपल्याकडे शिवाजी आणि पहिला बाजीराव पेशवा हें निष्णात घोडेस्वार म्हणून इतिहासात प्रसिद्ध आहेत. कृष्णाकाठची बळकट काटक तट्टे मराठ्यांच्या इतिहासात गाजली. रघुनाथराव पेशव्यांच्या सेनापत्याखाली मराठा सैनिकांनी कृष्णाकाठच्या तट्टांवर स्वार होऊन अटकेपार झेंडे लावले हा इतिहास तुमच्या परिचयाचा आहेच. त्याकाळी राजे व सरदार मोठ्या संख्येने घोडे पदरी बाळगून असत. त्यांच्या घोड्यांच्या पागा व तबेले असत. घोड्यांची पैदास आणि संगोपन याबाबत अतिशय काळजी घेतली जाई. घोड्याला धुणे, खरारा करणे, तोबरे लावून उत्तमोत्तम खुराक खाऊ घालणे ही कामे रोजच्या रोज दक्षतापूर्वक केली जात कारण घोडे जेवढे उत्तम तेवढे राजाचे वा सरदाराचे बळ अधिक असा हिशेब असे.

घोडा हा इमानदार प्राणी आहे. आपल्या मालकावर तो प्रेम करतो. रणांगणावर मालक मरून पडला तर त्याचे शव आपल्या पायांमध्ये घेऊन घोडे



त्याची राखण करीत बसल्याची उदाहरणे घडली आहेत. घोड्याला चांगल्यापैकी बुद्धी असते. त्याचे घ्राणेंद्रिय विशेष कार्यक्षम असते. धोक्याची चाहूल त्याला चटकन लागते. रानावनात कोठे हिंस्र श्वापदाचा नुसता वास आला तर घोडे चालण्याचे एकदम थांबतात. घोड्याला संकटाची ही जी चटकन पूर्वसूचना मिळते त्यावरून इंग्रजीत 'हॉर्स सेन्स' असा वाक्प्रचार रूढ झाला आहे. तारतम्य बुद्धी म्हणजे 'हॉर्स सेन्स'.

असा हा उमदा प्राणी. दुर्दैवाची गोष्ट ही की माणसाच्या जीवनात यंत्र आल्यापासून ओढकाम व वाहतूक या कामांसाठी बैल-घोड्यांचे स्थान कमी कमी होत आहे. घोड्यांच्या बग्ग्या आता इतिहासजमा झाल्या आहेत. घोड्यांचे टांगे अजून कुठे कुठे आहेत. पण मोटारी, रिक्षा, स्कूटर वगैरे वाहने जशी वाढतील तसे घोड्यांचे टांगे निकालात निघतील हे स्पष्ट आहे. सध्या घोड्यांची पैदास व देखभाल उत्तम प्रकारे केली जाते ती फक्त सर्कशी व शर्यतींसाठी. समाधानाची गोष्ट इतकीच की काही वन्य प्राणी व पक्षी जसे नामशेष झाले किंवा होत आहेत तसे घोडे नामशेष होण्याची भीती नाही. कारण घोड्यांची निपज करवून घेणे माणसाच्या नियंत्रणातली गोष्ट आहे. पाच हजार वर्षे ज्या प्राण्याने माणसाची निष्ठेने सेवा केली, माणसांच्या लढायांत ज्याने माणसांच्या बरोबरीने कुर्बानी केली असा हा घोडा जगला पाहिजे, आपल्यामध्ये राहिला पाहिजे असेच कुणी म्हणेल.

# गाढव

'गाढव' या विषयावर या सदरात मी लिहितो आहे हे पाहून तुम्हांला हसू येईल. 'गाढवावर लेख? काय हा गाढवपणा!' असेही कुणी गमतीने म्हणतील. पण 'गाढव' हा विषय खरोखर आपल्या फार जिव्हाळ्याचा आहे. गेली कित्येक हजार वर्षे जो प्राणी आपली एकनिष्ठ सेवाचाकरी करीत आहे त्याच्याविषयी आपल्याला सहानुभूती नको का वाटायला? मी म्हणतो सहानुभूतीच का, कृतज्ञताही वाटायला हवी. शिवाय अश्व कुटुंबातील घोडयाचा परामर्ष घेतल्यानंतर, त्याच कुटुंबातील दुसरे गाढव, ते का सोडायचे?

घोडा आणि गाढव एका कुटुंबातले तर आहेतच, पण फार फार जवळचे आहेत. गाय, म्हैस हेही प्राणी एकाच कुटुंबातले, पण ते एवढे जवळचे नाहीत. घोडा आणि गाढव इतके जवळचे आहेत की त्या दोघांचा संयोग करून त्यांच्यापासून खेचर ही तिसरी जात माणसाने पैदा केली आहे. एकाच कुटुंबातले आणि इतके जवळचे असूनही घोडा आणि गाढव यांच्यामध्ये तशी मोठीच तफावत आहे. घोडा दिसायला उमदा व देखणा प्राणी. गाढव ओंगळ दिसत नसले तरी त्याचा आकर्षकपणा असा खास काहीच नाही. बावळेच म्हटले तरी चालेल. 'गरीब बिचारे गाढव' असेच त्याच्याकडे पाहिल्यावर म्हणावेसे वाटते. घोडा भरधाव धावणारा; चित्ता व हरीण हे दोघे प्राणी सोडले तर धावण्यात घोडयाची बरोबरी करू शकेल असा इतर कोणी प्राणी नाही. गाढव क्वचितच धावते. कोणी पिटाळले किंवा आततायीपणाने मागे लागले तर ते धावणार. गडबड, घाई, धांदल या गोष्टी गाढवाला एकूण नापसंत. भोवतालच्या जगाची थोडीसुद्धा दखल न घेता, गाढव रस्त्याच्या कडेकडेने खाली मान घालून संथपणे चालत जात असल्याचे तुम्ही पाहिलेच असेल. संथपणा व थंडपणा हा गाढवाचा अगदी मूळ स्वभाव. एखाद्या ठिकाणी खाद्य मिळण्यासारखे असले तरी गाढव तिथे घुसखोरी करणार नाही किंवा लगबग करून ते पदरी पाडून घेणार नाही. विनासायास मिळाले तर ठीक, नाही तर जाऊ आपल्या वाटेने, अशीच त्याची वृत्ती असते.

गाढव हा मठ्ठ आणि निर्बुद्ध प्राणी आहे असा सार्वत्रिक समज आहे. कोणा माणसाने मठ्ठपणा किंवा निर्बुद्धपणा दाखवला तर त्याला 'गाढव' अशी शिवी देण्याचा प्रघात जगातल्या सर्वच भाषांमध्ये आहे. याचा अर्थ गाढवाचा मठ्ठपणा ही एक अशी गोष्ट आहे की जिच्याबद्दल कोठेही दुमत नाही. जगातल्या सर्व लोकांचे एकमत होईल अशा फार थोडया गोष्टी आहेत, त्यातील ही एक; आणि

त्याबद्दल गाढवाला धन्यवाद द्यायला हवेत! मराठी भाषेत तर आपण गाढवाच्या निर्बुद्धपणावरून 'गाढवपणा' असा शब्दही बनवला आहे. 'गाढवापुढे गायली गीता आणि रातचा गोंधळ बरा होता' अशी गाढवाच्या निर्बुद्धपणाची खात्री देणारी म्हणही मराठीत आहे. गाढवापुढे गीतेचे अख्खे पारायण केली तरी ते म्हणणार की आदल्या रात्री दुगाण्या झाडण्याचा कार्यक्रम केला तो या गीता-पारायणापेक्षा अधिक चांगला होता. एखाद्या मूर्ख माणसाला आपण शहाणपणा शिकवण्याचा खूप प्रयत्न केला तरी तो व्यर्थच ठरणार; तो माणूस मूर्खपणा करणार तो करणार, असा या म्हणीचा अर्थ. गाढवाच्या मठ्ठपणाच्या अशा म्हणी व कथा सर्व देशांत व सर्व भाषांत लोकांनी रचल्या आहेत. पंचतंत्र आणि इसापनीतीपासून ही परंपरा चालू आहे. सिंहाचे कातडे पांघरलेल्या गाढवाची गोष्ट तुम्हांला ठाऊक असेलच. या गोष्टीतल्या गाढवाने डबल मूर्खपणा केला. सिंहाचे कातडे पांघरून आपण जगाला सदासर्वकाळ घाबरवून सोडू असे त्या गाढवाला वाटले, हा त्याचा पहिला मूर्खपणा. बरे, सिंहाचे सोंग काढले तर मग आपल्या सुविख्यात आवाजात ओरडायचे तरी नाही. ओरडले, हा त्याचा दुसरा मूर्खपणा. शेवटी मालकाकडून बेदम चोप, हे त्या गाढवाला त्याच्या मूर्खपणाचे बक्षीस मिळाले! गाढवाच्या बेअकलीपणाच्या अशा कित्येक गोष्टी तुम्ही वाचल्या असतील.

गाढव खरोखरच निर्बुद्ध आहे का? कुत्रा, गाय, बैल, घोडा, हत्ती हे प्राणी माणसाच्या सहवासात राहून काही काही गोष्टी शिकतात, तसे गाढव काही शिकत नाही हे खरे आहे. गाढवाने सर्कशीत काम केल्याचे आपण क्वचितच पाहातो. गायी बैल दिवसभर रानात चरल्यानंतर संध्याकाळी त्यांना घराची ओढ लागते आणि कोणी माणूस बरोबर नसला तरी ते आपसूक घरी येतात. कुत्रा आपल्या मालकावर व घरावर किती प्रेम करतो ते सांगायलाच नको. गाढवाला असे प्रेम, ओढ वगैरे फार काही वाटत नाही. रात्री चरायला सोडून दिल्यानंतर सकाळी ते घरी येईल याची काही खात्री नसते. मालक मग त्याला धुंडाळायला निघतो, तेव्हा कुठे तरी ते निर्घोर उभे असल्याचे दिसते. रागावलेला मालक अशा वेळी त्याचे कान पकडून त्याला घरी आणतो.

माणसाच्या पाळीव प्राण्यांमध्ये बुद्धीच्या बाबतीत गाढवाचा शेवटचाच नंबर लागतो. गाढवाच्या ठिकाणी बुद्धीचा कसा अभाव असतो याची एक गमतीशीर गोष्ट सांगतात, ती मी तुम्हाला सांगतो. वडार लोक दगडमातीच्या वाहतुकीच्या कामासाठी गाढवे पाळतात. या कामासाठी त्यांना कुठे कुठे जावे लागते. घरी असतात तेव्हा रात्रीच्या वेळी जे गाढवाच्या मागच्या पायाला एक दोरी बांधून ती खुंट्याला किंवा दांड्याला बांधून टाकतात. म्हणजे रात्री ते कुठे भटकायला जात नाही. हे वडारी लोक दुसऱ्या ठिकाणी कामाला जातात तेव्हा मोकळ्या मैदानावर पाले व राहुट्या टाकून मुक्काम करतात. अशा ठिकाणी गाढवांना बांधून ठेवायला खुंट्या वा दांडे कुठून मिळणार? वडारांचा आपल्या गाढवांच्या निर्बुद्धपणावर पूर्ण भरवसा असल्याने खुंटे वा दांडे ठोकण्याच्या भानगडीत ते पडत नाहीत. ते एक सोपी युक्ती करतात. गाढवाच्या पायाला ते दोरी नुसती घासतात. गाढवाला वाटते आपल्या पायाला दोरी बांधली आणि

नेहमीप्रमाणे आपल्याला खुंट्याला बांधून ठेवले; ते मग जागचे हलत नाही. सर्व गाढवे न बांधताही अशा प्रकारे रात्रभर जागच्या जागी उभी राहातात.

गाढवाच्या मठ्ठपणाविषयी माणसाने अशा अनेक कथा रचल्या आहेत, पण त्यांतल्या बहुतेक अतिरंजितच म्हटल्या पाहिजेत. 'गाढवाला गुळाची काय चव?' ही म्हण पाहा. ही म्हण गाढवावर खरोखरीच अन्याय करणारी आहे. वाण्याने गूळ बांधून दिलेला कागद आपण बाहेर टाकला तर एखादे गाढव येऊन गुळाच्या चवीसाठी तो कागदसुद्धा खाऊन टाकतो. मग गाढवाला गुळाची चव नाही असे



तुम्ही कसे म्हणणार? गाढवाला एकदा मठ्ठ ठरवल्यानंतर आपण त्याला इतर दुर्गुणही चिकटवतो. आणि प्राणीतज्ज्ञांच्या मते गाढव निर्बुद्ध तर नाहीच पण त्याला चांगल्यापैकी बुद्धी असते. त्याला चांगल्या रीतीने वागवले तर त्याच्यासारखे इमानदारीने काम करणारे दुसरे जनावर नाही. पण तेच का तुम्ही त्याच्याशी निर्दयपणाने वागलात, तर मग त्याच्यासारखे हट्टी तेच. कितीही मारा, ते पाऊलही उचलणार नाही. गाढवाच्या या वृत्तीला आपण हट्टीपणा म्हणतो. पण खरे तर अन्यायाचा चिवटपणाने प्रतिकार करण्याचा त्याचा हा सत्याग्रही बाणाच म्हटला पाहिजे! चिवटपणा आणि कष्टाळुपणा हे गाढवाचे मोठेच गुण आहेत. गाढव एखाद्या कामाला जुपले की तासन तास अथकपणे ते काम करीत राहते, त्याची दमछाक लवकर होणार नाही. गाढवाची ताकदही खूप असते. त्याच्या शरीराच्या वजनाहून कितीतरी अधिक वजन ते सहज वाहून नेते. कुंभार त्याच्यावर दुझोळी टाकून तीत मडक्यांची भलीमोठी रास रचतो. परीट कपड्यांचे प्रचंड गाठोडे त्याच्या पाठीवर लादतो. वडार दगड-मातीच्या गोण्या घालतो. गाढव सारा भार सहन करते आणि निमूटपणे काम करीत राहते.

माणूस गाढव पाळू लागला त्याला आता पाच हजारांहून अधिक वर्षे झाली. काटकपणा, चिवटपणा, चिकाटी व ताकद हे गाढवाचे शारीरिक गुण लक्षात घेऊन माणसाने त्याला ओझ्याचे जनावर केले. आज सुद्धा खेडेगावांमध्ये ओझी वाहून नेण्यासाठी गाढवे वापरतात. गाढव हे खास कुंभाराचे जनावर. मडकी करण्याची माती वाहून आणण्यासाठी आणि तयार मडकी बाजारात नेण्यासाठी कुंभार



गाढवांचा उपयोग करतात. कुंभार आणि गाढव यांची ही संगत काही हजार वर्षांची आहे. यातून दोघांच्या संबंधी खूप गमतीच्या कथा प्रचलित आहेत. कुंभाराप्रमाणे परटाचेही गाढव हे ओझ्याचे जनावर आहे. खरे तर गाढव हे सर्व काळ गरिबांचेच जनावर राहिले आहे. घोडा पाळणे ज्यांना परवडणार नाही अशा लोकांनी गाढवाला जवळ केले. गाढवाचा दुहेरी उपयोग होतो. ओझे तर ते वाहून नेतेच, पण त्याच्यावर स्वार होऊन प्रवासही करता येतो. गाढवाची ताकद एवढी की ओझे आणि माणूस या दोघांसही ते वाहून नेते. पुष्कळ वेळा वाजवीपेक्षा जास्त भार घालून माणसे या सोशिक व गरीब जनावराचा अगदी अंत पाहातात.

गाढव हा प्राणी मूळचा वाळवंटी व निमवाळवंटी प्रदेशाचा रहिवासी. आफ्रिकेत सुदान व सोमालीलँड हे जे देश आहेत तेथे गाढवांच्या मूळ पूर्वजांची वस्ती होती. तेथील गाढवे जगाच्या सर्व भागात गेली. प्रदेशानुसार गाढवाच्या अनेक जाती आढळतात. गाढव हा प्रमुखतः माणसाळलेला प्राणी असला तरी रानटी अवस्थेत राहाणारी बिनमाणसाळलेली गाढवे आजही जगाच्या अनेक भागांत आहेत. सोमालीलँड, सिरिया, इराक, इराण, पाकिस्तान, आणि भारताचा कच्छचा भाग येथे रानटी गाढवे आढळतात. कच्छच्या रणात रानटी गाढवांचे कळप इतस्ततः भटकताना नेहमीच दिसतात. पाकिस्तान व कच्छच्या वाळवंटात आढळणाऱ्या रानटी गाढवांना 'घोरफाट' असे नाव आहे. इराणमधील 'ओनागा' मंगोलियामधील 'कियांग', सोमालीलँडमधील 'न्युबियन' अशा काही रानटी गाढवांच्या जाती प्रसिद्ध आहेत. या गाढवांना पकडण्याचा प्रयत्न अवतीभोवतीच्या भागांतले लोक करतात. पण त्यात सहसा यश येत नाही. रानटी गाढवांना हाताळणे फार कठीण जाते. त्यांच्या मागच्या पायांची लाथ एवढी जबरदस्त असते की पकडणाऱ्यावर जीव गमावण्याची पाळी यायची. लांडगे-कुत्रे यांसारख्या प्राण्यांची तर ही गाढवे सहसा डाळ शिजू देत नाहीत. पाळीव गाढवेही लत्ता प्रहाराचे हे शस्त्र समर्थपणे चालवतात. 'गाढवांचा गोंधळ आणि लाथांचा सुकाळ' अशी म्हण आहे खरी. पण गाढवांनी लाथांचा सुकाळ केला तर भल्या भल्या प्राण्यांना त्याच्यापुढे नामोहरम होण्याची पाळी येते. गाढवाच्या लाथेचे एक खास वैशिष्टच आहे. गायीबैल हे एकाच पायाने लाथ झाडतात. पण गाढव दुगाण्या झाडते ते दोन्ही पायांनी. माणसाला गाढवाच्या लाथेचे हे रहस्य समजले असल्याने तो त्याचा एक पाय पकडतो. एक पाय पकडला गेल्यावर गाढवाला लाथ झटकता येत नाही. पण हे कामसुद्धा सोपे नसतेच. प्रसंग बाका असेल तर लाथेखेरीज गाढव तोंडानेही हल्लेखोराशी सामना करते. त्याला कोणी समोरून धरायला गेले तर कडकडून चावून ते पकडणाऱ्याच्या तोंडाचा लचका काढायला कमी करीत नाही. गाढव गरीब तर खरेच,पण जिवावर बेतल्यावर तेसुद्धा उग्र रूप धारण करते.

गाढवाचा एक लक्षात घेण्यासारखा गुण म्हणजे गाढव कधीही डबक्यात साचलेले घाण पाणी पीत नाही. स्वच्छ वाहते पाणीच ते पिणार. तसेच गाढव पाण्याशिवाय खूप वेळ राहू शकते. हा त्याच्या वाळवंटी जीवनाचा वारसा असला पाहिजे. गाढवाची एक गंमत आहे. का कुणास ठाऊक त्याला चंद्राची फार भीती वाटते. आभाळात वर चंद्र आला की गाढव आडोशाला जाऊन उभे राहते, ते थेट

वंद्र आभाळातून मावळेपर्यंत. गाढव उकिरडयावर लोळते म्हणून गाढव हा एक गलिच्छ प्राणी असा एक सार्वत्रिक समज आहे. पण तो चुकीचा आहे. गाढव उकिरडयावर घाणीत लोळायला जात नाही. गाढवाला राखेत लोळायला आवडते आणि अशी राख सहसा उकिरडयावरच असल्याने गाढव तेथे लोळते. मातीतही ते लोळते. राखेत लोळणे हासुद्धा त्याच्या वाळवंटी जीवनाचा वारसा आहे. वाळवंटी प्रदेशात राहाणाऱ्या गाढवाचे अंग उष्णतेने तडतडते आणि त्यामुळे त्याच्या अंगाला खाज सुटते. ही खाज जिरवण्यासाठी गाढव रेतीत अंग टाकून यथेच्छ लोळते, आणि मग उठून उभे राहते व अंग गदगदा हलवून त्याला लागलेली रेती झटकून टाकते. पाळीव गाढवेही राखेत याच कारणासाठी लोळतात.अशा प्रकारे लोळण्यात गाढवाला मोठाच आनंद होत असावा. कारण लोळून झाल्यावर ते मोठमोठ्या आवाजात ओरडते. त्याची 'भोंहँ, भोंहँ' ही गर्जना तशी कर्णकर्कश असली तरी विनोदीच वाटते आणि म्हणून गाढवाला ओरडताना ऐकून आपल्याला हसू येते. गाढवाचे लोळणे हे एक गमतीचे दृश्य असते.

गाढव हे इतके उपयुक्त जनावर असूनही माणसे त्याला फार निर्दयपणे वागवतात ही खरोखर खेदाची गोष्ट आहे. कित्येक वेळा अंगावर जखम होईपर्यंत त्याला मारण्यात येते. तसेच त्याच्या अंगावर झालेल्या जखमांवर औषधोपचार करण्याची काळजी घेतली जात नाही. गाढवाची ओझी वाहण्याच्या कामात दमछाक होऊ नये म्हणून त्याच्या नाकपुडया बाहेर काढण्याची पद्धतही रानटीपणाचीच आहे. गाढव हा तिरस्काराचा विषय व्हावा असे त्याच्यात खरोखरी काही नाही. उलट माणसाच्या कामी येणारे असे त्याच्यामधे कितीतरी गुण आहेत, हे आपण पाहिले. ख्रिश्चनधर्मीय लोक गाढवाला तिरस्करणीय मानत नाहीत. कारण येशू ख्रिस्ताने कित्येक वेळा गाढवावर बसून दूरदूरचा प्रवास केला होता. गाढवाच्या पाठीच्या मणक्यांवर एक आडवा असा काळा पट्टा असतो. तसाच एक काळा पट्टा खांद्याखालून पोटाकडे गेलेला असतो. या दोन पट्टयांची आकृती ख्रिस्ताच्या क्रॉससारखी दिसते. येशू ख्रिस्ताने गाढवाला हा क्रॉस दिला अशी धर्मभोळ्या ख्रिश्चनांची श्रद्धा असते. म्हणून ते गाढवाला पवित्र मानतात. ते काही असो. गाढव मनुष्य जातीसाठी जे अपार कष्ट घेते ते लक्षात घेऊन त्याला ममतेने वागवणे हे आपले कर्तव्य नाही का?

२६०३ ८/१०/९२
बा.वा.
BVBK-0402703